"तो पहा आपली शाळा ती पांढरी इमारत दिसते आहे तीच शाळा" मुले म्हणाली, "बरोबर. महादेवाचे देऊळ कुठे आहे? दिसते आहे का" "ते पहा गावच्या दुसऱ्या टोकाला. देवळाचा घुमट कसा उठून दिसतो आहे पहा. देवळजवळच्या तलाव किती लहान दिसतो आहे! आणि समोर सूर्य पहा कसा सोन्याच्या गोळ्या सारखा दिसतो आहे!" मास्तर म्हणाले मग त्यांनी बरोबर आणलेला खाऊ मुलांना वाटला आणि मुले हळूहळू टेकडी उतरू लागली सर्वजण शाळेत परतले तेव्हा अंधार पडू लागला होता. मुले पाट्यादप्तरें घेऊन घरी गेली आणि प्रत्येकजण आपल्या सहलीचे वर्णन आईजवळ करू लागला. अशी ही तिसरीची सहल पार पडली.

Vocabulary and Notes

सहल - Sahal (F) = Trip, Picnic.

गडबड - gadbad (F) = Commotion, Loud noise;

टेकडी - tekdi: (F) = Hill

पश्चिम - Paščim (F) = West (direction)

तयार - tayar = Ready

सुरात - Surat = In tone (सूर su:r (M)) = Tone; Tune.

रांग - Rang / Ran (F) = Line

ओळीत - oli:t = In a line (ओळ ol (F) = Line)

पाट्यादप्तरे - Patyadaptre (M.pl) - Books and slates, Briefcases etc.
(पाटी - Pati (F) = slate
दप्तर - daptar (M) - briefcase)

शिस्तीत - Šisti:t = In a discipline way
(शिस्त - Šist = Discipline)

कौतुकाने - Kawtakane : With appreciation, with admiration.
(कौतुक Kawtuk (N) : Appreciation. encouragement

माथ्यावर - Mathyawar : on the top (माथा - Matha (M) = Top)

घुमट - ghumat (M) = Domb.

देऊळ - Deu:l (N) = Temple.

रसभरीत - Rasbharit / Rasbhari:t (A) = Full of Juice; juicy; Interesting.

वर्णन warnan (N) = Description

1) गडबड चाललेली होती : There was a lot of noise going on. There was some commotion

2) होऽऽ = Yes The sign 'ऽ' is used to indicate the lengthening of the Final vowel. Two or Three of these signs indicate that the vowel was prolonged for quite some time

3) हां or हां : O.K. This is used by many persons to indicate different meanings; One of the meanings of such utterance is "I am paying attention; go on"

4) कांहीजण हाशहुश करू लागले

Some started making noises (indicating that they are tired)

हाश हुश /Haŝhhuŝ/ is an onomatopoeic word imitating the noise made when a person has done some hard work or has taken plenty of exercise and is resting. The whole phrase is हाशहुश कर - Haŝhhuŝ kar : To make a noise indicating that one is tired.

5) वाऱ्याची झुळूक : A gentle breeze.
वारा - Wara (M) - Wind.
झुळूक - Zhuluk (F) - A flow, A wild flow.

6) घुमट उठून दिसतो : The domb looks (appears) prominent

7) लहान लहान - very small.
Repetition of adjectival words indicate extensive quality of quantity. See the following sentences

तो दूर दूर निघून गेला - He went far away

तिथे मोठे मोठे लोक आले होते

There were present very great persons (or persons of very great reputation or fame)

EXERCISES.

A) Answer the following questions in complete Marathi Sentences
1) Where did the teacher plan to take the boys?
2) What did the boys do when they got out of their classroom?
3) Where did the boys leave their books?
4) What were the people in the streets doing?
5) What happened when the boys reached the top of the hill?
6) How did the houses in the town look from the hill?
7) Where was the temple of महादेव?
8) What did the teacher ask the boys to identify?
9) What did the teacher distribute to the boys?

B) Fill in the blanks with appropriate words
1) सूर्य ... पश्चिमेकडे ... लागला.
2) मुलांना ... शिवाय ओ कायला पैसा ... नव्हता
3) मुले एका ... उभी.
4) देऊळ गांवाच्या ... टोकाला ...
5) टेकडीच्या ... माथ्या ... सपाट ... होती
6) सर्व वर्ग मास्तरांच्या ... शिस्तीत चालू
7) वर ... सर्वांना ... इशाही वाटली
8) मी मुलांना ... वाटल्या
9) सगळे मास्तर ... आले

C) Translate the following sentences into Marathi
1) Are you (plural) ready?
2) The boys stood in a line.
3) The sun looks like a ball of gold.

4) There is a temple in the town.
5) Where is the school?
6) There is a lake outside the town
7) The teacher came into the classroom.
8) All the boys returned to the school.

पुंडलीक

पंढरपूर गाव महाराष्ट्रात आहे हे ठिकाण म्हणून अतिशय प्रसिद्ध आहे दरवर्षी आषाढ आणि कार्तिक महिन्यातल्या एकादशीला मोठी यात्रा भरते पंढरपूरला विठ्ठलाचे देऊळ आहे आणि ह्या देवाच्या दर्शनाकरिता अलोट गर्दी असते पंढरपुराजवळून चंद्रभागा नदी वाहते ह्या चंद्रभागा नदीच्या वाळवंटात हजारो लोक विठ्ठलनामाचा गजर करीत असतात विठ्ठलाचे दुसरे नाव पांडुरंग असे आहे देवळात मुख्य देवळातली पांडुरंगाची मूर्ति कंबरेवर हात ठेऊन देवूळ विटेवर उभी आहे ही पांडुरंगाची मूर्ति विटेवर का उभी आहे ह्याबद्दल पुढील कथा सांगण्यात येते

फार पूर्वीच्या काळी पंढरपुरात एक गरीब ब्राह्मण रहात असे त्याला पुंडलीक नावाचा एक उनाड मुलगा होता तो आपल्या आईवडिलांना [illegible] तो त्याच्या बायकोचे [illegible] नाचत असे आणि आईवडिलांना मारहाण करी आणि शिव्या देई तेव्हा आईवडिल कंटाळून गावातल्या काही इतर लोकांबरोबर यात्रेला निघाले पुंडलीकही त्यांच्याबरोबर निघाला पण आपल्या आईवडिलांची त्याने मुळीच विचारपूस केली नाही

वाटेत ह्या सर्व लोकांनी एका ऋषींच्या आश्रमात मुक्काम केला तेथे [illegible] पुंडलीक बाहेर निजलेला होता पहाटेच्या वेळेला एका रात्री आश्रमाजवळ येऊन पाऊस पडू लागला म्हणून पुंडलीक आत ऋषींच्या घरात जाऊन तेव्हा त्याला तीन घाणेरड्या स्त्रिया आश्रमात जाताना दिसल्या थोड्यावेळाने त्या सुंदर होऊन बाहेर आल्या ते पाहून पुंडलिकाला फार आश्चर्य वाटले व त्याने त्यांना "हा काय चमत्कार आहे?" असा प्रश्न केला तेव्हा त्या स्त्रिया म्हणाल्या "आम्ही गंगा, यमुना आणि सरस्वती अशा तीन प्रसिद्ध नद्या आहोत दररोज पाण्यात पुष्कळ लोक आमच्यात स्नान करतात आणि त्यांची घाण लागून आम्ही घाणेरड्या होतो ती घाण इथे येऊन आम्ही ऋषींच्या देवळात आणि कोठे धुऊन टाकतो व पुन्हा स्वच्छ होतो पुंडलिका, तू अत्यंत पापी आहेस तू आपल्या आईवडिलांचा फार छळ केला आहेस म्हणून मरणानंतर देव तुला भयंकर शिक्षा करील"

हे ऐकून पुंडलिकाला पश्चाताप झाला. तो त्यांना म्हणाला, "मी तुम्हाला शरण आलो आहे. ह्या पापातून मुक्त होण्याकरिता मी काय करू? मला मार्ग दाखवा." त्या स्त्रिया म्हणाल्या, "तू आपल्या आईवडिलांची सेवा कर. तेच तुझे देव आहेत." असे म्हणून त्या नाहीशा झाल्या.

पुंडलिकाला खराखुरा पश्चाताप झाला असल्याने त्याने ताबडतोब आईवडिलांना शोधून आणले आणि त्यांना पंढरपुरास परत आणून तो त्यांची सेवा करू लागला. आता तो त्यांना कधीच त्रास देत नसे. उलट नाना प्रकारांनी तो त्यांची सेवा करी.

पुंडलिकाची भक्ति पाहून पांडुरंग फार प्रसन्न झाले आणि भेटण्याकरिता त्याच्या घरी आले. ते आले तेव्हा पुंडलीक आपल्या आई-वडिलांच्या सेवेत गर्क होता. देवाकडे त्याचे मुळीच लक्ष गेले नाही. तेव्हा देवांनीच त्याला हाक मारली. तेव्हां पुंडलिकाचे लक्ष त्यांच्याकडे गेले आणि त्याने त्यांच्याकडे दोन विटा फेकल्या आणि तो म्हणाला, "देवा इथें ह्या विटेवर क्षणभर उभे रहा. माझी ही सेवा आटपली की मी तुमच्या सेवेला येतो. एवढे म्हणून तो पुन्हा आ वडिलांच्या सेवेत गुंग झाला.

पांडुरंगाला त्याची ही भक्ति पाहून फार आनंद झाला आणि ते त्याला म्हणाले, "पुंडलिका, तुला हवा तो वर मा पुंडलिक म्हणाला, "देवा, आपण आहात तसेच इथे विटेवर उ रहा." देवाने त्याच्या भक्तीला भुलून ~~त्या~~ त्याचे म्हणणे केले, व त्याप्रमाणे पांडुरंगाची मूर्ति अजूनही पंढरपूरला विटेवर उभी आहे

Vocabulary and Notes.

(एकादशी - ekadəsi: (F) = Eleventh day.
अलोट - əlot (A) = Innumerable.
गर्दी - gərdi: (F) = crowd.
विठ्ठलनाम - withəl nam (N) = Name of the deity 'Wittal'.
(नाम - nam (N) = Name)
गजर - gəjər (M) = The shout of acclaimation; Also an alarm (of a clock).
वीट - wi:t (F) = Brick.
कंबर / कमर - Kəmbər / Kəmər (F) = waist.
कथा - Kətha (F) = story.
उनाड - unad (A) = Naughty; wild.
मारहाण - Marhan (F) = Beating (हाण - han - (T) = To strike)
शिवी - Šiwi: (F) = Abusive term. Abuse.
ऋषी - rusi: (M) = Saint; sage.
घाणेरडा - ghanerd-a (A) = Dirty.
स्त्री - stri: (F) = Women.
नदी - nədi: (F) = River.
घाण - ghan (F) = Rubbish, dirt, garbage.
सेवा - Sewa (F) - Service
स्वच्छ - swəčchə (A) = clean
पापी - Papi: (A) = Sinful (पाप Pap (N) = Sin)
मरण - Marən (M) = Death
मुक्त हो - Muktə ho- = To become free - to get salvation.
मार्ग - Margə (M) = Way
शोध - Šodh - (T) = To search
प्रसन्न हो - Prəsənnə ho - = To be pleased

(ii) [illegible] becomes polite [illegible]

[illegible] (a) [illegible]

[illegible] (b) [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible] independent

[illegible]

[illegible]

[illegible] the translation of these sentences [illegible]

[illegible]

may take many other phrases in Marathi the phrase

[illegible]

for आणि [illegible] and [illegible] pay attention for आणि [illegible]

7) क्षणभर उभं रहा

Wait for a moment or stand for a moment. But

खुर्चीवर उभा रहा

Stand on the chair.

8) The word की is used in different ways in Mar.

Notice the following sentences.

तो आला की मी जाईन.

As soon as he comes, I shall go.

तुम्ही जेवलात की नाही?

Did you eat or not?

शिक्षक म्हणाले की आपण धडा ~~[illegible]~~ वाचूया

The teacher said that we should read the lesson.

रमा येईल की तुमच्या बरोबर! (Mostly colloquial style

Of course Rama ~~with~~ will come with You.

EXERCISES

A) Answer the following questions in complete Marathi sentences

1) What is पंढरपूर famous for?
2) Which river flows by side of पंढरपूर?
3) Who lived in पंढरपूर long time ago?
4) What happened when पुंडलिक went for a walk?
5) What did he see when he reached the hermitage
6) Who were the three women?
7) How did they clean themselves?
8) What did tell पुंडलिक?
9) What did पुंडलिक do after hearing their advice?
10) What was पुंडलिक doing when पांडुरंग came to see him
11) How did he receive पांडुरंग?
12) What did पांडुरंग say to पुंडलिक?

B) Fill in the blanks with appropriate words

1) पांडुरंगाचे ---- नांव ----- असे आहे.
2) दरवर्षी ---- महिन्यातल्या ---- एकादशीला ---- ला मोठी यात्रा ----
3) देवळांतली ---- कंबरेवर हात ---- विटे ---- उभी आहे
4) पुंडलिकाचे ---- आईवडिलांची ---- विचारपूस ---- नाही.
5) त्या ---- स्त्रिया ---- वेळात सुंदर ---- बाहेर आल्या.
6) त्याच्या ---- नंतर देव ---- भयंकर शिक्षा करील
7) पुंडलिकाची ---- पाहून ---- फार प्रसन्न
8) त्याने विठ्ठलाला ---- वर उभे ---- सांगितले
9) ह्या ---- तून मुक्त होण्या ---- ची काय करू?
10) त्याकाळी ---- येऊन आला ---- पडू लागला ---- तो आश्रमापाशी

c) Translate the following sentences into Marathi.

1) Banaras is Famous in India as a place of pilgrimage
2) My friend's son is very naughty and behaves as he pleases.
3) I went out for a walk; but all of a sudden it started raining.
4) My friend repented for harassing his parents and decided to serve them well.
5) My mother was very busy in her work and did not notice me when I came home
6) The Statue of पाडुरंग is still standing in bricks
7) That sinful man said to the God, "Please show me the way to get rid of my sins."

पुस्तकं खरेदी

वडील - दिनू, अरे तुझी पुस्तकं आणायला हवीत आता शाळा सुरू होशिल पुढच्या आठवड्यात. तुला यादी मिळाली का ?

दिनू - हो बाबा, मला नाव घातलं शाळेत त्याच दिवशी यादी मिळाली. केव्हा जायचं आपण पुस्तकं आणायला ?

वडील - जाऊ की आज नाही तर उद्या ! किती पुस्तकं आणायची आहेत? (यादी बघतात) अबब! सहा र पुस्तकं! त्याला किती वेळ लागतो ?

दिनू - पण बाबा, मला काही वह्या पण हव्या आहेत. आणि शिवाय पेन्सिली, दौत, शाई वगैरे पण हवी आहे

वडील - बर तर, आत्ताच जाऊया. नाहीतरी मला वेळ आहेच आता तेव्हा उरकून टाकूया हे काम.

× × ×

[पुस्तकांचे दुकान. दुकानात खूप गर्दी आहे. दिनूचे वडील आणि दिनू दुकानात शिरतात]

एक पुस्तकविक्रेता - हं, कोणती पुस्तकं पाहिजेत तुम्हाला ?

वडील - या यादीतली सर्व पुस्तकं पाहिजेत. काही जुनी असली तर पहा

दिनू - नाही बाबा, मला नवीन पुस्तकं हवीत !

~~कहे~~ वडील - बर बुवा, नवीनच द्याहो.

पुस्तकविक्रेता - बालबोध वाचन भाग ४ था आहे, सोडीवाचन भाग ४ था आहे, नागरिकशास्त्र भाग ४ था आहे भूगोल भाग ४ था, इतिहास आणि आरोग्यशास्त्र ह्यांच्या आवृत्त्या संपल्या आहेत. नवीन आवृत्त्या यायला आणखी दोन आठवडे लागतील. काही जुन्या आवृत्त्या शिल्लक नाहीत त्यापैकी जुनी पुस्तकं दिलीत तरी चालेल

पुस्तकविक्रेता बर, आणखी काही वह्या वगैरे ?

वडिल - हे, हो वह्या पण हव्यात किती पानी हव्यात रे दिनू?

दिनू - चार शंभर पानी आणि दोन दोनशे पानी अंकगणिताकरता

पुस्तकविक्रेता - ह्या ह्या. आणि ही पुस्तके. चार नवी आणि दोन जुनी सर्व मिळून बारा रुपये आणि साठ नये पैसे झाले. ही तुमची पावती.

[वडील पैसे देतात दिनू पुस्तकांचा गठ्ठा उचलतो आणि दोघेजण दुकानातून बाहेर पडतात.]

वडील - आता पुस्तके नीट जपून वापर. घरी गेल्यावर त्याला कव्हर घालून घे ताबडतोब आणि पुस्तके हरवायची नाहीत बर का! हरवलीस तर नवीन काही घेऊन देणार नाही मी. आणि अभ्यासाला सुरवात करायची आता हळूहळू, बर का!

दिनू - हो बाबा. मी घरी गेल्यावर दादाकडून कव्हर घालून घेईन लगेच आणि पुस्तके हरवणार नाही काही मी! अभ्यासाला पण सुरवात करीन उद्यापासून.

वडील बर बर, पाहूयाच आता काय अभ्यास करतोस तो!

Vocabulary and Notes

पुस्तक Pustak (N) = Book

खरेदी Kharedi (F) = Buying, Purchasing

यादी Yadi (F) = List

[illegible] [illegible] (M) = [illegible], Small

वह्या Vahya (F pl) = Note book (वही Vahi (F) [illegible]
Marathi Balbodh [illegible]
Devanagari [illegible])

दौत Daut (F) = Inkpot

शाई Shai (F) = Ink

बाळबोध वळणाचे Balbodh walanache (N) = Marathi [illegible]
[illegible]

मोडी वळणाचे Modi walanache (N) = Marathi [illegible]
[illegible] Script
(See Note Below)

आरोग्यशास्त्र Aarogyashastra (N) = Science of Hygiene

मराठी Marathi (F) = Marathi

गठ्ठा Gattha (M) = Bundle

अभ्यास Abhyas (M) = Study

नागरिक शास्त्र Nagarik Shastra (N) = Civics (नागरिक Nagarik = citizen)

Notes

1) कधी जायचे आपण पुस्तक आणायला?
When are we going to purchase the book?

2) मला काही वह्यापण हव्या आहेत
I want some notebooks also

The word पण is used in Marathi in different meanings when at the beginning of the sentence [illegible] 'but.'

See the Following sentence.

मी आलो असतो. पण मला वेळ नव्हता.

I would have come. But I did not have any time.

However, when used in the middle of the sentence with a noun or pronoun, it means 'also'. See the Following sentence.

मी पण येईन.

I will also come

त्याला पुस्तक हव आणि पाटीपण हवी.

Not only does he want a book, but also a slate; or He wants a book and also a slate.

3) मोडीवाचन Reader in modi Script.

The modi script is supposed to have been invente by a minister called हेमाडपंत in the 12th centhry. It is a cursive script for Marathi and can be used for writing speedily. All the correspondence of the Maratha kings and ministers was in Modi script. Many historical documents and ancient manuscripts in Marathi are in this script.

4) बर बर O.K

EXERCISES.

A) Use the Following words into Marathi sentences.

1) वह्या 2) दुकान 3) पाहिजे 4) नवीन 5) शिक्षक 6) उद्या 7) पण
8) स्वीकार - 9) मी 10) हळू.

B) Fill in the blanks with appropriate words.

1) पुढच्या .... शाळा .... होईल.
2) मला .... काही पुस्तके
3) दुकानात खूप .... होती
4) ह्या पुस्तकांच्या आवृत्त्या .... आहेत.
5) पुस्तके .... वापर
6) मी घरी .... अभ्यासाला .... करीत
7) हे काम उरकून
8) काही .... पुस्तके .... तरी चालेल.
9) पुस्तके .... तर नवीन .... देणार नाही.

C) Translate the following sentences into Marathi.

1) Let us go to the shop.
2) How many books do you want?
3) There was a big crowd in the shop.
4) This is your receipt.
5) He will use the books with care
6) We want all the books on this list
7) I learn history, geography and civics in the school.
8) The school will open next week.
9) Let us finish this job

५४

पत्र कसे लिहावे

पुणे
दिनांक ७ डिसेंबर १९६

प्रिय दादास,

सप्रेम नमस्कार विनंती विशेष.

माझे हे पाहून तुला खूपच आश्चर्य वाटेल. पण काल आमच्या वर्गात मास्तरांनी आम्हाला पत्र लेखन शिकवले आणि त्याची मला इतकी मजा वाटली की घरी आल्याबरोबर मी तुला एक पत्र लिहायचे ठरवले. पत्र लिहिण्याचे इतके वेगवेगळे प्रकार असतात हे मला ठाऊक नव्हते. मास्तरांनी आम्हाला निरनिराळे पत्रांचे नमुने फळ्यावर लिहून दाखवले. त्यांत बाबांना पत्र लिहायचे झाले तर "तीर्थरूप (किंवा तीर्थस्वरूप) बाबांना साष्टांग नमस्कार विनंती विशेष" असा मायना हे मास्तरांनी सांगितले की लग्न झालेल्या आणि नवरा जिवंत असलेल्या स्त्रियांना लिहिताना त्यांच्या नावामागे 'सौभाग्यवती' असा मायना लिहितात त्याकरिता नुसते 'सौ.' लिहिले तरी चालते. ज्यांचा नवरा मरण पावला आहे अशा स्त्रियांना लिहिताना 'गंगाभागीरथी' असे लिहितात त्याचप्रमाणे आपल्या विशेष ओळखीच्या नसलेल्या कोणा ~~गृहस्थ~~ गृहस्थाला लिहायचे झाले तर त्यांच्या नावामागे 'राजमान्य राजश्री' असे लिहितात ह्याचेच छोटे रूप म्हणजे "रा. रा." हे होय. मास्तर म्हणाले की कोणत्याही वडील माणसाला लिहिताना नेहमी 'साष्टांग नमस्कार विनंती विशेष' असे लिहावे. पण हा मायना सर्वच्या सर्व लिहिण्याऐवजी नुसते 'सा. न. वि. वि.' असे लिहिले तरी चालते. आपल्या मित्रांना आणि बरोबरीच्या लोकांना लिहिताना आणि आपल्या आवडत्या माणसाला लिहिताना नुसते प्रिय असे लिहिले तरी चालते. दादा, तू मला फार आवडतोस म्हणून मी 'प्रिय दादा' असे ~~असे~~ लिहिले आहे. मुलांनी मास्तरांना विचारले की वडील माणसे लहानाला : म्हणजे लहान मुलांना P.T.O

किंवा त्यांच्यापेक्षा वयाने लहान असणाऱ्या लोकांना काय लिहितात? मास्तरांना हा प्रश्न ऐकून आनंद झाला ते म्हणाले की अशीच चौकस बुद्धी तुमच्याजवळ हवी. मग त्यांनी सांगितले की वडील माणसे लहानांना पत्र लिहीताना नावामागे 'चिरंजीव' असे लिहून मग नावापुढे 'अनेक आशीर्वाद' असे लिहितात. म्हणजे समजा बाबांनी जर तुला पत्र लिहिले तर ते "चिरंजीव विनायक ह्यांस अनेक आशीर्वाद" असे लिहितील, नाही का? मास्तर म्हणाले की पत्राच्या शेवटी सर्वसाधारणपणे 'कळावे, लोभ असावा ही विनंती' असे किंवा नुसते "कळावे, लोभ असावा" असेही लिहितात आणि पुष्कळदा हे सर्व लिहिण्याऐवजी काहीजण नुसते 'क. लो. अ.' असे लिहितात आणि त्यानंतर 'आपला' किंवा 'तुझा' असे लिहून सही करतात. पुष्कळ लोक असे नाते असेल त्याप्रमाणे 'तुझा बंधू' किंवा 'तुझी बहिण' असे लिहून मग सही करतात. पण दादा मास्तर म्हणत होते की आजकाल हे बाकीचे मायने हळूहळू प्रचारातून जाऊ लागले आहेत आणि बहुतेक सर्वजण "प्रिय ____" अशीच सुरुवात करतात.

सारे हे पत्र नुसते मायन्यानीच भरून गेले आहे पण आणखी काय लिहू? आईची प्रकृती ठीक आहे. ताई सध्या तिच्या वार्षिक संमेलनाच्या गडबडीत आहे. त्यामुळे तिला माझ्याशी बोलायला पण वेळ मिळत नाही. बाबा कालच बाहेरगावाहून प आले काही कामाकरिता गेले होते ते. वाघ्या कुत्रा आणि मांजरी सध्या झोपा काढीत आहेत. बाकी सर्व ठीक आहे. सवडीने पत्राचे उत्तर पाठव.

तुझा भाऊ
श्रीधर

ताजा कलम: मास्तर म्हणत होते की पत्राच्या शेवटी सही केल्यावर आणखी काही

लिहावयाचें असल्यास 'ताजा कलम' किंवा 'ता. क.'
असें लिहून मग त्या खालीं अधिक
मजकूर लिहितात. मी पत्रांत हें लिहायचें
विसरल्यानें हा 'ताजा कलम' लिहित आहे.

तुझा भाऊ
श्रीधर.

Vocabulary and Notes.

पत्र - Patrə (N) = Letter.

सप्रेम - Saprem = with love (प्रेम - Prem (N) = Love)

नमस्कार - Naməskar (M) = salutation; greetings.

मायना - Mayna (M) = Way of addressing persons when writing a letter; A complimentary formula.

साथ

साष्टांग - Sastam/sastangə (A)

तीर्थरूप - ti:rtharu:p(A) = Complete; Full. (Literally, with eight parts of the body; when a complete salutation is performed, 8 parts of the body are supposed to touch the ground.)

तीर्थरूप - ti:rtharu:p (A) = A term of respect when writing to elders.

विशेष - wišeṣ (A) = Special.

सौभाग्यवती - Səwbhagyəwati: (A) = Mrs.

गंगाभागीरथी - gaŋgəbhagi:rəthi: (A) = A term of respect when writing to widows.

चौकसबुद्धी - Cəwkəsbuddhi: (F) = Enquisitive mind.

सर्वसाधारणपणे - Sərwəsadharəṇpəṇe = Generally.

नाते - Nate (N) = Relation; Relationship.

प्रचार - Prəčər (M) = Use

प्रकृती - Prəkruti: (F) = Disposition; constitution; Temparament.

सही - Səhi: (F) = Signature.

कुत्रा - Kutra (M) = Dog.

P.T.O.

Notes.

1) हें मला ठाऊक नव्हतें.

I did not know it.

2) पत्र लिहायचें झालें तर.....

If a letter is to be written; (If one want's t write a letter).

3) नुसतें सौ. लिहिलें तरी चालतें.

It is all right even if only "Sau" is written.

4) सर्वच्या सर्व

All; complete; Full.

5) जसें नातें असेल त्याप्रमाणें....

According to the relationship.....

EXERCISES.

A) Answer the following questions in complete Marathi Sentences.

1) What did the teacher teach in the class yesterday?
2) What did Shridhar (श्रीधर) decide to do?
3) How is a widow addressed when writing a letter to her
4) What is the title used before the name of a married woman?
5) How do many people begin their letters now a day?
6) What was the comment of the teacher when the boy asked him a question.
7) How does one usually end one's letter?
8) Who returned home yesterday?

B) Use the following words into sentences.

1) नमस्कार 2) काळजी 3) फार 4) पत्र 5) पारखव
6) सही 7) भाऊ 8) मायना 9) किंवा 10) पुष्कळ.

C) Fill in the with appropriate words.

1) मी गांवाला जायचें ....
2) तूं मला फार ....
3) पत्राच्या शेवटी ..... करा.
4) वडिल .... लहानांना पत्र ...."अनेक ....."असें लिहितात
5) माझा मोठा .... फार ..... आहे.
6) ह्या पत्रांत ताजा ...... आहे.
7) हे बाकीचे ..... हळूहळू ..... जाऊ लागले .....
8) पत्र .... एवढे प्रकार ..... हें मला ठाऊक .....
9) आईची .... ठीक आहे.
10) सवडीनें .... उत्तर पाठव.

मराठी भाषेंतील कांही म्हणी.

जगांतील इतर भाषांप्रमाणे मराठी भाषेंत सुद्धा अनेक म्हणी आहेत. लोक ह्या म्हणी बोलतांना अगर लिहितांना नेहमी वापरतात. अशा म्हणींपैकी पुष्कळशा म्हणींमागे कांहींनाकांही तरी इतिहास किंवा दंतकथा, किंवा एखादी गोष्ट असते कांही म्हणींच्या मागे व्यवहारांत नेहमी दृष्टीला पडणाऱ्या गोष्टी असतात, आणि अशा गोष्टींबद्दल केलेलें विधान पुढें म्हण म्हणून वापरलें जातें. उदाहरणार्थ खाली म्हणी आणि वाक्प्रचार पहा. १) तेरड्याचे रंग तीन दिवस :- तेरडा म्हणून एक लहान झुडूप आहे. त्याची फुलें फार भपकेदार असतात. आज त्या फुलांचे जे रंग असतात ते उद्या वेगळे होतात. उद्याचे रंग परवाला बदलतात. पण तीन दिवसानंतर हे रंग कांही टिकत नाहींत. त्यावरून एखादा मनुष्य एखा गोष्ट शेवटपर्यंत पुरी करीत नसला, पण सुरवातीला मात्र त्याविषयी फा गाजावाजा करीत असला की त्याच्या संबधीं ही म्हण वापरतात. तेरड्याच्या फुलांचे रंग जरी भपकेदार असले तरी ते जसे तीन दिवसच टिकतात त्याप्रमाणें ह्या अशा मनुष्यानें कोणत्याहि कामाची सुरवात फा मोठ्या उत्साहानें केली तरी तो तें काम शेवटपर्यंत पुरें करण्याची ~~शक्य~~ शकयता नाही.

२) कोंबडा झाकला म्हणून सूर्य उगवयचा थांबत नाहीं :- ह्या म्हणीच्या स्पष्टीकरणाकरितां पुढील गोष्ट सांगण्यासारखी आहे. एका गांवात एक म्हातारी रहात असे. तिला दोन सुना होत्या. म्हातारीजवळ एक कोंबडा होता. तो रोज पहाटे लवकर आरवत असे. तो आरवला की म्हातारी उठून सुनांना उठवीत असे आणि त्यांना कामाला लावीत असे. तेव्हां सुनांनी एक दिवस विचार केला की आपण कोंबडा झाकला की त्याला उजाडलेलें दिसणार नाही, आणि तो आरवणार नाही; मग म्हातारी उठून आपल्याला कामाला लावणार नाहीं. तेव्हां त्यांनी कोंबडा रात्रीं झाकून ठेवला. तरीपण सूर्य उगवल्यावर म्हातारी उठलीच आणि तिनें सुनांना उठवून कामाला लावलें. तेव्हां एखादी गोष्ट होणार असली तर ती क्षुल्लक अडथळ्यांना जुमानीत नाहीं अशा अर्थानें ही म्हण वापरली जाते.

3) अति तेथें माती :- ह्या म्हणीच्या स्पष्टीकरणा करता पुढील गोष्ट सांगण्या सारखी आहे. एकदा एका गांवांत एक भिकारी होता. तो गांवांत भिक्षा मागून निर्वाह करीत असे. एक दिवस त्याला कांहींच भिक्षा मिळाली नाहीं. तेव्हां तो गांवाबाहेर जाऊन एका झाडाखालीं रडत बसला. भिकाऱ्याला रडतांना पाहून देवाला त्याची दया आली आणि तो भिकाऱ्याच्या समोर उभा राहून त्याला म्हणाला, "अरे, तूं रडूं नकोस. तुला काय पाहिजे तें माग." भिकारी आनंदून म्हणाला, "देवा, मला खूपशा सोन्याच्या मोहरा द्या." देव म्हणाला, "तुझी झोळी कर पुढें. म्हणजे त्या झोळींत मी मोहोरा टाकतो. पण एक गोष्ट लक्षांत ठेव. ह्या मोहरो जमीनीवर पडल्या तर त्यांची माती होईल." भिकारी म्हणाला, "बरें आहे देवा." आणि असें म्हणून त्यानें आपली झोळी पुढें केली. देवानें झोळीत मोहोरा टाकायला सुरवात केली. झोळी अर्धी अधिक भरल्यावर देव म्हणाला, "पुरे का" भिकारी म्हणाला, "नाहीं देवा आणखी थोड्या मोहरा घाला." तेव्हां देवानें त्याची झोळी पुरती भरली. पण भिकाऱ्याला लोभ सुटला. तो म्हणाला, "देवा आणखी थोड्या मोहरा घाला." देव म्हणाला, "अरे पण तुझी झोळी फार जुनी आहे. अधिक मोहरा घातल्या तर ती फाटेल." तो आणखी थोड्या मोहरा घालतो तोंच 'टर्र्र्' असा आवाज होऊन झोळी फाटली आणि सर्व मोहरा खालती मातीत पडल्या. भिकारी खालीं पाहतो तो काय? सर्व मोहरांची माती झालेली! त्यानें वर पाहिलें तो देव केव्हांच अदृश्य झाला होता. तेव्हां मात्र भिकाऱ्याला अति लोभ केल्याबद्दल पश्चात्ताप झाला. पण आता काय उपयोग हे तेव्हां कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक केला कीं त्याचा परिणाम दुःखका होतो.

Vocabulary and Notes.

भाषा - Bhaṣa (F) = Language
म्हणी - Mhaṇi: (F.pl.) = Sayings; proverbs. (sg. म्हण Mhaṇ (F))
दंतकथा - Dantakatha (F) = Legend; Anecdote.
व्यवहार - wyawahar (M) = Transaction; Everyday life.
विधान - widhan (N) = Statement.
वाक्प्रचार - wakpračar (M) = Saying; A sentence of tradition.
तेरडा - (M) = A flower tree.
झुडूप - Zhuḍu:p (N) = Bush.
Bhapkedar - Bhapkedar (A) = Pompous; showy.
बदलतात - Badaltat (बदलणे - badal-I/T) = To change.
वापरतात - Wapartat (वापर - wapar T) = To use.
सुरवात - Surwat (F) = Beginning
उत्साहाने - utsahne = with enthusiasm (उत्साह - utsaha (M) enthusiasm)
कोंबडा - Kombaḍa/Kemḍa (M) = Cock.
झाकला - Zhak-la (झाक - Zhak-T) = To cover.
म्हातारी - Mhatari: (F) = old woman.
सुना - Suna (F pl.) = Daughter-in-laws (sg. सून su:n)
आरवत - araw-arwat (I) = To utter a cry.
क्षुल्लक - kšullak (A) = Minor; small; unimportant.
अडथळा - aḍthaḷa (M) = Obstacle.
जुमान - Juman (I) = To care; To be respectful of; To be a paid of.
अति - ati (A) = Too much.
माती = Mati: (F) = Earth.
भिकारी - Bhikari: (M) = Begger
भिक्षा - Bhikša (F) = Begging; Food offered to beggers.
झोळी - Zhoḷi: (F) = A bag made by tying the ends of a square piece of cloth.

मोहोर / मोहर Mohor/Mohər (F) = Coin.
पूर्ण Purṇə (A) = complete.
लोभ सुटे - lobh sut- = To become greedy.
अदृश्य हो - ədrussyə ho - = To disappear.
अतिरेक - ~~atirək~~ ətirek (M) = Extremity.
परिणाम - Pərinạm (M) = Result.
दुःखकारक - Duhkkhə karək / Dukkhəkarək : sorrowful, painful. miserable.

Notes.

1) म्हणीमागे कांहींना कांहींतरी इतिहास असतो
There is some sort of (of one kind or another) history behi the proverbs.

२) नेहमी दृष्टीला पडणाऱ्या गोष्टी.....
Things always noticeable; things always apparent......;

3) म्हातारी सुनांना कामाला लावीत असे.
The old woman used to put daughter-in-laws to work.

4) पुढील गोष्ट सांगण्यासारखी आहे.
The following story is worth narrating.

5) तो भिक्षा मागून निर्वाह करीत असे.
He used to maintain (himself) by begging.

6) देवाला त्याची दया आली.
God felt pity for him; God pitied him

7) लक्षात ठेव.
Remember.

8) भिकारी खाली पाहतो तो काय?
The begger looked down and then what.

EXERCISES.

A) Answer the following questions in complete Marathi Sentences.

1) What is there behind most of the proverbs?
2) How long do the colours of तेरडा flowers last?
3) What did the old woman use to do?
4) What did the daughters-in-law, decide to do?
5) In what sense is the proverb 'आलि तेवां माती' used?
6) Why did the begger cry?
7) Who stood in front of the begger?
8) What did the God offer to the begger?
9) What happened when all the gold coins fell on the ground?
10) In what sense is the proverb 'तेरड्याचे रंग तीन दिवस' is used?

B) Fill in the followings blanks with appropriate words.

1) मराठी ..... अनेक ..... आहेत.
2) ह्या फुलाचे रंग फार ...... आहेत.
3) एका ..... एक म्हतारी राहात .....
4) सकाळी कोंबडा .... की म्हातारी सहासक ...... सुनांना .... असे.
5) कोणत्या ..... ही म्हण ..... जाते?
6) त्याची झोळी फार ...... आहे
7) खेळतांना मासी विस्पार .....
8) तूं त्या .... खाली ..... रहा
9) मी काल .... शाळेत जायला ... केली
10) त्याचें पुस्तक ...... वर पडलें.

P.T.O.

c) Translate the following sentences into English.

1) कांही फुलांचें रंग रोज बदलतात.
2) तो हें काम शेवटपर्यंत पुरें करणार नाही.
3) उद्यापासून आम्ही पहाटे लवकर उठणार आहोत.
4) सूर्य उगवल्यावर पक्षी उडू लागतात.
5) तुला काय पाहिजे ते मला सांग.
6) माझ्या चपला जुन्या आहेत.
7) तो वाटेतल्या अडथळ्यांना न जुमानतां पुढें गेला.
8) तुमचें हें विधान चुकीचें आहे.
9) आपण आता कामाला सुरवात करूया.
10) तुम्ही मराठी बोलताना पुष्कळ म्हणी वापरतां कां?

संत एकनाथ

सुमारे चारशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत एक मोठे संत होऊन गेले. त्यांचे नांव एकनाथ महाराज ते गोदावरी नदीच्या कांठी पैठण ह्या गांवी रहात असत म्हणून त्यांचे आडनांव पैठणकर असें नांव पडलें. त्यांनी लहानपणा पासून देवाची भक्ती केली. त्या कालांत बहुतेक संस्कृत भाषेंत रचना करीत. मराठी भाषेंत काव्यरचना करणें कमीपणाचें समजलें जात असे. एकनाथ महाराजांना संस्कृत चांगले येत होतें. पण त्यांना मराठी भाषेचा फार अभिमान होता. म्हणून त्यांनी मराठीतच आपली सर्व काव्यरचना केली. एके ठिकाणी तर आपल्या काव्यांत त्यांनी "संस्कृत भाषा जर देवांनी निर्माण केली तर मराठी भाषा काय चोरांपासून निर्माण झाली की काय? ती पण देवांनीच निर्माण केली" अशा अर्थाचे अभिमानाचे उद्गार काढले आहेत. एकनाथ सर्व माणसें ही देवाची लेकरें आहेत असें समजत. आणि म्हणून सर्वांना सारखीच वागणूक द्यावी असें त्यांना वाटे. देवाची भक्ती करण्याचा सर्वांना अधिकार आहे असें ते म्हणत. एकनाथ फार दयाळू होते त्यांच्या दयाळूपणाच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत.

एकदा एकनाथ गोदावरी नदीवर आंघोळीकरितां जात होते. आंघोळ करून घरीं परततांना त्यांना वाळवें वाळवंटात एक लहान मूल रडतांना आढळलें. त्याच्याजवळून अनेक लोक जात होते. पण कोणीहि त्याला उचलीत नव्हतें. हळूहळू दुपार होऊं लागली होती. सूर्याच्या प्रखर उन्हानें वाळू तापून पायाला चटके बसत होते. पण तें मूल वाळवंटांत असें रडत असतांना कोणीहि उचलीत नव्हतें. ते पाहून एकनाथांना फार वाईट वाटलें. त्यांनी जाणारे लोक त्या मुलाच्या जवळ जाऊन त्याला उचलून कडेवर घेतलें. तें पाहून बाजूनें जाणारे लोक त्यांना म्हणाले, "अहो हें काय केलेंत? तें मूल महाराचें आहे. त्याला शिवलात तुम्ही! विटाळ सालाना तुम्हाला! आता आंघोळ करावी लागेल." एकनाथ म्हणाले, "ते गरीब बिचारें मूल! महाराचें असलें म्हणून त्याला काय वाळवंटात टाकून द्यायचें? मी त्याला महारवाड्यांत पोचवून येतो. पुन्हा

आंघोळ करावी लागली तरी कांही हरकत नाही." म्हटल्याप्रमाणे एकनाथांनी त्या मुलाला तपास करून त्याच्या घरी पोचवलें आणि परत गोदावरी नदीवर येऊन पुन्हा आंघोळ केल्यावार केल्यावर ते घरीं गेले.

एकदा एकनाथ गंगेची कावड घेऊन आपल्या कांही शिष्यांबरोबर काशीहून रामेश्वराला चालले होते. गंगेचे पाणी रामेश्वराला नेऊन समुद्रांत ओतलें की पुण्य लागतें अशी समजूत आहे. एकनाथ देवाचें नाव घेत पुढें चालले होते आणि त्यांचे शिष्य मागून येत होते. रामेश्वर अगदी जवळ आले होते. इतक्यांत वाळवंटात एक एक गाढव गडबडा लोळतांना एकनाथांना दिसलें. ते उन्हाळ्याचे दिवस होते आणि ती दुपारची वेळ होती. जवळपास पाणी न मिळाल्यानें तें गाढव सारखें तडफडत होतें. तें पाहून एकनाथांना त्याची फार दया आली आणि त्यांनीं कावडीतलें गंगेचें पाणी त्या ~~आधु~~ गाढवाच्या तोंडांत ओतलें. बरेचसें पाणी पोटांत गेल्यावर गाढवाला हुशारी वाटली आणि टुणकन् उडी मारून तें उभें राहिलें. एकनाथांना आनंद झा मागून येणाऱ्या शिष्यांनी हें पाहिलें आणि ते ओरडून म्हणाले, "काय केलेंत महाराज! इतक्या दुरून आणलेलें गंगेचें पाणी आप गाढवाला पाजलेत? आता यात्रा अपुरी राहिलीना आपली! ~~ओ~~ थोडक्यासाठीं केवढें पुण्य दवडलेंत महाराज!"

एकनाथ हसून म्हणाले, "मरता जीव वाचविण्यापेक्षां अधिक मोठें पुण्य ते कोणतें? ह्या गाढवाचा प्राण वाचवून मला जेवढें पुण्य मिळालें तेवढें ही गंगेची कावड रामेश्वराला नेण्यानें खास मिळालें नसतें. माझी यात्रा आजच खरोखर सफळ झाली!"

सगळे शिष्य गप्प बसले आणि आनंदानें उड्या मारीत निघून गेले.

Vocabulary and Notes

आडनांव = aḍ naw (N) : Family name.
भक्ती = Bhakti (F) = worship.
बहुतेकजण – Bahutekjan : Majority of the people. Almost everybody.
कमीपणा – Kami:paṇa (M) = Degradation.
निर्माण कर – Nirman kar – : To create.
उद्गार – udgar (M) = utterance.
लोकरें – lekre sg. lekru: (N) = children sg. child.
अधिकार – adhikar (M) = Right, privilege.
आंघोळ – anghoḷ (F) = Bath.
वाळवंट – waḷ wanṭ-a (N) = Desert.
दुपार – dupar (F) = Afternoon
वाळू – waḷu : (F) = Sand.
चटका – caṭka (M) = Shock; burn.
वाईट वाट – wai:ṭ waṭ = To feel sorry.
महार – Mahar (A) – untouchable
शिव – Šiw (T) = To touch; To sow.
गरीब बिचारा – garibbičar-a (A) = Poor and miserable.
तपास – tapas (M) = Enquiry; investigation.
कावड – Kawaḍ (F) = A bamboo lath for carrying pitchers etc.
शिष्य – Šiṣya (M) = Pupil.
पुण्य – Puṇya (N) = Religious merit.
समजूत – Samju:t (F) = Belief
गाढव – gadhaw (N) = An ass.

गडबडा - gad bada = Rapidly. (गडबड gad bad (F) = Combination)

लोळ = lol (I) = To roll over and over.

उन्हाळा - unhala (M) = Summer.

जवळपास - Jawalpas = Nearby

तडफड - tad phad (F) = Chatting.

दया - daya (F) = Duty

हुशारी - husari (F) = Freshness, cleverness.

टुणकन - tun kan (Adv) = quickly.

ओरड = Orad (I) = To shout

पाज - Paj- (T) = To give to drink.

सफळ - saphal = Fruitful.

1) त्याला इंग्रजी भाषा चांगली येत होती.

He knew English well.

2) एकनाथांनी असे उद्गार काढले आहेत.

Eknath has said thus.

3) एकनाथाला मुलाचा विटाळ झाला.

Eknath became polluted due to the child.

4) तुमच्याकडे आयला माझी काही हरकत नाही.

I do not mind coming to your house.

5) रामेश्वर was very close.

6) 2 Rameshwar was very close.

सगळे शिष्य गप्प बसले.

All pupils kept quiet.

EXERCISES.

I) Fill in the blanks with appropriate words.

1) माझी मराठी भाषेच्या . . . . . . आहे.
2) इकडे इकडे . . . . . इकडे . . . .
3) त्याला तुझाला . . . . . मला काह . . . . . वाटले.
4) उन्हाळ्यात वाळू . . . . तिच्यावरुन . . . . पायाला लागे.
5) मी मंदिर . . . . जाऊन . . . . गेलो.
6) [illegible] . . . . मी मला हुशारी . . . . . .
7) [illegible] . . . . औषधीचा . . . . करूया.
8) [illegible] [illegible] . . . . [illegible].
9) . . . . [illegible] [illegible] तुझी डोक्याला . . . . होतो.
10) [illegible] [illegible] . . . . [illegible] देवाची लेकरे आहेत . . समजात.

II) Translate the following sentences into English.

1) मी [illegible] [illegible] राहतो.
2) आपण मराठी [illegible] बोलता का?
3) मी रोज [illegible] इंग्लिशला जातो.
4) [illegible] [illegible] पाय [illegible] चालतो आहे.
5) आपण सर्व देवाचे लेकरे आहोत.
6) तुम्ही [illegible] कुठे पाणी मिळते का पहा.
7) मी [illegible] [illegible] [illegible] ऐकून उठून उभा राहिला.
8) [illegible] [illegible] मोठ्या हुशारीने [illegible] [illegible] प्राण वाचविला.
   त्याला [illegible] [illegible] 'हंसोबा' असे नाव दिले.
9) [illegible] 'सर्वज्ञ सहारा' नावाचे एक छोटे वाक्य आहे.

III) Answer the following questions in complete Marathi Sentences.

P.T.O.

1) [illegible] एकनाथ [illegible] ?
2) What was his family name?
3) Why did एकनाथ write all his poetry in Marathi?
4) What was एकनाथ's belief?
5) What did एकनाथ see when he was going to the river for a bath?
6) What did एकनाथ do?
7) What was the comment of the people?
8) What was the belief in connection with the water of the river of [illegible]
9) What did एकनाथ do when he saw a donkey
10) What was एकनाथ's reply to his pupils' comment
11) Why did एकनाथ feel pity for the donkey?

आमच्या वाड्यांत आज सकाळपासून नुसती गडबड उडाली होती. शेजारच्या मालतीचें लग्न होतें आज. तीन आठवड्यापुर्वी तिला पहायला आलेल्या तरुणानें तिला पसंत केली आणि मालतीलाहि तो तरुण पसंत पडला होता. मालतीचे भावी यजमान मुंबईला एका फर्ममध्ये काम करतात आणि त्यांना पगारहि चांगला मिळतो. मालती दिसायला सुरेख असल्यानें आणि तिचें शिक्षणहि झालेलं असल्यानें ती त्यांना पसंत पडली होती. मालतीच्या वडिलांनीं दोन हजार रुपये हुंडा देऊन शिवाय दोन्हीकडचा खर्च करण्याचें कबूल केलें होतें.

लग्न वाड्यातच करण्याचें ठरलें होतें आणि त्यामुळे वाड्याच्या मधल्या पटांगणात एक प्रशस्त मांडव घातलेला होता. मांडवाला सर्व बाजूनीं कनाती लावलेल्या होत्या. प्रवेशद्वारावर केळीच्या खांबांचीं तोरणें बांधलेलीं होतीं. मुहूर्त सकाळीं अकरा वाजताचा होता आणि म्हणून सकाळपासून गडबड चालली होती. नवऱ्या मुलाकडच्या लोकांनाहि वाड्यात उतरायला जागा दिलेली. सकाळपासून सनईचे मंजुळ स्वर वाड्यांत घुमत होते. बरोबर चौघडाहि होता. मालतीच्या नातेवाईकांनीं घर भरून गेलें होतें. ठिकठिकाणच्या गांवाहून त्यांची नातेवाईक मंडळी आली होती. क संध्याकाळीं देवक बसवलें होतें. मालती आपल्या घरांत न्हाऊन आणि भरजरी पातळ नेसून आपल्या देवकासमोर बसली होती. तिं मुंडावळ्याहि बांधल्या होत्या आणि भटजींच्या सांगण्याप्रमाणें ती निरनिराळे विधी करीत होती.

सुमारे दव दहा वाजल्यानंतर नवरदेव आपल्या नातेवाईक आणि मित्रमंडळीसह मंडपांत आले. ते वाड्यातूनच आल्याकारणानें मिरवणूक काढण्याचा प्रश्न नव्हता. नाहीतर पुष्कळ वेळां नवरदेव घोड्यावरून किंवा मोटारीतून लग्नस्थळी येतात. वसंत रावांनीं - हे मालतीच्या भावी यजमानांचें नांव - डोक्याला मुंडावळ्या बांधल्या होत्या आणि ते धोतर नेसले होते. मुहूर्ताची वेळ होताच मालतीला मांडवांत आणण्यांत आलें.

त्या आधीचे कांहीं विधी वसतरा आध्यायांनी उरकून घेतले होते. मालतीला आणि वसंतरावाला एकमेकासमोर पाटावर उभें करण्यांत आलें. अक्षता वाटल्या गेल्या आणि त्या दोघांच्या मध्यें अंतरपाट धरण्यांत आला. दोघांच्याहि हातांत फुलांच्या माळा होत्या. मुहूर्त जवळ येताच भटजींनी मंगलाष्टकें म्हणायला सुरवात केली आणि प्रत्येक मंगलाष्टक पूर्ण होताच वधुवरावर अक्षता पडत होत्या. अखेर बरोबर मुहूर्ताच्या वेळेवर मंगलाष्टकें संपून अंतरपाट दूर झाला आणि प्रथम मालतीनें वसंतरावांना माळ घातली व मग त्यांनी तिला माळ घातली. बाहेर चौघडा आणि सनई पुन्हा वाजूं लागली. अनेक मित्रमंडळींनी आणि नातेवाईकांनी दोघांचे अभिनंदन केलें. लग्न लागल्यावर इतर अनेक विधी झाले. त्यांत सप्तपदी, लाजाहोम वगैरे विधी होते. दुपारी जेवणावळ होती आणि दोनदोनशे लोकांच्या जवळ जवळ तीनचार पंगती उठल्या. मालती आणि वसंतराव पहिल्या पंगतीत जेवायला बसली आणि दोघांनी उखाणें घेऊन एकमेकांची नांवें घेतली. संध्याकाळीं चार ते सहा पानसुपारी होती. त्याकरितां मंडपांत खुर्च्या मांडलेल्या होत्या आणि वधुवरांना बसण्याकरितां एक कोच होता. पानसुपारीला येणाऱ्या लोकांकरितां पानसुपारी, गुलाबाची फुलें, अत्तर, उसाचा रस आणि नारळ [illegible] वस्तूंची तयारी होती. चार वाजतां मालती आणि वसंतराव कोचावर येऊन बसली. लोक हळूहळू येऊं लागले. प्रत्येकजण प्रथम वधुवराजवळ जाऊन त्यांचे अभिनंदन करी आणि आणलेले भेट त्यांना देऊन मग खुर्चीवर बसे. मग प्रथम पानसुपारी, आणि गुलाबाचें फूल दिलें जात असे. त्यानंतर अत्तर लावून गुलाबपाणी शिंपडलें जाई व उसाच्या रसाचा पेला दिला जाई. मंडपातून बाहेर पडतांना प्रत्येकाला नारळ मिळे. संध्याकाळपर्यंत जवळ जवळ हजारेक लोक येऊन गेले. वधुवरांना बऱ्याच भेटी मिळाल्या.

संध्याकाळची जेवणें झाल्यावर रात्री वरात निघाली. वरातीनंतर त्याच रात्रीं वसंतरावांना मुंबईला परत जायचें होतें. तेव्हां त्यांना निरोप देण्यांत आला आणि मालती आणी वसंतराव मुंबईला गेली. अशा रीतीनें मालतीचें लग्न पार पडलें. वाड्यांतल्या सगळ्या लोकांचें मत पडलें कीं लग्नसमारंभ फार थाटाचा झाला.

Vocabulary and Notes.

लग्न - Ləgnə (N) = Marriage.
समारंभ - Səmarəmbhə: (M) = Ceremony.
यजमान - Yajman (M) : Host; Husband.
पसंत कर - Pəsant' kar : To approve
पसंत पड = ~~To like~~ Pəsant' Pəd : To like.
पगार - Pəgar = Salary
हुंडा - Huṇda = Dowry.
कबूल कर - Kəbul kar = To agree to
प्रशस्त - Prəśəstə (A) = spacious - large.
मांडव - Maṇdaw (M) = Pendal - Shamiyana.
कनात - Kənat (F) = A tent - a wall.
प्रवेशद्वार - Prəweśdwar (N) = Entrance
केळ - Keḷ (F) = Banana plant
खांब - Kham (M) = Pole
तोरण - Torəṇ (N) = A piece of docaration on festive occasion.
मुहूर्त - Muhu:rtə (M) = An auspicious time.
सनई - Sənai: (F) = Clarinet.
मंजुळ - Mənjuḷ (A) = sweet; soft; pleasant
स्वर - Swər (M) = Tune
घुम - ghum - (I) = To echoe; To spread
चौघडा - ~~cho~~ cəwghəda (M) = Drum.
नातेवाईक - Natewai:k (M) : Relative
न्हा - Nha - (I) = To bathe (used only for women's bathing)
भरजरी - Bhərjəri: = Composed wholly of gold or silver threads.

पातळ - Patal (N) = A item Sari

देवक - dewak (N) = A term for the deity worshipped at marriage.

मुंडावळ - Mundawal (F) = Flowers or beads bound around the brow of a bridegroom or bride at a marriage.

भटजी = bhatji (M) = Priest.

विधी - widhi: (M) = Religious act.

नवरदेव - Nawardew (M) = Bridegroom.

घोडा - ghoda (M) = Horse.

धोतर - Dhotar (N) = a piece of white clothes ten yard long.

उपाध्याय - upadhyay (M) = See भटजी above

पाट - Pat (M) = A wooden seat.

अक्षत - akšat (F) = Consecrated rice.

अंतरपट - antarpat (M) = curtain held between bride and bridegroom.

मंगलाष्टक - mangalastak (N) = a stanza recited at marriage.

वधूवर - wadhu-war (M) = Bride (and) Bridegroom.

मित्रमंडळी - Mitra mandali: (F) = A stanza recited at marriage.

अभिनंदन कर - abhinandan kar = To congratulate

सप्तपदी - saptapadi: (F)
लाजाहोम - lajahom (M) } Religious act's performed at marriage.

जेवणावळ - Jewanawal (F) = Feast.

पंगत - Pangat (F) = Row or line of people sitting down at a meal.

उखाणा - ukhana (M) = Riddle.

पानसुपारी - Pansupari: (F) = Bettle leaf and Bettlenut - Reception.

गुलाब - Gulab (M) = Rose.

अत्तर - Attar (N) = Perfume.
ऊस - U:s (M) = sugar cane.
रस - Rass (M) = Juice
पेला - pela (M) = glass
नारळ - Naral (M) = Cocoanut.
भेट - Bhet (F) = Present; visit.
वरात - warat (F) = A marriage procession.

1) आज शाळेत नुसती गडबड उडाली होती.
There was lot of commotion in the school today.
2) मुहूर्त सकाळीं अकरा वाजतांचा होता.
The auspicious time was set at 11 A.M.
3) त्यांना वरात उतरायला जागा दिली होती
They were allowed to stay in the house.
4) मिरवणूक काढण्याचा प्रश्न नव्हता.
There was no problem of marriage procession; or There was not going to be a procession.
5) जेवणावळीच्या दोन पंक्ती उठल्या.
There were two rows of people who ate at the feast.
6) लोक हळूहळूं येऊ लागलें.
Slowly, people started arriving.
7) जवळ जवळ एक हजार लोक आले.
Approximately one thousand persons came.
8) लोकांचें मत पडलें कीं तो हुशार आहे.
It was the opinion of the people that he was clever.
9) त्याचें काम पार पडलें
This work (job) was successful (or successfully over).

10) त्याने प्रथम आंघोळ उरकून घेतली.
He First Finished taking bath.

12) ठिकठिकाणच्या गांवाहून लोक आलेला होते
The people had come to the pilgrimage from various towns.

EXERCISES.

A) Fill in the blanks with appropriate words.

1) लग्न .... करण्याचें .... होतें आणि म्हणून एक .. मांडव .... होता.
2) लग्नाची वेळ ..... नवरदेव ----- वरून लग्नस्थळीं.
3) मित्रमंडळींनी आणि .... वधूवरांचें ..... केलें.
4) बहुतेक .... समारंभांत नारळ ..... जातात.
5) आमच्या गावाच्या ..... त्याला ब-याच --- मिळाल्या.
6) मुहूर्ताच्या .... वर मंगलाष्टकें .... अंतरपाट .. सोडलें
7) मुहूर्ताच्या आधी सर्वांना .... वाटल्या गेल्या आणि वधूवरांच्या मध्यें ..... धरण्यात आला.
8) माझ्या बहिणीच्या लग्नाला .... हजार लोक .... गेले.
9) लग्नाच्या आधी वधूवरांना .... बांधण्यात ....

B) Answer the following questions in complete Marathi sentences.

1) What did the Future husband of मालती do?
2) Why did he like मालती?
3) What did मालती's Father agree to?
4) When was the auspicious occasions of marriage?
5) What was distributed at the reception?
6) How did do many bridegrooms arrive at the place of marriage?
7) How was the bridegroom dressed?
8) What happened when the auspicious moment was reached?
9) What did the people coming to the reception do?
10) What was distributed before the marriage?
11) When was the cocoanut given to the guests?
12) What happened at the feast in the noon?

13) What was the time of reception?

C) Translate the Following sentences into Marathi.

1) My sister approved the young man who came to see her.

2) The bride was brought to the place of marriage when the auspicious moment arrived.

3) My brother received many presents (gift's) when he got married last year?

4) When my friend got married, many of his brothers his relatives attended the marriage

5) My father paid a dowry of Five thousand rupees at my sister's marriage.

6) After the marriage, many people congratulate the bride and bridegroom.

7) Many religious act's wore performed by the priest both before and after the marriage.

8) At first the bride garlanded the bridegroom and then he garlanded her.

महाराष्ट्र

महाराष्ट्र हा भारताच्या अनेक प्रांतांपैकी एक प्रांत आहे. महाराष्ट्रांत मुख्यत: मराठी भाषा बोलली जाते. महाराष्ट्र म्हणजे 'मोठे राष्ट्र'. हे नांव कसें पडलें ह्याविषयीं विद्वानांचे अनेक तर्क आहेत. कांहींच्या मतें 'मरहट्ट' ह्या शब्दावरून 'महाराष्ट्र' हे नांव पडलें. मराठीभाषिकांच्या जुन्या संस्कृत आणि प्राकृत ग्रंथांत 'मरहट्ट' ह्या नावानें उल्लेख केलेला आढळतो. कांहींच्या मतें सर्वात मोठा स्थूलाला म्हणजे 'मोठे राष्ट्र' किंवा 'विस्तृत राष्ट्र' म्हणून 'महाराष्ट्र' असें नांव पडलें. कांही विद्वानांचा असा तर्क आहे की 'महाराष्ट्री' भाषा बोलण्याच्या लोकांचा हा देश म्हणून 'महाराष्ट्र' असे नांव पडलें. मराठी भाषा देखिल महाराष्ट्री भाषेपासून झाली असा ह्या विद्वानांचा तर्क आहे. फार पूर्वी, म्हणजे इसवी सन पांचव्या शतकांत महाराष्ट्राचा 'दक्षिणापथ' असाही उल्लेख केलेला आढळतो. 'दक्षिणापथ' म्हणजे दक्षिण दिशेला जाण्याचा मार्ग. दक्षिणेकडे जाण्याच्या मार्गावर महाराष्ट्र देश असल्यानें कदाचित हें नांव पडलें असावें. मराठी भाषा बोलण्याच्या लोकांची संख्या सुमारे दोन कोटी सत्तर लक्ष आहे. मराठी भाषेत अनेक पोटभाषा किंवा बोली आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यत: तीन भाग पडतात. हे तीन भाग म्हणजे कोंकण, देश आणि वऱ्हाड. अरबी समुद्र आणि सह्याद्रि पर्वत ह्यांच्यामध्ये जी चिंचोळी पट्टी मुंबई शहरापासून खाली दक्षिणेकडे गोव्यापर्यंत जाते तिला 'कोंकण' असे म्हणतात. सह्याद्री पर्वताच्या पूर्वेचा जो अगदी लगतचा भाग आहे त्याला 'देश' असें म्हणतात. महाराष्ट्राचा जो अगदी ईशान्येकडचा प्रदेश आहे त्याला 'वऱ्हाड' असे नांव आहे.

महाराष्ट्रांत अनेक इतिहासप्रसिद्ध स्थळें आहेत. त्याचप्रमाणें अनेक मोठमोठीं शहरेंही आहेत. महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई शहर ही आहे. ह्याखेरीज पुणें, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, हीं इतर प्रसिद्ध शहरें आहेत. पुणे ही मराठी राज्याची पूर्वीची राजधानी होय. त्यावेळच्या राजांनी बांधलेल्या 'शनिवारवाडा' ह्या राजवाड्याचे बुरूज आणि भिंती अजूनही पुण्यांत पहावयास मिळतात. पुणे शहर हें महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र

समजलें जातें. पुणें समुद्रसपाटी पासून दोन हजार फूट उंचीवर आहे. त्यामुळें पुण्याची हवा फार कोरडी आणि आरोग्यदायक आहे. नाशिक पंढरपूर ही गांवें यात्रेचीं ठिकाणें म्हणून प्रसिद्ध आहेत. पंढरपूरला दरवर्षी दोन वेळा मोठी यात्रा असते आणि तेथील विठोबाच्या देवळाला हजारो लोक भेट देतात. नाशिक गांव गोदावरी नदीच्या कांठी आहे. नाशिकजवळ पंचवटी म्हणून ठिकाण आहे. राम, लक्ष्मण आणि सीता जेव्हां वनवासाला गेलीं तेव्हां इथें पंचवटीत झोपडी बांधून राहिली होतीं.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं शिवाजी महाराजांनीं बांधलेले अनेक किल्ले आहेत. त्याशिवाय मुंबईजवळ घारापुरी येथें कोरीव लेणीं आहेत. इथेंच जगप्रसिद्ध 'त्रिमूर्ती'चें लेणें आढळतें. त्याशिवाय अजंठा, कार्लें आणि भाजे येथील कोरीव लेणीं फार जुनीं आणि प्रसिद्ध आहेत. दरवर्षी हजारो लोक ह्या लेण्यांना भेटी देतात.

मराठी भाषेंतील पहिलें लिखित वाक्य श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या प्रचंड पुतळ्याच्या पायाशी कोरलेलें आढळतें. मराठी भाषेंत बाराव्या आणि तेराव्या शतकांत अनेक प्रकारचें वाङ्मय लिहिलें गे. ह्या सर्व साहित्यांत 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. 'ज्ञानेश्' ही संत ज्ञानेश्वरांनीं लिहिलेली भगवद्गीतेवरील टीका आहे. आजही अनेक लोक हा ग्रंथ मोठ्या भक्तिभावानें आणि आदरानें वाचतात. अठराव्या शतकापर्यंतचें बहुतेक मराठी वाङ्मय पद्य स्वरूपांत आहे. त्यानंतर गद्य वाङ्मयाला सुरुवात झाली. ह्यापैकीं बखरींमध्यें मराठ्यांच्या अनेक स्वाऱ्यांच्या हकिकती आढळतात.

एकोणिसाव्या शतकांत इंग्रजांनीं आपला अम्मल बसवल्यावर मराठी भाषिकांना इंग्रजी वाङ्मयाचा परिचय होऊं लागला आणि मग निबंध, नाटकें, कादंबऱ्या, प्रवासवर्णनें वगैरे गद्य रचना होऊं लागली. अनेक मासिकें सुरूं झालीं. त्यापैकीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं सुरू केलेलें 'निबंधमाला' हें मासिक त्या काळांत फार गाजलें. ह्या मासिकांतून चिपळूणकरांनी लोकांच्यात जागृती केली आणि मराठी भाषेचा अभिमान निर्माण केला.

ह्या काळांत आणि पुढें विसाव्या शतकांतु महाराष्ट्रांत अनेक समाजसुधारक झाले. रानडे, आगरकर, फुले, कर्वे ही

नांवें सांगण्यासारखी आहेत. ह्या सर्वांनी स्त्रियांना शिक्षण मिळावें, जातीभेद नष्ट व्हावा, आणि अनेक जुन्या आणि निरुपयोगी रूढी नाहीशा व्हाव्या म्हणून खटपट केली. महाराष्ट्रांत ह्या काळांत अनेक राजकीय पुढारी होऊन गेले. त्यांपैकी लोकमान्य टिळकांचे नांव आजही सर्वांना ठाऊक आहे. टिळकांनी 'केसरी' आणि 'मराठा' ही वर्तमानपत्रें सुरू करून आणि इतर अनेक संस्था स्थापन करून लोकांच्यांत राजकिय जागृती केली. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळवणारच" हा मंत्र त्यांनींच लोकांना शिकवला.

आजही महाराष्ट्र राज्य आपापल्या परीनें भारताच्या पंचवार्षिक आणि इतर विकास योजनांत भाग घेत आहे. आणि सहाय्य करीत आहे. महाराष्ट्र राज्यांत अनेक नवीन सुधारणा होत आहेत; नवीन कारखाने उघडले जात आहेत, नवीन धरणें बांधली जात आहेत. आणि मराठी भाषिक ह्या नवीन गोष्टींचे मोठ्या उत्साहानें स्वागत करीत आहेत. असा आहे हा महाराष्ट्र देश।

Vocabulary and Notes

प्रांत	Prantᵊ	(M)	=	Province; region
मुख्यत:	mukhyətah		=	Mainly
राष्ट्र	raṣṭrᵊ	(N)	=	Nation
विद्वान	Widwan	(M)	=	Scholar
तर्क	tərkə	(M)	=	Guess, estimate
भाषिक	bhaṣik	(M)	=	Speaker of a language, one who speaks the language
प्राकृत	Prakrit	(A)	=	Middle Indic
ग्रंथ	grenthᵊ	(M)	=	treatise; book
उल्लेख	ullekh	(M)	=	Mention
खुलासा	khulasa	(M)	=	Explanation
विस्तृत	wistrut	(A)	=	large; big
इसवी सन	iswi: sən	(M)	=	Christian Era; A.D
शतक	šətək	(N)	=	Century
सुमारे	sumare		=	Approximately
कदाचित	kədačit		=	Perhaps
कोट / कोटी	koṭ / koṭi:	(A)	=	Ten million
लाख	lakh	(A)	=	One hundred thousand
पोटभाषा	Poṭbhaṣa	(F)	=	Dialect
चिंचोळा	čincoḷa	(A)	=	Narrow
पट्टी	pəṭṭi:	(F)	=	Strip
दक्षिण	dekšiṇ	(F)	=	South
ईशान्य	i: šanyᵊ		=	

स्थळ sthəḷ (N) = Place; location
राज्य rajja (N) = Kingdom; state
राजधानी rajdhani (F) = Capital
राजवाडा rajwaḍa (M) = Palace
सांस्कृतिक sǎsuskritik (A) = Cultural
शैक्षणिक šəykšənik (A) = Educational
केंद्र Kendrᵊ (N) = Center
समुद्रसपाटी səmudrasəpati (F) = sea level
हवा həwa (F) = weather
आरोग्यदायक arogyadayək (A) = Healthy
यात्रा Yatra (F) = Pilgrimage
देऊळ deu:ḷ (N) = temple
ठिकाण ṭhikaṇ (N) = Place
कोरीव लेणी Koriw leṇi = Excavations
जुना jun-a (A) = Old; Ancient
लिखित likhit (A) = written
वाङ्मय waŋməy (N) = literature
साहित्य Sahityᵊ (N) = literature
टीका ṭi:ka (F) = Commentary; Criticism
भक्तीभाव bhəktibhaw (M) = Religious faith
आदर adər (M) = respect
पद्य pəddyᵊ (N) = ~~Prose~~ Poetry
गद्य gəddyᵊ (N) = Prose
बखर bəkhər (F) = An historical account
स्वारी swari: (F) = Conquest; attack
अम्मल amməl (M) = Rule; reign

मासिक	masik	(N)	= Magazine, journal
समाजसुधारक	Səmajsudharak	(A)	= Social reformer
जाती भेद	jəti: bhed	(M)	= Caste division, differences of Caste
नष्ट हो	nəṣṭə ho-		= To disappear, to vanish.
रूढी	ruḍhi:	(F)	= Tradition, custom
खटपट कर-	khəṭ pəṭ kər		= To attempt
वर्तमान पत्र	wətəman pətrə	(N)	= Newspaper.
संस्था	sə̃w̃stha	(F)	= Institution
जन्मसिद्ध	ǰənməsiddha	(A)	= Proved by birth, acquired by birth.
हक्क	həkkə	(M)	= Right; privilege
परीने	pərine		= of its accord
साहाय्य	səhayyə	(N)	= help
धरण	dhəraṇ	(N)	= Dam
स्वागत	swagət	(N)	= Welcome; reception
इतर	itər		= Other

1) अमेरिकेत इंग्रजी भाषा बोलली जाते.
English language is spoken in America.

2) कांहींच्या मतें अमेरिकेचा शोध कोलंबसनें लावला नाहीं
In the opinion of some (people) Columbus did not discover America.

3) त्या मासिकांत माझ्या नांवाचा उल्लेख केलेला आढळला.
In that magazine the mention of my name is found.

4) अमेरिका हे नांव कसें पडलें असावें ?
How has the name 'America' been given?

5) ह्या देशाला 'अमेरिका' असें म्हणतात
This country is called 'America'.

6) वॉशिंग्टन डी. सी. हे अमेरिकेची राजधानी होय.
Washington D. C. is the Capital of America.
This particular form is used when a statement is to be made about some historical fact. Howeve the form होय is not always interchangeable with the present tense form आहे (ahe) of the verb 'to be

7) अमेरिकेत सगळीकडे उंच इमारती पहावयास मिळतात.
Tall buildings are readily seen everywhere in America.

8) न्यु यॉर्क हे अमेरिकेचें सांस्कृतिक केंद्र समजलें जाते.
New York is recognized as the cultural center of America.

9) हिंदुस्थानात अलीकडे मोटारी तयार करण्यास सुरवात झाली आहे.
Recently the manufacturing of cars has begun in India.

10) ह्या काळांत आणि पुढें विसाव्या शतकांत महाराष्ट्रांत अनेक समाजसुधारक झाले.
During this period and later on in the twentieth century there were many social reformers in India.

11) अमेरिकाच्या इतिहास लिंकन, वॉशिंग्टन, ही नांवें सांगण्यासारखीं आहेत.
In the history of America the names like Lincoln, Washington are worth mentioning.

12) भारतानें पोहोण्याच्या शर्यतींत भाग घेतला.
India participated in the swimming competition.

EXERCISES

A) ANSWER THE FOLLOWING IN MARATHI.

1) How many people speak Marathi?
2) From what language did Marathi evolve?
3) Where is found the first written Marathi sentence?
4) How is the weather of the city of Poona?
5) What are the three main regions of Maharashtra
6) What is the capital of the state of Maharashtra?
7) In what form is most of Marathi literature up to the 18th century?
8) What kind of treatise is 'Dnyaneshwari'?
9) By what name was Maharashtra mentioned in the 5th century A.D?
10) What is the meaning of the word 'Maharashtra'?
11) Who were the social reformers of Maharashtra?
12) Which is the cultural center of Maharashtra
13) What did Lokmanya Tilak do?
14) Who started the magazine 'निबंधमाला'?
15) What are the new events taking place in Maharashtra?

B) FILL IN THE BLANKS WITH APPROPRIATE WORDS.

1) सह्याद्रि पर्वताच्या —— जो भाग आहे - - - देश - - -.
2) त्या वेळच्या राजानीं - - - देवळें अजूनहि - - - मिळतात.
3) दरवर्षी - - - लोक ह्या किल्ल्यांना भेटी - - -.
4) इंग्रजानीं आपला - - - बसवल्या - - - लोकांना इंग्रजी - - - परिचय - - - लागला.

5) महात्मा गांधी हे भारताचे मार्गाकय --- होते.
6) भारतातील सर्व --- पंचवार्षिक --- भाग घेत---
7) महात्मा गांधींनी जातीभेद नष्ट --- म्हणून --- केली.
8) मराठी भाषेत बाराव्या --- अनेक --- वाङ्मय --- गेले.
9) इंग्रजी भाषेत अनेक --- आहेत.
10) विस्कॉन्सिन हा अमेरिकेच्या अनेक --- पैकी एक --- आहे.
11) रशियाची --- मास्को --- आहे.
12) कांहींच्या --- मरहट्ट ह्या शब्द --- महाराष्ट्र --- नांव पडलें.
13) ज्ञानेश्वरी ही --- ज्ञानेश्वरांनी --- भगवद्गीतेवरील --- आहे.

C) USE THE FOLLOWING WORDS INTO SENTENCES.

1) उल्लेख 2) कदाचित् 3) केंद्र 4) लेणें 5) आपला
6) उंचीवर 7) ठाऊक 8) इतर 9) हक्क 10) पेय
11) विसाव्या 12) स्थापन.

गड आला पण सिंह गेला

पुणें शहरापासून जवळच सिंहगड म्हणून एक किल्ला आहे. हा किल्ला फार इतिहासप्रसिद्ध आहे. तुम्ही कधी पुण्याला गेलांत तर तो जरूर पाहून या. हा किल्ला बराच उंचावर आहे आणि किल्ल्यावर पोचायला बरेंच वर चढावें लागतें. तेव्हां पुष्कळ पायऱ्या चढण्याचा प्रथम सराव करा आणि मगच किल्ल्याला भेट द्या. अर्थात दुसरा मार्ग आहे वर चढण्याचा तो म्हणजे डोली करणें. ही डोली म्हणजे एक पालखीच असते. तींत तुम्ही बसलांत की दोन किंवा चार लोक ती उचलून तुम्हाला वर नेतात. चालण्याचा त्रास नाहीं कीं काहीं नाहीं. पण स्वत: किल्ला चढण्यांत जी मजा आहे ती ह्या डोली प्रवासात नाहीं.

ह्या किल्ल्याचे मुळचे नाव सिंहगड नाहीं काहीं। त्याचे पहिलें नांव 'कोंडाणा' असें होतें. त्याला मग सिंहगड नांव का पडलें ठाऊक आहे कां? नाही? मग सांगतोच तर तुम्हाला.

शिवाजी महाराजांनी मराठी राज्याची स्थापना केली तरी महाराष्ट्रातले सर्व किल्ले त्यांच्या ताब्यात नव्हते. कोंडाणा किल्ला हा मोगलांच्या ताब्यांत होता. त्यावेळी मोगलांच्या उदयभानू म्हणून राजपूत किल्लेदार होता तिथे. हा किल्ला उंचावर असून एका बाजूला खूप उंच कडा आहे. आणि सर्व बाजूला उदयभानूचा बंदोबस्त चांगलाच होता. कड्याच्या बाजूनें कोणी वर येण्याची शक्यता नसल्यानें त्या बाजूला बंदोबस्त साधारणच असे. पण एकंदरीत किल्ला जिंकून घ्यायला फार कठीण होता. हा किल्ला आपल्या ताब्यांत असावा असें शिवाजीमहाराजांच्या आईला, जिजाबाईला, वाटे. तेव्हां शिवाजी महाराज ही कामगिरी कोणावर सोपवावी ह्याचा विचार करूं लागले. तानाजी मालुसरे ह्या त्यांचा लहानपणापासूनचा मित्र होता. अनेक लढाईंत त्यानें महाराजांना मदत केली होती. शिवाय बऱ्याच दिवसांत त्याला कांही कामगिरी न मिळाल्यामुळें कुरकुर केली होतीच. तेव्हां महाराजांनी त्याला कोंडाणा घेण्याची कामगिरी द्यायचे ठरवलें. कर्मधर्मसंयोगानें तानाजी नेमका त्याचवेळी महाराजांना त्याच्या मुलाच्या लग्नाचें आमंत्रण द्यायला आला होता. तेव्हां महाराजांनी त्याला कामगिरीवर पाठवायचा बेत रद्द

केला, आणि दुसऱ्या कोणालातरी पाठवायचें ठरवलें. पण तानाजीला हें कळताच तो ऐकेना. तो म्हणाला "आधी कोंडाण्याचें लगीन लावूया. मग माझ्या रायबाचें." त्याचा मामा शेलार आणि भाऊ सूर्याजी ह्यांनीहि त्याला पाठिंबा दिला. अखेर महाराजांनी नाईलाजानें त्याला परवानगी दीली. किल्ला ताब्यांत आला कीं मोठा जाळ करून महाराजांना कळवायचें ठरलें.

एका अंधाऱ्या रात्रीं तानाजीनें आपले मावळे घेतले आणि तो ~~किल्ला~~ निघाला. सूर्याजीच्या हाताखाली त्यानें अर्धें सैन्य देऊन दुसऱ्या बाजूनें हल्ला करायला सांगितलें आणि स्वतः ज्या बाजूला उंच कडा होता त्या ठिकाणी जाऊन पोचला. तिथें पहारा कमी असल्यानें त्या बाजूने वर चढायचें ठरलें. त्या काळीं अशा कड्यावर घोरपड लावून चढत. ह्या घोरपडीच्या शेपटाला बळकट दोर बांधून तिला वर फेकीत. ती खडकांत घट्ट नखें रोवून बसे आणि मग शिपाई दोराला धरून वर चढत. तानाजीनें त्याची यशवंती नांवाची घोरपड वर फेकली. ती तशीच परत आली. पुष्कळांना हा अपशकुन झाला असें वाटलें, कारण यशवंती घोरपड अशी वर फेकल्यावर परत आली नव्हती. पण तानाजी असल्या अपशकुनाला जुमानणारा नव्हता. त्यानें पुन्हा घोरपड वर फेकली. ह्या वेळी मात्र ती खडकांत नखें रोवून बसत मावळे गुपचुप वर चढून गेले, आणि त्यांनी बेसावध पहारेकऱ्यांना कापून काढून दोनतीन बुरूज तर काबीज केले आणि बालेकिल्ल्यापर्यंत मजल मारली. पण इकडे सूर्याजीचा पत्ता नव्हता. उदयभानुला हल्ल्याची बातमी कळून तो स्वतः आपल्या रजपुतांसह लढायला बाहेर पडला. उदयभानु आणि तानाजी ह्यांचीच लढाई जुंपली. पण दुर्दैवानें लढता लढता तानाजीची ढाल तुटली. तेव्हां त्यानें डोक्याचें मुंडासें काढून त्याची ढाल केली. तरीपण उदयभानुनें त्याला वार करून त्या हात कापून काढला आणि त्याला जखमी केलें. तें पाहताच शेलारमामा चवताळून उदयभानुच्या अंगावर धावून आला. इकडे तानाजी पडलेला पाहताच मावळे पळूं लागले.

पण तेवढ्यांत आलेल्या सूर्याजीनें त्यांना प्रोत्साहन देऊन पुन्हा लढायला लावले. अखेर शेलारमामांनीं उदयभानुला ठार केलें आणि पहाटेच्या सुमारास किल्ला ताब्यांत आला. ठरल्याप्रमाणें जाळ करण्यांत आला आणि तो पहातांच महाराज स्वत: किल्ल्यावर आले. पण सगळ्यांचे सुतकी चेहरे पाहून त्यांना कांहींच कळेना. अखेर वर पोंचल्यावर त्यांना तानाजी मरण पावल्याची बातमी कळली. तें ऐकतांच महाराजांना अतिशय दुःख झालें. ते म्हणाले, "मी कोंडाणा मिळवला खरा. पण माझ्या सिंहासारख्या मित्र, माझा उजवा हात तानाजी मात्र मरण पावला. आजपासून ह्या किल्ल्याला मी 'सिंहगड' असें नांव देतो". तेव्हापासून कोंडाणा किल्ल्याला सिंहगड असें नांव पडले. पुढें महाराजांनी स्वत: जाऊन तानाजीच्या मुलाचें लग्न मोठ्या थाटामाटांत लावून दिलें.

Vocabulary and Notes

गड	gəḍ	(M)	= Castle, Fort
सिंह	sĩwhə	(M)	= Lion
किल्ला	Killa	(M)	= castle
पायरी	payri:	(F)	= Stop
सराव	səraw	(M)	= Practice
मार्ग	marg	(M)	= Way; path
डोली	ḍoli:	(F)	= A swinging cot carried by two or four men:
स्वतः	swətaha	(A)	= Self
प्रवास	prəwas	(M)	= Journey
ताबा	taba	(M)	= charge
कडा	kəḍa	(M) (F)	= Cliff Edge
किल्लेदार	Killedar	(M)	= Master of the Fort
बंदोबस्त	bəndobəstə	(M)	= checking; Security
कामगिरी	Kamgiri	(F)	= Assignment
कर्मधर्मसंयोग	Kərmədhərmə sə̃yyog	(M)	= Coincidence
आमंत्रण	aməntrəṇ	(N)	= Invitation
रद्द कर_	rədde kər_		= to cancel
पत्ता	pətta	(M)	= whereabout; address
लगीन	lagin	(N)	= Marriage
पाठिंबा	paṭhimba	(M)	= Support
नाईलाज	nai:laj	(M)	= Helplessness
जाळ	jaḷ	(M)	= Fire
पहारा	pəhara	(M)	= Watch; guard.

घोरपड ghorpəḍ (F) = An iguana

नख nəkh (N) = Finger nail

खडक Khəḍək (M) = Rock

अपशकुन əpšəku:n or əpəšəkun (M) = Bad omen

रोव् row (V I) = To enter into

(V. T) = To plant

गुपचुप gupčup = quietly

बेसावध bəsawədh (A) = Unattentive

बुरुज buru:j (M) = Bastion

बालेकिल्ला bale Killa (M) = The upper fort

हल्ला həlla (M) = Attack

ढाल dhal (F) = Shield

मुंडासे muṇḍase (N) = Turban

चवताळ cəwtaḷ (I) = To be wild, get angry

प्रोहात्सन protsahən (N) = Encouragement

पहाट pəhaṭ (F) = Dawn

सुतकी sutki: (A) = Sorrowful

चेहरा čehera or čehra (M) = Face

थाटमाट thaṭmaṭ (M) = splendour and magnificance.

1) गड आला पण सिंह गेला

The fort was captured but the lion was lost.

2) अमेरिकेंत मिसिसिपी म्हणून एक नदी आहे.

In America, there is a river by the name of Missipi.

3) अर्थात दुसरा मार्ग आहे वर चढण्याचा.

Of course there is another way to climb up.

4) मोटारीत बसल्यावर चालण्याचा त्रास नाहीं की काहीं नाहीं

Once we sit in the car there is no trouble of walking nor any other trouble.

5) तो त्याला नेमून दिलेलें काम साधारणच करतो.

He does not do so well in the job assigned to him.

6) एकंदरीत हें गांव फार छान आहे.

On the whole this is a nice town

7) त्याला वेळेवर चहा न मिळाल्यानें त्यानें कुरकुर केली

He complained because he did not get his tea in time.

8) तो आज शाळेंत तरी गेला. आता अभ्यास करतो की ते पाहू.

At least he went to school today. Now let us see if he studies.

9) तो चालून दमला. तरीपण तो थांबला नाही.
He became tired due to walking, even then he did not stop.

10) ती मुलगी रस्ता ओलांडीत होती, एवढ्यांत तिला मोटारीचा धक्का बसला.
just as that girl was crossing the street she was struck by a car.

11) कोंडाणा किल्ल्याला सिंहगड असे नांव पडलें.
Kondana fort began to be called Sĩw̃hagad.

Excercises

A) Answer the following in Marathi sentences.

1) Where is सिंहगड?
2) What was it called before?
3) What are the two ways of climbing up the fort?
4) Who was assigned the job of conquering the fort?
5) How did soldiers use to climb high cliffs in those days.
6) Who was in charge of the fort?
7) What happened when तानाजी tried to climb the cliff?
8) What happened when तानाजी and उदयभानु started fighting.
9) Why did तानाजी come to see शिवाजी when he was assigned the job?
10) When was the fort conquered?
11) What news did शिवाजी hear whe he reached the fort.
12) Why was the fort named सिंहगड.

B) Use the following into sentences.

1) प्रवास २) थाटमाट ३) तेव्हा 4) कीं 5) कांही
6) खूप 7) जरूर 8) मग ९) गुपचूप 10) स्वतः

c) Fill in the blanks with appropriate words:

1) तुम्ही रोज फिरायला जाण्याचा - - - करा.
2) हे कपाट - - - चार गडी - - -
3) तो - - - की - - - जाऊया
4) ह्या - - - सिंहगड नांव - - - पडलें - - - आहे का?
5) आम्ही त्याच्या - - - आमंत्रण - - - आलों आहोत.
6) त्या - - - उदयभानुनें तानाजीला - - - केलें.
7) मावळे - - - किल्ल्यावर चढून - - -
8) किल्ल्या - - - पोंचताच तानाजी मरण - - - बातमी कळली.
9) त्याला ही बातमी - - - तो - - - बाहेर - - -
10) तानाजी - - - अपशकुनांना - - - नव्हता.
11) माझा - - - सारखा मित्र - - - पावला.
12) शिवाजीनें तानाजीच्या - - - लग्न - - - थाटामाटांत लावून - - -.

गणेशोत्सव

भाद्रपद महिना अगदी जवळ आला होता. आमच्या शाळेंत नुसती गडबड उडाली होती. सगळे वर्ग गणेशोत्सवाच्या तयारीत गर्क होते. अभ्यासाकडे लक्ष द्यायला कुणालाच वेळ नव्हता. कडके गुरुजी वर्गात आले त्यावेळीं मुलें कागदाची फुलें करण्यांत गुंतली होतीं. "काय चाललें आहे?" गुरुजींनी मुलांना विचारलें. "आम्ही मखराकरतां फुलें करतो आहोत," काहीं मुलांनी उत्तर दिलें. "तुम्ही हीं फुलें करतां हें ठीक आहे पण गणेशोत्सव आपण कां साजरा करतो, गणपती ह्या देवाचें महत्व काय, वगैरे माहिती आहे कां तुम्हाला?" गुरुजींनी पुन्हा प्रश्न केला. मुलें एकमेकांकडे टकमक पाहूं लागली. कुणीच काहीं बोलेना. "अरे, गणेशोत्सव साजरा करण्याच्या आधीं निदान त्यासंबंधीं माहिती तरी मिळवा! चला, ह्या तासाला आपण गणेशोत्सवासंबंधी माहिती मिळवूया," गुरुजी म्हणाले. सर्व मुलें फुलें करण्याचें थांबुन आपापल्या जागेवर बसली आणि उत्सुकतेनें कडके गुरुजी काय सांगतात तें ऐकूं लागली.

"गणेश हा विद्येचा देव आहे. म्हणून आपण त्याची पूजा करतो. लहानपणीं तुम्ही लिहायला लागलात तेव्हां प्रथम काय लिहिलेंत पाटीवर? 'श्री गणेशाय नमः' त्याच्या अर्थ त्यावेळीं तुम्हाला कळला नसेल. पण त्याच्या अर्थ 'श्री गणेशाला आमचा नमस्कार असो' असा आहे. शिकायला सुरवात करण्याच्या आधीं ह्या विद्येच्या देवाला नमस्कार करायला हवा. गणेशाचें दुसरे नांव 'गणपती' असें आहे. ह्या दोनीं नांवांचा अर्थ 'गणांचा अधिपती, पुढारी' असा आहे. गणेश हा शंकरपार्वती ह्या देवदेवतेचा मुलगा. गणपतीचें वैशिष्ट्य म्हणजे माणसाच्या शरीरावर हत्तीचें डोकें. ह्या वैशिष्ट्यामागें एक गोष्ट आहे. पण ती मी पुढें कधीतरी सांगेन. गणेशोत्सव महाराष्ट्रांत सगळीकडे साजरा होतो.

भाद्रपद महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्याच्या चौथ्या दिवशी म्हणजे वद्य चतुर्थीला गणपतीची घरांत स्थापना करतात. घरीं आणलेला गणपती दीड दिवसापासून दहा दिवसापर्यंत ठेवला येतो. काहीं लोक तो दीड दिवस ठेवतात, कांहीजण तो पांच दिवस ठेवतात, कांहीजण तो सात दिवस ठेवतात तर कांहीजण दहा दिवस ठेवतात. पण दहा दिवसांपेक्षा अधिक मात्र तो ठेवतां येत नाहीं. गणपतीच्या मूर्ति मिळतात. अलीकडे कारागीर लोक गणपतीला निरनिराळ्या आधुनिक पोशाखांतही नटवतात. गणेशोत्सवाच्या आधीं दोन आठवडे एखाद्या गणपतीच्या कारखान्याला भेट द्या. म्हणजे नाना तऱ्हेचे, लहानमोठे, निरनिराळ्या पोशाखांत रंगवलेले गणपती तुम्हाला आढळतील. दहाव्या दिवशीं म्हणजे चतुर्दशीला गणपतीचें विसर्जन करतात. ह्या दहा दिवसांत गणपतीची सकाळसंध्याकाळ पूजा-अर्चा होते. तुम्ही प्रसाद मिळतो म्हणून आरतीकरितां रोज घरोघरीं जाता नाही कां? गणपतीचे ज्या दहाव्या दिवशीं विसर्जन करतात त्या दिवसाला 'अनंत चतुर्दशी' असे म्हणतात. गणपतीचें विसर्जन करणें म्हणजे गणपतीची मूर्ति पाण्यात नेऊन बुडवणें. ह्या दिवशीं आपल्या मुंबईशहरांत दुपारपासून समुद्राकडे लोकांची नुसती रीघ लागलेली असते. अनेक लहानमोठ्या मूर्ति मिरवीत आणतात. जर जवळपास समुद्र नसेल तर जवळपासच्या नदीवर किंवा तळ्यामध्यें मूर्तीचें विसर्जन करतात. आणि नदी किंवा तळे नसेल तर विहीरीमध्ये मूर्ती बुडवतात.

गणेशोत्सवाला खरें महत्व लोकमान्य टिळकांनी आणून दिलें. त्यांनीं ओळखलें कीं गणेशोत्सव लोकांच्यामधे राजकीय जागृती करण्यास फार उपयोगी आहे. म्हणून त्यांनीं ~~[illegible]~~ गणेशोत्सवांत व्याख्यानें, मेळे वगैरे कार्यक्रम करण्यास सुरवात केली. ह्या कार्यक्रमांमधून आणि मेळ्यांमधून त्यांनीं आपल्या देशाची पारतंत्र्यामुळे कशी दुर्दशा झाली

आहे हे लोकांना दाखवले. त्यामुळे ब्रिटीश सरकारने काही काळ ह्या मेळाव्यांवर बंदीहुकूम घातला होता. आज महाराष्ट्रात गणेशोत्सव घरोघरीही एवढ्या मोठ्या प्रमाणावर साजरा होतो त्याचे सर्व श्रेय लोकमान्य टिळकांनाच आहे. मुंबईसारख्या शहरात अनेक सार्वजनिक गणेशोत्सव साजरे होतात. वाडीवाडीतून वर्गणी गोळा केली जाते आणि दहा दिवसांत व्याख्याने, मेळे, नाटकं, सिनेमा आणि निरनिराळ्या स्पर्धाही वगैरे कार्यक्रम होतात. लोक ह्या निमित्ताने एकत्र येतात." गीतलाने गणेशोत्सवाची माहिती सांगून पूर्ण केली. मग ते म्हणाले, "आपल्या शाळेत कोणकोणत्या स्पर्धाही आहेत?"

"[illegible], वक्तृत्व, चित्रकला, निबंधलेखन इत्यादी स्पर्धाही आहेत" वासल म्हणाली.

"मग काय, यावेळी कोण कोण भाग घेणार आहेत?" गुरुजी म्हणाले.

"आम्ही सगळे घेणार आहोत" सगळी मुले ओरडली.

"शाबास," पाहू कोण अधिक बक्षीसे मिळवतो ते आणि आता कामाला लागा. आपल्या शाळेचे नांव उज्ज्वल व्हायला हवे. आणि त्यासाठी तयारी हवी नाही का?" गुरुजी म्हणाले.

मुले गडबडीने पुन्हा कामाला लागली.

Vocabulary & Notes

गणेश gaṇeś (M) = [illegible] god of learning and knowledge

उत्सव utsaw (M) = festival

गर्क होणे gark h. = to be busy

गुरुजी guruji (M) = teacher.

मखर makhar (M) = specially decorated, wooden frame,

देखावा [illegible] (N) = [illegible] with [illegible]

उत्सुकता utsukta (F) = curiosity, eagerness

विद्या vidyā (F) = knowledge

आहे ahe = [illegible]

अधिपती adhipati (M) = leader

पुढारी pudhari (M) = leader

वैशिष्ट्य or वैशिष्टय [illegible] = speciality

हत्ती hatti (M) = elephant

मांडणी करणे [illegible] = to get [illegible]

प्रसारण prasarana = publicity, [illegible]

रक्त rakta (N) = Blood

According to the Hindu calendar, a month is divided into two parts on the basis of increasing and decreasing amount of the moon. The period during which the moon becomes more and more visible is called शुक्ल Śukla = 'shukla' while the dark period when the moon decreases is called [illegible].

[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible] (n)	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]

दुर्दशा	durdəša	(F)	= Distressful Condition
सरकार	sərkar	(N)	= Government
बंदी	bəndi:	(F)	= Prohibition
श्रेय	šreyə	(N)	= Credit
वाडी	waḍi:	(F)	= A small Colony
वर्गणी	wərgəni	(F)	= Subscription
नाटक	naṭək	(N)	= play; drama
चढाओढ	cəḍhaoḍh	(F)	= Competition
वक्तृत्व	wəktrutvə	(N)	= Elocution; Debate
निबंधलेखन	nibəndh lekhən		= Essay writing
बक्षीस	bəkši:s	(N)	= Prize, Present
सुबक	subək	(A)	= Pretty
आरास	aras	(F)	= Decoration

1) कुणीच कांही बोलेना
Nobody could say anything

2) मी ही गोष्ट पुढें कधीतरी सांगेन
I shall tell this story sometime in future.

3) अमेरिकेत ख्रिसमसाचा सण साजरा होतो.
Christmas is celebrated in America.

4) ह्या शहरांत तुम्हांला उंच इमारती आढळतील
You will find tall buildings in this city.

5) टिळकांनी गणेशोत्सवाला महत्त्व आणून दिले.
Tilak gave importance to the festival of Ganesh.

6) महाराष्ट्रांत गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो.
The festival of Ganesh is celebrated on a large scale in Maharashtra.

7) लोक या निमित्तानें एकत्र येतात.
People get together on this account.

8) त्यानें गोष्ट सांगून पुरी केली.
He completed the narration of the story

9) मग काय, कोण कोण येणार आहेत माझ्याबरोबर?
So then, who is coming with me.

10. तो सकाळी उठून कामाला लागला.

After getting up in the morning he began working.

Excercises

A) Answer the following in Marathi Sentences

1) What were all the boys in the class doing?
2) What did the teacher say to the boys?
3) Who is the God of learning and knowledge?
4) What is the meaning of 'श्री गणेशाय नम:'?
5) When does the festival of Ganesh begin?
6) What is the special feature of Ganesh?
7) What do the people do on the tenth day of the festival?
8) For how many days can we keep the statue of Ganesh in the house?
9) What did Lokmanya Tilak do?
10) What happens in the city, of Bombay on the day of अनंतचतुर्दशी?
11) Who banned the plays?
12) What competitions were being held in the school.

B) Fill in the blanks with appropriate words:

1) भाद्रपद --- गणेशोत्सव साजरा ---
2) गणेश हा --- देव आहे.

3) आम्ही आमच्या --- दहा दिवस ---

4) ब्रिटीश सरकारने --- बंदी ---

5) कांही लोक --- त किंवा --- त [illegible] करतात.

6) गणेशोत्सवांत व्याख्याने, नाटके --- [illegible] ---

7) आमच्या वर्गातील --- मुले चित्र[illegible] --- भाग --- आहेत.

8) आम्ही काल गणपतीच्या --- [illegible]ट ---

9) लोकमान्य --- गणेशोत्सवा --- [illegible]

10) आज --- दुपार --- रांगडा --- [illegible] लागली आहे.

c) Translate the following into Marathi

1) The special feature of Ganesh is the head of an elephant over a man's body
2) Many statues are made in this factory
3) Mr. Nehru is a great leader of India
4) There are many wells in our [illegible]
5) Yesterday, we went to see a play
6) There was a big crowd at the lecture
7) India was under a foreign rule for many years
8) Mr. Gandhi awoke political thought among the people of India.
9) In a city like Bombay, people dress in an up-to-date manner.
10) I was very anxious to know why he came home so early.

छळ

[आजची मराठी लघुकथा कशा स्वरूपाची आहे ह्याची थोडीशी कल्पना मधु मावजे ह्यांच्या लघुकथेवरून येण्यासारखी आहे]

सकाळ पासून सारखं उकडत असतं मध्येच कुधारी ढग येतात आणि उष्मा आधिकच वाढत जातो. संध्याकाळच्या सुमारास ढग वितळू लागतात आणि ढगाआडून कोवळी किरणे डोकावू लागतात. खिडकीच्या व्हेंटिलेटर्स मधून उन्हाच्या रेशमी लाटा अंगावर खेळू लागतात थोड्याच वेळात त्यांचा खेळ संपतो. आता चक्क संधिप्रकाश खिडकीतून आत येतो संध्याकाळ झाल्याची जाणीव होते आणि कपडे करून मी खोलीबाहेर पडतो.

आज मी एकटाच असतो हल्ली नेहमी असंच एकटं जावं लागतं कारण जवळजवळ सगळे मित्र नोकरीनिमित्तानं पुणं सोडून गेलेले आहेत मी टिळकरोडवर येतो आणि लकडीपुलच्या दिशेनं चालू लागतो.

पाय यांत्रिकतेनं रस्ता तुडवीत असतात परंतु मन मात्र कुठंतरी भरकटत असतं बाजूनं जाणा-या-येणा-यांकडे माझं मुळीच लक्ष नसतं. "हॅलो! जोशी" ह्या आवाजानं मी एकदम तंद्रीतून जागा होतो. माझ्यासमोर माझा कॉलेजमित्र जोग उभा असलेला मला दिसतो. मी मध्येच कॉलेज सोडून गेल्यानंतर जवळजवळ चारएक वर्षांनी आमची गाठ पडलेली असते.

"काय जोशी, हल्ली काय करतोस?"
खरं म्हणजे मी काहीच करत नसतो. पण तरीदेखील मी थाप ठोकून देतो.

"अरे, मी सध्या शाळेत पोरं हाकायचं काम पत्करलंय पण, तू कुठे असतोस?"

जोग काय करतो हें मला नक्की माहित असलं, परंतु त्याला जरा बरं वाटावं म्हणून मी उगाचच विचारलो.

"मी दोन वर्षांपूर्वी बी. ई झालो नि सध्या पी. डबल्यु. डी मध्यें ओव्हरसिअर आहे. सव्वातीनशें मिळतात." जोग आपली थोरवी मिरवतो.

त्याची ऑफीसी भाषा मला काही उमगत नाही तो नोकरीनं बुरसटला आहे एवढंच मला कळलं त्यांचं लग्न झाल्याचं मला ठाऊक असतं. संभाषणाला गती यावी म्हणून मी विचारलो, "तुझं लग्न झाल्याचं ऐकलं !"

"हो. हो. तुला निमंत्रण द्यायला विसरलो बुवा ! बऱ्याच दिवसांत गाठ कुठे पडलेय् आपली?"

त्यांत काय एवढं ! — हो आणि लग्न नाशिकला झालं नाहीं का ? मी तरी कुठे येऊं शकलों असतों ! बरं, आमची नीलवंती काय म्हणतेय ?

"म्हणजे ? मी नाही समजलो बुवा !"

"अरे नीलवंती म्हणजे तुझी बायको —"

"माझ्या बायकोची आणि तुझी ओळख आहे वाटतं ?"

"नाशिकला आम्ही पाणसवाडीत समोरासमोर रहात होतों. सहावीपर्यंत मी नाशिकला होतो. तेव्हां ती नि मी रुंगठा हायस्कूल मधें होतो. ती माझ्या मागं दोन वर्षं होती. शाळेत ती नेहमी निळा स्कर्ट घालून यायची, म्हणून आम्ही सर्व तिला नीलवंती म्हणत होतो. नीलवंती म्हणूनच साऱ्या शाळेंत ती प्रसिद्ध होती. तिच्या लांबूस गोऱ्या वर्णाला तो निळा स्कर्ट काय खुलून दिसायचा !

जोगचा चेहरा प्रत्येक वाक्यागणिक बदलत जातो. मी त्याच्या बायकोचा बालमित्र आहे हे ऐकून तो जास्तच

अस्वस्थ होतो !

"सध्या मे महिना आहे मग तुम्ही दोघं दर रविवारी पोहायला जाता की नाहीं ?"

"नाही बुवा, मला कुठं नीट पोहायला येतंय ? आणि बऱ्याच वेळेला रविवारी देखील ऑफीस असतं."

"नाशिकला असतांना मी आणि सुमा मेच्या सुटीत रोज गांधी तलावावर पोहायला जायचे. सुमा डाईव्ह तर काय सुंदर मारते रे ! मीच तिला पोहायला शिकवलं हो ! — आणि तिला तू सायकल घेऊन दिलीस की नाहीं ?"

"नाही, सायकल कशाला लागते तिला ? तिला कुठं बाहेर जायचं असतं !"

"शाळेत असतांना तिला सायकलींची फार हौस होती. मग ती आमच्या ताईची सायकल घेऊन कितीतरी वेळ साऱ्या शहरभर भटकत बसायची."
शेखरला यांतलं कांहींच माहीती नाहीं हें त्याला माहित असतं. त्यामुळें त्याचा चेहरा अधिकच पडतो. सुमा आपल्याबद्दल यांतलं काहींच कसं बोलली नाहीं याची जाणीव होऊन तो अधिकच अस्वस्थ होतो. तो आता बोलण्याच्या मूडमध्ये नसतो.

"बरं, मग सांग सुमाला की उद्या मी जेवायला येईन म्हणून. पण मी येणार म्हणजे जास्त काहीं सांगायला नको म्हणा कारण त्याला काय आवडतं तें तिला माहित आहे."

खरं म्हणजे शेखरला मी त्याच्याकडे येऊं नये असंच मनातून वाटत असतं, परंतु तोंडदेखलं तो म्हणतो.

"येना ! जरूर ये."

तेव्हां आम्ही लकडीपुलापाशी येऊन पोचलो. मंग माझा निरोप घेतो आणि लक्ष्मी रोडवर निघून गेला. जरा वेळ झालेला असतो म्हणून मी टिळक रोडनं माघारी फिरलो.

— खरं सांगायचं म्हणजे माझी आणि मंगच्या बायकोची मुळीच ओळख नाही. माझी माहिती त्यांनी ऐकलीय आणि थोडीशी काल्पनिक असेल. केवळ मंगचा हट्ट असला म्हणून मी ठरवून मात्र त्याला ऐकवलेलं असतं कारण मी बेकार आहे. माझं लग्न झालेलं नाही. हे ऐकलं नसतं तर त्यांच्या अवलंबितांच्या नोकरीचं पुराण त्यांच्या तोंडून वारंवार मला ऐकावं लागलं असतं.

घरी गेल्यावर मंग बायकोला माझ्याबद्दल विचारील आणि ती चक्क 'नाही, नाही' म्हणेल मग मंग उगाच अस्वस्थ होईल या आठवणींने माझ्या चेहऱ्यावर आसुरी आनंदाची एक लाट उसळते आणि मी घराच्या रस्त्यानं झपझप चालू लागतो.

Vocabulary and Notes

छळ čhəḷ (M) = Harǎssment

उकड ukəḍ-(P) = To be not

(T) = To boil

ढग ḍhəg (M) = Cloud

उष्मा ụṣma (M) = Heat

वितळ witaḷ (I) = To melt

कोवळी Kow-ḷi (A) = Fresh, Soft

रेशमी rešmi (A) = Silken

लाट laṭ (F) = Wave

कपडे Kəpḍe (M.Pl) = Clothes

कपडेकर Kəpde kər (-) = To dress up

एकटा ekṭ-a (A) = Alone

जवळजवळ jəwaḷ jəwaḷ = Approximately

नोकरी nokri: (F) = Job

निमित्त nimmitᵊ (N) = Reason, cause, excuse

पूल pu:l (M) = Bridge

यांत्रिकता Yantrikəta (F) = Routine life, mechanical action

तंद्री təndri: (F) = Fixedness of mind

थाप ठोक thap ṭhok- = To lie, to slap

हाक hak - (T) = To drive, to handle

पत्कर Pətər (T) = To accept

सव्वा sawwa (A) = One and one quarter

थोरवी thorwi (F) = Greatness

एवढंच ewdhəc = Only this much

बुरसट buasat- (I) = To ~~Rust~~; to become rusty

निमंत्रण nimantran (N) = Invitation

गाठ gath (F) = Visit ; Knought

नीळवंती ni:ləwanti (A) = A bluish woman ; A woman in blue dress.

ओळख o!əkh (F) = Acquaintance

तांबुस tambus (A) = Reddish

गोरा gor-a (A) = Fair in complexion, white in complexion.

(This word is used only when describing the skin color)

खुळं Khul (I) = To match (with something)

बाळमित्र balmitrə (A) = Childhood friend

अस्वस्थ aswasthə (A) = Uneasy

पोहो-/पोह Poho-/Poh (I) = To swim

दर dar (A) = Every

dar (M) = Rate; Price

हौस haws (F) = liking, interest

हौस अस haws as. = To be found of; to like

चेहरा पड.	čehra pəd		To look guilty; To show uneasiness on the face
तोंडदेखला	toṇḍdekhl-a	(A)	Outward
जरूर	jəru:r	(F)	Necessity
	jəru:r	(Adv)	Definitely
एकीव	əyki:w	(A)	hearsay
बनव्	bənəw	(T)	To prepare, to cook
बेकार	bekar	(A)	Unemployed
तुच्छ	tuččh^{ə}	(A)	Contemptible
नजर	nəjər	(F)	look; sight; Vision
आसुरी	asuri:	(A)	Devilish
आनंद	anənd^{ə}	(M)	Happiness; Pleasure
रोख	rokh	(M)	Direction
झपझप	j^{h}əpj^{h}əp	(Adv)	quickly, rapidly

Since this is a short story, the style of writing is quite different from the formal style used by serious articles. Note the use of colloquial forms, especially the substitution of the vowel ə (indicated by a dot above the previous letter) for the word final vowel e in words like एवढे, झाले, कुठे etc. which are written

एवढं, झालं, तुझं and are pronounced ewdha, jhala and tujha. Also notice the change in word order of many sentences, the addition of some words which do not have any particular meaning, such as बुवा, बरं etc.

1) हल्ली नेहमी असंच एकटं जावं लागतं.

Now-a-days I am always required to go alone like this. Or

Now-a-days I always have to go alone like this

2) पाय यांत्रिकतेने रस्ता तुडवीत असतात.

Legs keep on going on the street mechanically.

3) खरं म्हणजे मी कांहीच करीत नसतो.

To be honest, I don't do anything. Or

To tell the truth, I don't do anything.

4) संभाषणाला गति यावी म्हणून मी त्याला एक दोन प्रश्न विचारले.

In order to keep the conversation going, I asked him one or two questions.

5) त्यांत काय एवढं !

It's quite all right.

6) तुमचा मुलगा काय म्हणतो ?

How is your son?

Literally translated this sentence would mean, "what does your son say?" However, this expression 'काय म्हणतो' is used to enquire about people, as well as for greetings.

7) माझ्या बायकोची आणि तुझी ओळख आहे वाटतं ?

Do you know my wife? Or Do my wife and you know each other?

8) मी माझ्या मुलीला एक पुस्तक घेऊन दिलं.

I bought my daughter a book.

9) एव्हांना तो घरी येऊन पोंचला.

By this time he reached home.

10) बराच वेळ झाला म्हणून मी कचेरी बाहेर पडलो.

It was late, therefore I stepped out of the office.

EXERCISES

A) Fill in the blanks with appropriate words

1) संध्याकाळच्या ...... ढगाआडून सूर्याची ..... डोकावू लागली.

2) मी पुणें ----- गेल्याला जवळजवळ चार वर्षे ----

3) तूं मला निमंत्रण केलें ...... तरी मी येऊ .... नसतो.

4) राम वर्गात नेहमी पांढरी टोपी ----- न्यायचा म्हणून आम्ही ----- पुढारी ---- असू.

5) मुंबईला ------ आम्ही रोज फिरायला ----.

6) तुझ्या आईला ----- कीं मी उद्या ----- येईन.

7) मी त्याच्या ---- नाटकाला येऊ ---- असें त्याला ---- तून वाटत होतें; पण तरी त्यानें ---- बोलावलें.

8) उद्या संध्याकाळी आपण घरीं गेल्या ---- बाबांना एक प्रश्न ----.

9) वामन सध्या ---- आहे आणि त्याचें लग्न ---- नाहीं हें मला ---- नव्हतें.

10) मला घरी ---- फार उशीर ---- मुळें मी घराच्या ----- भरभर ----- लागलो.

11) मी त्याच्या ------ बालमित्र आहे ---- ऐकुन तो ---- अस्वस्थ होतो.

12) सुमा आमच्या ताईशी [illegible] सायकल ---- कितीतरी वेळ --- शहर ---- भटकत बसायची.

B) Use the following words into sentences.

1) ऐकीव 2) हल्ली 3) जरा 4) वर 5) नक्की 6) जवळजवळ
7) काय 8) प्रत्येक 9) दर 10) अस्वस्थ

~~137~~
112

c) Translate the following sentences into Marathi.

1) All my friends have left Bombay on account of jobs.
2) I met my friends after nearly two years.
3) He asked me that question unnecessarily.
4) That green skirt goes well with her white complexion.
5) My younger brother is very fond of swimming.
6) When we visited the city of London we wondered through the city all day.
7) My mother knows that I do not know anything about the marriage of my friend.
8) To tell the truth, I am not acquainted with his wige.
9) His brother is unemployed and therefore is not married.

आपल्या नेहमीच्या बोलण्यांत 'काम करणे' हा शब्द आपण निरनिराळ्या अर्थानें वापरतो. खालील संवाद बहुतेक घरांत घडतो

आई – बाळ जरा माझें काम करतोस कां? एवढे गहूं दळून आण.

बाळ – आई, आज सकाळी मी भाजी आणायचें काम केलें, पत्र लिहायचें काम केलें. छोट्याजवळ बसून रहावयाचें व त्याला खेळवायचें काम केलें. आतां हे काम दादाला सांग ना.

आई – अरे बाळ, दादा ऑफीसांत दिवसभर काम करतो दमून घरी येतो. त्याला आणखी कशाला काम सांगायचें? जा, तूच कर एवढें काम.

बाळ – बरं, मी करतो! (तेवढ्यांत वडील येतात)

वडील – बाळ, गिरणींत जातांजातां वाटेंत रामभाऊंना निरोप सांगायचाही काम कर. त्यांना म्हणावं, तुमचे टाईपरायटरचें काम झालें असेल तर तो लवकर परत करा; आणि विचार, त्यांच्या मेव्हण्याला काम मिळालें का?

या संवादात 'काम' हा शब्द वेगवेगळ्या अर्थांनी वापरलेला आहे. सिनेमांतले एकाद्या नटाचें काम, राजकारणातले एकाद्या पुढाऱ्याचें काम, भूदानाचें कार्य, पोटासाठी करायचें काम, अशी निरनिराळ्या प्रकारची कामे आपण ओळखतो. तीच गोष्ट 'शक्ति' आणि 'ताकद' याविषयी. खूपदां हे दोन शब्द आपण एकाच अर्थानें वापरतो.

पण शास्त्रीय भाषेत मात्र या तिन्ही शब्दांना फार वेगळे व विशिष्ट आणि ठराविक अर्थ आहेत.

नेहमीच्या व्यवहारांत आपल्याला दम लागला की 'आपण काम केलें' असे आपण मानतो. समजा तुम्ही आईबरोबर बाजारांत गेला आहात. आईच्या हातांत बटाटे, कोबी, बीट

अशा जडजड शाळ्यांनी भरलेली पिशवी आहे. वाटेत कापडाचें दुकान लागलांच आई म्हणाले, "बाळ, जरा ही पिशवी धर. मी दुकानांत जाऊन कापडाची चौकशी करून येते." कापड बघायला गेल्यावर आई लवकर थोडीच बाहेर येणार? तिला लागला वेळ, आणि पिशवी धरून तुम्हाला लागला दम. म्हणजे तुम्हाला वाटतें, 'आपण खूप काम केलें', पण शास्त्रीय भाषेंत म्हणाल तर तुम्ही 'कांही काम केलें नाहीं.' तुम्ही विचाराल, 'तब्बल वीस मिनिटें जड पिशवी धरून ताटकळत उभा राहून थकून गेलों, आणि तुम्हीं म्हणतां कांही काम केलें नाहीं, हें कसं काय?' "खरें पहाल, तर वीस वर्षे जरी तुम्ही तसे उभे राहिलांत तरी शास्त्रीय दृष्टीनें तुम्ही 'काही काम केलें नाही' असेंच म्हणावें लागेल."

याचें कारण शास्त्रीय भाषेंत कार्य करणें म्हणजे प्रेरणा लावून एखाद्या पदार्थाला गती देणें, पदार्थाचें स्थलांतर करणे म्हणून कार्य करण्यात गती उत्पन्न होणें गृहीतच आहे. स्थिर राहाणें म्हणजे कार्य करणें नव्हे.

टेबलावर पुस्तक ठेवून वाचत बसणें, विचार करीत बसणें म्हणजे कार्य करणें. नव्हेच. पण टेबलावरचें पुस्तक उचलून कपाटांत ठेवणें हे मात्र 'कार्य' आहे. जिना चढून माडीवर जाणे हें कार्य, खाली पडलेली वस्तु उचलून घेणें हे कार्य फार कशाला! रागारागानें एकदम टेबल तिकडे ढकलणें, पलंगाची सरकासरकव करणें हें कार्यच आहे. गादी ओढणें, दार उघडणें, लावणें, काडी ओढणें, पाटीवर रेघ ओढणें, ही सर्व शास्त्रीय दृष्टीनें 'कार्य' होत. कारण या सर्व क्रियांत प्रेरणेच्या उपयोगानें पदार्थांना गति देऊन त्यांचे स्थलांतर केलेलें असतें.

एखादा मनुष्य एखाद करतो यांचे कारण त्याच्याजवळ कार्य करण्याची कुवत असते. याच कार्य करण्याच्या कुवतीला कार्य-शक्ती, किंवा नुसतेंच 'शक्ती' असे म्हणतात. शास्त्रीय

दृष्टीनें कार्य करण्याची कुवत म्हणजे 'शक्ती' म्हणजे असेंहि म्हणतां येईल कीं 'शक्ती' खर्च केली तरच कार्य करता येईल. पण गंमत अशी कीं ही खर्च झालेली शक्ती वाया जात नाही. ज्या पदार्थावर कार्य केले त्या पदार्थात ती साठून राहते. २५ नया पैशाची पोस्टाची तिकिटें घेतली असे समजा म्हणजे ते पैसे तिकिटांत गुंतून राहिले किंमतीच्या दृष्टीने तिकिटें आणि पैसे सारखेच. पण उपयोगाच्या दृष्टीने मात्र ह्या गोष्टी वेगळ्या असतात. तिकिटें लावून पाकीट पोस्टात [illegible] टाकले कीं त्यांत गुंतलेले पैसे पाकिटाच्या प्रवासांत खर्च होतात. म्हणजे तिकिटासाठी आपण खर्च केलेले पैसे वाया जात नाहीत. जर्दाळूच्या आंतली बी फोडण्यासाठीं दगड उचलून तुम्ही कार्य करतांत. शक्ती खर्च करतात ती शक्ती दगडांत साठून राहते, याचा पुरावा तो दगड बीवर पडून फुटलेला बदाम तोंडांत टाकायला तुम्हाला मिळतो कीं नाही? म्हणजे दगड उचलण्यासाठीं तुम्ही खर्च केलेल्या शक्तीनेच जणू बी फुटली.

निसर्ग म्हणजे या शक्तीचा अपरंपार खजिनाच आहे! निसर्ग तसा मोठा उदारहि आहे कारण या साऱ्या खजिन्याला दार नाहीं. कडी नाहीं. कुलुप नाहीं. पण हा शक्तीचा खजिना लुटायला आपल्याजवळ ज्ञान व युक्ति यांचा मंत्र मात्र असायला पाहिजे.

निसर्गातल्या या शक्तीरूपी खजिन्यांत सारखी भर पडते आहे. आकाशातला सूर्य सतत या भांडारात टनावारी शक्तीची भर टाकीत आहे. त्याच्या उष्णतेने तो लक्षावधि टन पाण्याची वाफ करून ती उंच आकाशांत नेतो. तिथें थंड झाल्यामुळें त्या वाफेचें होते [illegible] पाणी आणि तें पावसाच्या रूपानें जमिनीवर कोसळतें. उंचावरचें पाणी धरणांनी साठवून त्याच्या शक्तीचा उपयोग करून आपल्याला

वीज मिळवतां येते. जमिनीवर वाहण्याच्या पाण्यानें धान्याची समृद्धि होते. सूर्याच्या उष्णतेनें कमी अधिक दाबाचे प्रदेश निर्माण होतात, वारे वाहू लागतात, आणि वायु-शक्ती निर्माण होते. असा हा सूर्याचा महिमा आहे.

शास्त्रीय भाषेत काम करण्याची गति (म्हणजेच शक्ती खर्चण्याची गति) म्हणजे ताकद. तरुणांजवळ ताकद जास्ती आहे वृद्धांजवळ ताकद कमी आहे असें म्हणतां येईल. ताकदवान नेहमी वरिष्ठ असतो असें मानण्याचें कारण नाही. ताकद म्हणजे शक्ती खर्चण्याचा वेग. खर्चिक मनुष्य मोठा धनिक असतो असें कुठे आहे? म्हणून व्यवहारांत शक्ती राखून राखून खर्च करणारा जास्त उपयोगी पडतो. आकाशांत लकाकणाऱ्या विजेमुळें क्षणमात्र लखलखाट होतो. म्हणजे वीज ताकदवान असते पण सतत प्रकाश देणारा विजेचा दिवा म्हणजे दमदारपणाचा नमुनाच, आणि तोच जास्ती उपयुक्त असतो.

Vocabulary and Notes

संवाद sə̃w̃wad (M) = conversation, dialogue

गहू gəhũ (M) = Wheat

भाजी bhaji = Vegetable

दम dəm (I) = To be tired

dəm (M) = stamina, feeling of tiredness.

निरोप nisop (M) = Message

मेहुणा/मेव्हणा mehuna/mewhna (M) = Brother-in-law

राजकारण rajkaran (N) = Politics

भूदान bhudan (N) = land donation

ताकद takəd (F) = strength, energy

शास्त्रीय Šastriya (A) = scientific

विशिष्ट wišiṣtə (A) = specific, particular

ठराविक ṭhərawik (A) = Definite

मान man - (I) = To presume, to respect

man - (M) = respect

बटाटा bəṭaṭa (M) = potato

कोबी Kobi (F) = cabbage

पिशवी pišwi (F) = bag

तब्बल təbbəl (A) = Complete, Full

प्रेरणा prerṇa (F) = Initiation

गती gəti (F) = speed

स्थलांतर कर sthəlantər kər = To move from one place to another

गृहीत grihit = Taken for granted

कपाट Kapat = Cupboard

वस्तू wəstu = thing

ढकल ḍhəkəl (T) = To push

पलंग pəlaŋ/pələŋg^{ə} (M) = cot

सरक sərək - (I) = To move by itself

सरकव sərkəw - (T and C) = To move

दार dar (N) = door

काडी kaḍi (F) = Match

रेघ regh (F) = line

कुवत Kuwət (F) = capacity

गंमत gəmmət (F) = Fun, amusement

वाया जा- waya ja- = To be wasted

गुंत gunt^{ə} (I) = To be entangled; to be involved.

पाकीट pakiṭ (N) = Envelop

जर्दाळू jərdaḷu (M) = Almond fruit

बी bi: (F) = Seed

दगड dəgəd (M) = Stone

बदाम bədam (M) = Almond

जणू jənu: = As if

निसर्ग nisərg^{ə} (M) = Nature

खजिना Khajina (M) = Treasure

अपरंपार apərəmpər (A) = Infinite

उदार udar (A) = Generous, charitable

कडी kədi (F) = Bolt

कुलुप Kulup (N) = Lock
लुट luṭ (T) = To rob, to steal
ज्ञान dnyan (N) = Knowledge
युक्ती yukti: (M) = Trick
मंत्र mantrᵊ (M) = Religious chanting; Mystic Verse; solution
उष्णता Uṣnəta (F) = Heat
रूप ru:p (N) = Appearance; Form
कोसळ Kosəḷ - (I) = To fall, to collapse
साठ- Sath - (P) = To be stored
साठव- Sathəw (T) = To store
धान्य dhanyᵊ (N) = Grain; crop
वायु wayu (M) = Wind
महिमा mahima (M) = Greatness
तरुण təru:n (A) = Young
təru:n (M) = Young man
वृद्ध Wriddhᵊ (A) = Old
Wriddhᵊ (M) = Old Man
खर्चिक Khərčik (A) = Lavish; spendthrift
धनिक dhənik (A) = Rich
राख rakh (T) = To save
लकाक ləkak (I) = To glitter, to shine
वीज wi:j (F) = Electricity, lightning
सतत sətət (A) = continuous

1) खालील संवाद बहुतेक घरांत घडतो.

The following conversation takes place in almost all house.

2) गहू दळून आण.

Go and get the wheat ground.

3) घरी जाताजाता तो विहीरी जवळ थांबला.

While on his way home he stopped at the well. Or While going home he stopped at the well.

4) समजा तुम्हाला बक्षीस मिळालं तर तुम्ही काय करील?

Suppose you get a prize, what will you do.

5) तो एक उनाड मुलगा आहे. तो अभ्यास थोडाच करणार?

He is a spoiled boy. It is not very likely that will study.

6) त्या नोकराला तें काम करायला वेळ लागला.

That servant was late in doing that work.

मला घरी यायला वेळ लागला.

I was late to come home. Or

I came home late.

7) तो परीक्षेला बसला नाही हे कसं काय ?

How is it that he did not appear for the examination.

8) फार कशाला !

Why go that far.

9) पण गंमत अशी की ही शक्ती वाया जात नाही.

But the interesting part of it is that this energy is not wasted.

Exercises

A) Answer the following questions in complete Marathi sentences.

1) What did the mother say to Bal ?
2) which two words do we use in the same sense?
3) what do we presume in everyday life when we become tired!
4) What is the meaning of the phrase काम करणे in scientific language!
5) What types of 'work' are mentioned in the lesson.
6) Why does a person 'do a work'.
7) what is the principle behind 'doing any work'?
8) what is 'nature', according to the author.
9) What do we need to the treasure of nature?
10) What does the sun do?
11) Who is more useful in everyday life?
12) What does 'ताकद' mean in scientific language?

B) Fill in the blanks with appropriate words.

1) मराठी भाषेत पुष्कळ - - - - निरनिराळ्या - - - वापरले - - - -
2) घरीं - - - वर तुम्ही - - - तून भाजी - - - - या
3) आई काल - - - जाऊन कापडाची - - - करुन आली.

4) तो ती जड --- घरी नेऊन अगदी --- गेला.

5) तू ह्या ठिकाणी --- उभा राहिलास तर तुला --- लागणार नाही.

6) माझ्या खोलींत --- जिना चढून --- वर जावे लागतें.

7) ह्या दोन गोष्टी --- दृष्टीनें फार --- आहेत.

8) चांगल्या कामात --- केलेला वेळ --- जात नाही.

9) सूर्याच्या --- पाण्याची --- होते.

10) आमच्या शेजारचा मनुष्य फार --- आहे, --- तो स्वार्थिक नाही.

C) Use the following words into sentences.

1) बहुतेक 2) वेगळा 3) बाहेर 4) जणू 5) असा 6) सतत 7) जास्ती 8) कृपेनें 9) नव्हे 10) कारण.

D) Translate the following sentences into Marathi.

1) In scientific language these words have different meanings.

2) I will go to the shop to inquire about my trousers.

3) Your bag is heavy, so let me hold it for some time.

4) In scientific language to 'work' means to 'give impetus' to a matter.

5) These two things are quite different from the point of their usefulness.

6) We store the water by building dams and generate electricity.

7) There is no need to presume that a strong man is always superior to others

[गंगाधर गाडगीळ हे मराठीतले एक नामांकित लघुकथालेखक आहेत. मराठी लघुकथांच्या क्षेत्रांत एक नवीन युग त्यांनी सुरू केले. त्यांच्या पुष्कळशा लघुकथा मनोविश्लेषणात्मक आहेत. माणसाच्या मनाचे बारीक सारीक हेलकावे वास्तवतेने वर्णन करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. खालील उतारा त्यांच्या 'कबुतरें' ह्या लघुकथेतून घेतलेला आहे. ह्या उताऱ्यातील लहान मुलाच्या वृत्तीचे त्यांचे सूक्ष्म निरीक्षण पाहाण्यासारखें आहे]

पहांट अर्धवट काळोख्यांत बुडालेली असतांनाच ते दोघे जागे झाले आणि कुलकुल बोलू लागले त्या दोघांची अंथरुणें शेजारी शेजारीच होती, आणि थोड्या अंतराकर आजी झोपली होती. आई व बाबा होते पलीकडच्या खोलींत.

विजय म्हणाला, "उदय। मी रात्रीं भूत पाहिले".

उदय अनुभवांतून निर्माण झालेल्या अविश्वासाने म्हणाला, "हॅट। बंडल मारतोस तू".

विजय म्हणाला, "बरें बुवा! बंडल तर बंडल उद्या रात्री ते येऊन तुझ्या पायांना गुदगुल्या करील तेव्हां समजेल."

उदयने ह्या गोष्टीवर विचार केला, आणि मग नेहमीप्रमाणे त्याला विजयचें म्हणणे खरेंही असू शकेल अशी शंका आली. उदयच्या मनांत खरें आणि खोटें ह्यांना विभागणारी रेषा स्पष्ट होती. पण विजय मात्र खरें आणि खोटें ह्यांची चमत्कारिक भेसाळ करुन टाकीत असे त्यामुळें त्याचें बोलणें ऐकून उदय नेहमी बुचकळ्यांत पडायचा.

तो कांहीसा चिडून म्हणाला, "हॅट। भूत पायांना कशाला गुदगुल्या करील? ते मुळी मानवर उडी मारते."

विजय म्हणाला, "आधी तें पायांना गुदगुल्या करते तेव्हां हसले नाही तर ते कांही करीत नाही पण हसले तर ते ताबडतोब मानेवर बसतें. आणि मग खलास।"

"खलास ?" उदय हीलीनें उद्गारला.

"हो तर काय! पहिल्यानें ते डोळे खालें आणि मग कान..." विजय निर्भयपणें म्हणाला.

उदयनें ह्या गोष्टीवर विचार केला. कुठच्याहि बोलण्याचा शब्दश: अर्थ घेण्याची त्याची प्रवृत्ति होती. त्यामुळें अक्षरश: आपले डोळे काढले जात आहेत अशी तो कल्पना करूं लागला आणि अगदी भेदरून गेला.

थोडा वेळ तो तसाच पडून राहिला. आणि मग एकदम विजयला पेंचात पकडणारा विचार सुचून तो म्हणाला, "पण भुतांची नखें असतात केवढालीं लांब. त्याला गुदगुल्या कशा करतां येतील?"

पण विजयला ह्या बाबतीत क्षणभरहि विचार करावा लागला नाहीं तो म्हणाला, "त्यानें नखें काढून ठेवलीं आणि मग गुदगुल्या केल्या."

हें मुकाट्यानें ऐकून घेणें उदयला शक्यच नव्हतें. तो ओरडला, "थापा, थापा, थापा" आणिं त्यानें विजयच्या अंगावर भराभर गुद्दे मारले.

विजयने ते वरच्यावर झेलले आणि तो खदखदा हसूं लागला.

तेवढ्यांत आजी पुटपुटली, "पहांट नाही झाली तोंच गल्ल्यांच्या मारामाऱ्या झाल्या सुरूं."

शेजारच्या खोलीतून बाबांचा आवाज आला, "काय गडबड आहे रे?"

त्याबरोबर दोघांची हसूं दाबलें.

मग उदय रागावून म्हणाला, "तुझ्यामुळें आम्हाला असें नेहमी नेहमी ओरडून घ्यावें लागतें".

पण विजय उदयचें बोलणें कधींच गंभीरपणे मनावर घेत नसे. त्यानें उदयला जीभ काढून दाखवली आणि म्हटलें, "ह्या लेकाचा."

आजी चहा करायला उठली, तशी ही दोघे उठले. विजयने आपला बिछाना कसा तरी गोळा केला आणि कोपऱ्यांत ढकलून दिला आणि तो बाहेर धावला. उदयने आपला बिछाना नीट गोळा करून कोपऱ्यांत ठेवला. मग त्याने एकवार दुःखी कुढूनें विजयच्या बिछान्याकडे पाहिलें. एकदां त्याच्या मनांत बंडखोर विचार आला, "आई त्याला ओरडील तर ओरडील आपल्याला त्याचें काय?" पण हा विचार टिकूं शकला नाहीं. त्याने विजयचा बिछाना देखील गोळा करून ठेवला, आणि तो तोंड धुवायला गेला. आईने सांगितल्या प्रमाणे त्याने काळजीपूर्वक, चोळून चोळून तोंड धुतलें आणि तो स्वयंपाकघरांत चहा करणाऱ्या आजीजवळ जाऊन बसला. आजीला त्यानें किटली आणून दिली. कपबशा काढून दिल्या.

चहा झाल्याच्या सुमाराला विजयला कसा लागला कोण जाणे! तो ओरडतच घरांत आला, "आजी, मला चहा."

आजी म्हणाली, "थांब मेल्या, तोंड धुतलेंस का आधी?"

विजय म्हणाला "हो" आणि त्यानें ईऽऽ करून आपले दांत दाखवले.

आजीने विचारलें, "घासलेत का रे उदय ह्याचें दांत?"

उदय नेहमीच्या पेचात पडला. खोटें सांगावें त्याच्या जीवावर येत होतें. आणि त्यानें खरें सांगितलें असतें तर! त्याला विजयच्या माराची तेवढी पर्वा वाटत नव्हती म्हणा पण विजयने त्याच्यावर बहिष्कार टाकला असता. त्याला ती भीती होती. मग विजयनें त्याला आपल्या बरोबर कुठेच नेलें नसतें, आपण पाळलेल्या कबुतरांच्या पिलांना हात लावूं दिला नसता. आणि मग उदयचा दिवस अगदीं वाईट गेला असता. कारण कुठचीही गोष्ट विजयबरोबर केली की त्यांत कांहीं विशेष मजा येत. असे एरवीं फिक्या वाटणाऱ्या गोष्टी विजयच्या सहवासांत मज्या होत असत.

Vocabulary and Notes

नामांकित namaŋkit (A) = Famous

लघुकथा ləgukətha (F) = short story

क्षेत्र kšətrə (H) = Field, section

युग yu: g (F) = Era, Period

मनोविश्लेषणात्मक mənowišlesəṇātmək = Psychoanalytical

मनोविश्लेषण mənowišlesaṇa (H) = Psychoanalysis

हेलकावा helkawa (M) = Undulation

वास्तवता wəstəwta (F) = Reality

हातखंडा अस hatkhənda əs = To be an Expert in

निरीक्षण niri:kšən (N) = Observation

सूक्ष्म su: kšmə (A) = Minute

अर्धवट ərdhəwat (A) = Approximately half, Also mentally retarded.

काळोख kalokh (M) = Darkness

कुल कुल kulkul (Adv) = In a whispering way

अंथरुण ənthru:n (H) = Bed

आजी aji: (F) = Grand mother

अविश्वास əwišwas (M) = Disbelief

अनुभव ənubhəw (M) = Experience

बंडल मार. bəndal mar = To lie, to exaggerate

गुदगुल्या कर, gudgulya kər = To tickle

शंका Šəŋka (F) = Doubt

विभागणारी Wibhagnar-i (A) = Dividing

रेषा resa (F) = Line

चमत्कारिक čəmətkarik (A) = strange.
भेसाळ bhěsal (F) = Mixture
बुचकळ्यांत पड buckəlyal pəd = To become confused.
चिड čid (I) = To be irritated
हस həs (I) = To smile, to laugh
डोळा ḍo!a (M) = Eye
शब्दशः अर्थ šəbdəšəha ərthə = literal Meaning
कल्पना कर kəlpəna kər = To imagine
भेदरून जा bhədru:n ja = To become afraid
पेच pec (M) = Trap
सुच suc (T) = To come to mind, to suggest by itself.
क्षणभर kšəṇbhər = For a moment
मुकाट्याने mukaṭyane (Adv) = quietly
गुद्दा gudda (M) = Fist
झेल jhel/ǰhel (T) = To catch
खदखदा khədkhəda (Adv) = Loudly
पुटपुट puṭ puṭ (T) = To murmer, To mutter
मारामारी maramari (F) = Fight
दाब dab (T) = To suppress, to press
गंभीरपणे gəmbhi:rpəne (Adv) = Seriously
जीभ ji:bh (F) = Tongue
रड्या rəḍya (A) = One who always cries, The miserable type.
बिछाना bičhana (M) = Bed, the mattress
गोळा कर go!a kər = To collect together.

कसातरी	kəs-a təri: = Somehow
बाग	bag (F) = Garden
कोपरा	kopra (M) = Corner
मुद्रा	mudra (F) = Expression, appearance
बंडखोर	bəndəkhor (A) = Turbulent, Rebelious
तोंड	toṇd^{ə}/toṇ (N) = Face, mouth
काळजीपूर्वक	kalǰi: pu:rwək (Adv) = Carefully
चोळ-	col- (T) = To rub
स्वयंपाकघर	swəyəmpak-ghər(N)= Kitchen
किटली	kitli: (F) = Kettle
बशी	bəši: (F) = Dish; saucer
सुगावा	sugawa (M) = Information
धू-	dhu - (T) = To wash
दांत	dat (M) = Tooth
खोटे	khot-e (A) = false
	khot-e (N) = lie
पर्वा	pərwa (F) = Care
बहिष्कार	bəhiṣkar (M) = Boycott
पाळ-	paḷ - (T) = To maintain, To keep as a pet
कबुतर	kəbutər (N) = pigeon
पिलू	pilu: (N) = A young one, a cub, a pup
मजा	məǰa (F) = Fun
शिळा	šil-a (A) = Stale
	šil-a (F) = A flat stone
ताजा	taj-a (A) = Fresh

As in the previous short story ऊठ the style in this story is also more colloquial. In addition the author has tried to use children's way of talking with each other. As a result there are many expressions and words in this lesson, which do not normally occur in serious writings.

1) त्या दोघांची अंथरुणे शेजारी शेजारी होती.
The beds of those two were close to each other.

2) ईट्! This is an interjection and is used by children when they emphatically want to refute or deny the statement or remark made by any other child.

3) बरं बुवा खोटं तर खोटं.
O.K., O.K. If (you think) this is a lie, be it so.

4) आणि मग खलास!
And then everything is over (finished)

5) त्याने अक्षरशः त्या टेबलाला लाथ मारली.
He actually kicked that table.

6) खेळाडूने चेंडू वरच्यावर झेलला.
The player caugh the ball over and above (in air)

7) पहाट नाही झाली तोंच कार्ट्यांच्या मारामाऱ्या झाल्या सुरू.
It's not even dawn yet and these naughty boys have begun their fighting.

8) काय गडबड आहे रे ?

what's going on there?

9) तुझ्यामुळें आम्हाला ओरडून घ्यावं लागत.

We are shouted at because of you.

10) रड्या लेकाचा!

You, miserable (Crying) type!

11) आई त्याला ओरडली तर ओरडली.

If mother shouts at him, let (her) shout.

12) थांब मेल्या!

Stop, you naughty boy.

13) आजी, मला चहा.

Grandma, I want tea.

14) मी रोज सकाळी दांत घासतो.

I clean my teeth every morning.

15) उदय नेहमीच्या पेचात पडला.

Uday was caught (fell) in the usual trap.

Exercises

A) Fill in the blanks with appropriate words:

1) त्याच्या वागावण्याची मला मुळीच - - - वाटत - - -
2) मी पुस्तक वाचील - - - रामा माझ्या - - - येऊन - - -
3) मास्तर गोविंदाला अभ्यास - - - सांगतात. पण तो - - - बोलणें कधीच - - - मनावर - - - नसे.
4) आपण त्याला - - - कसें पाडावें ह्या - - - उदयला क्षणभरही विचार - - - नाही.
5) त्याची नेहमीची आगगाडी मागून - - - पाहून तो - - - चालू लागला.
6) मी त्याला प्रश्न विचारला खरा, पण तो - - - सांगतो की - - - सांगतो हे - - - कळेना.
7) माझे - - - गव्याजे - - - खोलीत घातले.
8) श्रीधरनें सांगितलेली हकीकत - - - आई अगदी - - - पडली.
9) उदयनें - - - दुःखी - - - विजयच्या - - - कडे पाहिलें.
10) कुठल्याहि गोष्टीच्या - - - अर्थ - - - उदयची - - - होती.
11) विजयने उदयला - - - बरोबर - - - नेलें नसतें.
12) चाहा - - - खुणावा विजयला - - - लागला कोण - - - .
13) - - - शिळ्या - - - गोष्टी विजयच्या - - - ताज्या - - - असत.

B) Answers the following questions in Marathi sentences.

1) Where were the beds of उदय and विजय?
2) What did विजय say?
3) Why did उदय use to get confused after hearing विजय's talk?

4) What did their grand-mother whisper?
5) What did विश्राम do when he got up?
6) How did उदय feel about विश्राम's behavior?
7) What did उदय do finally?
8) What did विश्राम do when the tea was ready?
9) Why was उदय afraid to tell the truth?

c) Translate the following into Marathi:

1) Their beds were close to each other and their mother was sleeping a short distance away from them.
2) My son is many times confused because the line dividing the truth and falsehood is not always clear in his mind.
3) Govind is a very ~~nice~~ clever boy and he has a tendency to think even about small matters.
4) He did not have to think even for a moment to answer my question.
5) Although he did not like gathering his bed and putting it in a corner, he had to do it everyday.
6) There is always a great fun in doing many things with one's friends.
7) Ram knews that the teacher was going to punish him because he did not study; but Ram did not care about it.
8) All the children came into the kitchen and sat with their grand-mother.
9) Nobody knew how he knew about the dinner getting ready, but he came runing into the house.
10) Wash your face carefully as your mother has told you.

तालीम

एकदा सहज माझ्या मनांत विचार आला कीं या एवढ्याशा गांवांत खंबीर अशी बांधलेली एखादी इमारत असावी. असावी हें ठीक होतें, पण ती बांधली पाहिज्ये गांवाच्याच खर्चानें. असा खर्च घ्यायला हीं वेडीं धनगरें कबुल होतील का? तिकडे एक म्हण होती, "धनगरी वेड सहा महिने जाणार नाही!" धनगराच्या आडमुठ्या वृत्तीवरून ती पडली असावी. गांवांत इमारत असावी हें कुणाला पटलें नसते. शाळा बांधावी तर शाळेसाठी जागा होती, आणि ती अपुरी पडेल असा काळ येणें नजीकच्या भविष्यांत तरी शक्य दिसत नव्हतें. मग इमारत कशाची? सहजच सुचलें कीं, तालीम बांधावी पोरांना खेळण्यासाठीं वेळप्रसंगी गांवकऱ्यांना एकत्र येऊन बसण्यासाठीं प्रशस्त अशी तालमीची इमारत बांधावी. संस्थानच्या राजेसाहेबांना व्यायामाची आवड होती या कारणा मुळे शिक्षणखात्यातून किंवा खाजगींतून कांही मदत होईल. या गांवांत मी शाळामास्तर होतो याची आठवणही राहील.

रात्रीं घरोघरी रामोशी पाठवून मी गांव जमविलें. भाकरी खाऊन तमाखू दाढेला धरलेली मंडळी घोंगड्या पांघरून जमली आणि शाळेपुढच्या पटांगणांत बसली. मी ओट्यावर होतों. माझ्यापुढें कारभारी होता. रामा बनगर होता. शेकू होता, तालुबा होता. रानांत कांहीं कामधाम नसल्या मुळें सर्वजण आवर्जून आले होते.

सुरवातीला उगीचच इकडची तिकडची चौकशी झाली. मग मीं मुद्याचा विचार सांगितला म्हणालों,

"माझी अशी इच्छा आहे कीं गावांत एक चांगली इमारत असावी खोपटें, आपल्या माळ्या, यापेक्षां मजबूत अशी जागा असावी. रोज आपण सर्वजण धुळीत बसतों पाऊसपाणी असलें, फार गारठा असला, म्हणजे कोणी इथें बसायला येत नाहीं. कुणी शाळेचा आधिकार आला, फौजदार शिपाई आला, की त्याला उतरायची पंचाईत होते. महारवाड्यांतसुद्धां तवक्याची इमारत असते, मग आपल्या गांवांत का असू नयें? म्हणून माझ्या मनांत आलें आहे की एक तालीम गांवांत बांधावी. तुमचं म्हणणं काय आहे?"

लोकांत कुजबुज झाली. मास्तरानें हे काहीतरी वेड घेतलें आहे अशी त्यांची समजूत झाली असावी. आपसांतच बोलूं लागले. तेव्हां मी ओरडून म्हणालो, " आपसांत बोलूं नका तुम्ही. मला गाढव म्हटलं तरी चालेल, पण ते स्पष्ट म्हणा. माझ्यापाशी म्हणा."

बाळा धनगर म्हणाला,

"तालीम बांधायला कुठं पहिलवान हायेत गांवांत?"

"शाळा सुरू करतांनाहि तुम्ही म्हणालां होतां, कुठं पोरं आहेत गांवांत? पण आता पोरं येतातच ना? पांचपंधरा मुलं उद्यां तालुक्याच्या शाळेंत जातील. सातवी पास होतील."

कुणी म्हणालें,

"कशाची होत्यात? जरा नेटक झालीं की मेंढरामागं जातील. सातवी पास होऊन तुमावाणी मास्तर थोडीच होणार ती? आमच्यांतला कुणी शिकून अमलदार झालेला हाय का तालुक्यात?"

म्हातारा कारभारी समजुतीनें म्हणाला,

"अरे, आज पहिलवान नसला कुणी, तरी पोरं खेळूं लागतील. खेळतां खेळतां एकादं निवडलं त्यांतलं!"

मी म्हणालो,

"आणि समजा, नाही निवडलं तरी गांवाला उपयोग नाहीं कां इमारतीचा? तुम्ही नाचलां, त्यांचं सामान दाही दिशांना असतं. ढोल एकीकडे, झांजा एकीकडे लेझीम, बोथाटी, दांडपट्टा कुणी ना कुणी खेळलं. ते सगळं सामान तालमींत राहील, मोकळ्या वेळी ज्याला चांगली माहिती आहे त्यानं पोरांनाहि हात शिकवले, तर कांही वावगं होईल का?"

"पर तालीम बांधायची म्हंजे बक्कळ पैसा लागेल. तो कुणी द्याचा?"

"गांवानं वर्गणी करावी. घरटीं दहावीस रुपये द्यावेत!"

"हं, हायत कुणापाशीं?"

"पुष्कळांच्यापाशीं आहेत. मला ठाऊक आहे. त्यांच्यापाशीं नसतील तर त्यांनीं रोजगार द्यावा. गाडीबैल द्यावीत. आपल्या

रानातली झाडं यावीत. जर सगळ्या जोडीनं मनावर घेतलं तर एक वाखाणणी इमारत बोलबोल म्हणतां होईल."

मी बोललो, पण हा विचार कुणाला फारसा पटला नाही. उघड विरोध करणें कुणाला जमलें नाही. इमारत अर्धी राहील, उगीच सोंग होईल, असेच बहुतेकांचें मत पडलें. पण मी गप्प राहिलों नाही. नानापरीनीं ही गोष्ट त्यांना सांगत राहिलो.

गांवातले वृद्ध लोक मी पुन्हा जमवले आणि त्यांच्याशी विचारविनिमय केला. ठिकठिकाणच्या गांवांनी शाळा कशा बांधल्या आहेत, सरकारने त्यांची वाहवा कशी केली आहे, त्या गांवाची नांवें किती पुढे आली आहेत, हें सर्व मी त्यांना सांगितले आणि त्यांच्याकडून होकार घेतला.

ही माणसें तयार झाली तेव्हां साहजिकच गांव तयार झालें. एकानें करूं या म्हणताच सर्वांनीं करूया म्हणलें. घरटी दहादहा रुपये देण्यांचें लोकांनी मानलें. ज्यांची बैलें होती, गाड्या होत्या, त्यांनी श्रम देण्यांचे पत्करलें. या चारसहा महिन्यांत इमारत उभी करायची, राजेसाहेबांना आणून तिचें उद्घाटन करायचें हें पक्कें झालें. कधीहि न आलेला राजा मास्तरांच्या करामतीमुळें आणि गांवच्या एकजुटीनें या धनगरांच्या गांवी येणार ही कल्पनाच लोकांना फार उत्साही करूं लागली. आपल्या गावात तालीम होणार आहे आणि राजा येणार आहे हा विषय घरोघरीं झाला. कित्येक दिवस सांगण्यासारखें, बघण्यासारखें असें काहीं घडलें नव्हतें. तें लवकरच घडणार होतें. लोकांनीं तत्परतेनें म्हालच्या कारभाऱ्यापाशीं आपल्यावर बसलेली वर्गणी आणून दिली मी मदतीसाठीं सरकारांत अर्ज केला गवंडी, सुतार बघण्याचें काम सुरू झालें. 'घर बघावं बांधून' म्हणतात ते काहीं खोटं नाहीं. खर्चात साध्या गोष्टीनें अडतें इतकें फुल्लक कारण बांधकाम लांबायला पुरतें की विचारून सोय नाहीं.

Vocabulary and Notes

तालीम	talim (F)	=	Gymnesium, Exercise
विचार	Wichar (M)	=	Thought
	Wichar (T)	=	To ask, to enquire.
इमारत	imarət (F)	=	Building
धनगर	dhəngər (M)	=	Shepherd
आडमुठा	aḍmuṭh-a (A)	=	Strong headed
नजीक	nəǰik (Adv)	=	Nearby, close
भविष्य	bhəwisyᵊ (N)	=	Palmistry
	bhəwisyᵊ (M)	=	Future
संस्थान	sə̃w̃sthana (N)	=	State; Kingdom
शीक्षणखाते	šikšəṇ khate (N)	=	Education Department
खाजगी	khajgi (A)	=	Private
आठवण	aṭhwən (F)	=	Memory
रामोशी	ramoši (M)	=	A messanger; Also a caste name
तमाखू / तंबाखू	təmakhu:/təmbaku: (M)	=	Tobacco
जोते	Jote (N)	=	Raised ground
घोंगडी	ghoŋgḍi: (F)	=	A thick woven cloth used for protection from rain.
आवर्जून	awərju:n (Adv)	=	With care; ernestly
चौकशी	cəwkəši: (F)	=	Enquiry
मुद्दा	mudda (M)	=	Point of argument
खोपटे	Khopṭe (N)	=	Hut
माळी	mali: (F)	=	Hut
मजबूत	məjbu:t (A)	=	Strong
धूळ	dhu:l (F)	=	Dust

तक्का	təkka	(M)	=	A supporting pillow on a seat; A seat
महारवाडा	məharwaḍa	(M)	=	Colony of untouchables
कुजबुज	khujbuj	(F)	=	Whisper
	kujbuj -	(T)	=	To whisper
वेड	weḍ	(N)	=	Fad; madness
पहिलवान	pəhilwan	(M)	=	Wrestler
तालुका	taluka	(M)	=	A section of a district
नेटक	neṭək	(Adv)	=	strong
अमलंदार	əmməldar	(M)	=	Government official
तुमावाणी	tumawani:		=	like you
ढोल	ḍhol	(M)	=	Drum
झांज	jhanjə	(F)	=	Cymbal
हात शिकव	hat šikəw		=	To teach how to handle लेझीम.
बक्कळ	bəkkəl	(A)	=	Plenty; much
घरटें	ghərṭe	(N)	=	Nest; hut; small house
रोजगार	rojgar	(M)	=	One day's work or its worth in wages.
विरोध	wirodh	(M)	=	Opposition
उगीच	Ugic	(Adv)	=	Unnecessarily, without purpose.
मत	mət	(N)	=	Vote; opinion
उद्घाटन	Udghaṭən	(N)	=	Opening ceremony
करामत	Kəramət	(F)	=	Trick; attempt
एकजूट	ekju:t	(F)	=	Unity
चघळ.	cəghəl	(T)	=	To chew

तत्पर tətpər (A) = Intent upon; quick to act
अर्ज ərjə (M) = Application
गवंडी gəwəṇḍi: (M) = Brickman
सुतार sutar (M) = Carpenter
अड् əd_ (I) = To stop

This passage is taken from a novel which has a particular regional background. As a result many dialectal forms will be noticed. These are listed below with their equivalents in standard Marathi.

हायेल - आहेल. तुमावाणी - तुम्हाप्रमाणे or तुमच्याप्रमाणे
कोन - कोण. अर - अरें. कुट - कुठें/कुठं. म्हंजे - म्हणजे.
घाच्या - घायच्या होत्याल - होताल.

1) गांवात नवी इमारत असावी हे कुणाला पटलें नाही.
No-body approved that there should be a new building in the town.

2) सरकारनें शेतकऱ्यांना मदत करणें शक्य दिसत नव्हतें.
It did not seem possible that government would help the farmers.

3) सुरवातीला इकडची तिकडची चौकशी झाली.
First there was a general conversation enquiring about all things.

4) लढाईमुळे अनेक वस्तु मिळण्याची पंचाईत आहे.

It is difficult to get many things because of the war.

5) तुमचं म्हणणं काय आहे ?

what do you say?

6) हं, ह्यायेत कुणापाशी !

Oh, who has got it! (i.e. Nobody has got it)

7) त्या लेखकानें मनावर घेतलें तर तो एक नवी कादंबरी लिहील.

If that writer is determined, he will write a new novel.

8) तो वाघ बोल बोल म्हणतां रानांत नाहींसा झाला.

That tiger disappeared in the forest in a very short time.

9) तिच्या नवऱ्याला संध्याकाळी लवकर घरीं येणें जमलें नाहीं.

It was not possible for her husband to come home early in the evening.

10) पुढाऱ्याच्या मृत्यूचा विषय घरोघरीं झाला.

The topic of the leader's death was being discussed in every house.

11) कांहीं वेळा साध्या कामालाहि इतका वेळ लागतो कीं विचारून सोय नाहीं.

Sometimes even simple task takes such a long time that it is quite obvious. or (There is no need to ask why)

EXERCISES.

A) Fill in the blanks in the following sentences.

1) आमच्या वडिलांचा - - - - फार आडमुठा आहे.
2) माझें - - - कुणाला - - - नाही.
3) माझ्या - - - आले आहे - - - एक तालीम गांवांत - - -
4) सर्व लोकांनी वर्गणी - - - अशी मी विनंती - - -
5) मला - - - - म्हटलेलं - - - चालेल, - - - ते स्पष्ट म्हणा.
6) सर्व गांवकऱ्यांना जमवल्या - - - मी - - - विचार त्यांना - - -
7) आपल्या गांवांत नेहरू - - - आहेत हा विषय - - - झाला.
8) गांवांत - - - आला की त्याला - - - पंचाईत होते.
9) मोकळ्या - - - ज्याला - - - माहिती आहे त्यानें - - -
हात शिकवले तर - - - होणार नाही.
10) काम जरी कठीण - - - तरी सर्व गांवकऱ्यांनी - - -
घेतलें तर एक देखणी इमारत - - - म्हणता होईल.
11) नवीन इमारत - - - कल्पना लोकांना फार - - - करून - - -
12) पांचपंधरा मुलें - - - तालुक्याच्या - - - जातील.

B) Give the dialectal forms from the preceeding lesson for the following words.

1) पुष्कळ 2) तुमच्याप्रमाणे 3) कोणी 4) अरे 5) कुठें
6) आहे 7) म्हणजे 8) द्यायचा

C) Translate the following sentences into Marathi.

1) I mentioned the topic; but nobody agreed with my idea.
2) The King of the state was fond of building houses.
3) I gathered all the villagers by sending a message to each house.

4) The building will be useful to the villagers.

5) Those who do not have money should work for a day.

6) The villagers made an application to the Government for some help.

7) The teacher of the village gathered all the old people

8) Everybody in the village started discussing about the new building.

9) The villagers enquired about the health of the King.

10) It was not possible to build a school in the near future.

D) Use the following words into sentences

1) एकत्र 2) इच्छा 3) उगीच 4) वेड 5) पहिली वहिली

6) तयार 7) वाहवा 8) कित्येक 9) पुढे 10) अर्ज

[त्र्यंबक बापुजी ठोंबरे हे महाराष्ट्राचे एक अतिशय प्रसिद्ध कवि होऊन गेले. फार लहान वयांत त्यांनी कविता करायला सुरुवात केल्यामुळे त्यांना 'बालकवी' असें नांव मिळालें. वयाच्या सव्वीसाव्या वर्षीच ते अपघातांत सापडून मरण पावले. त्यांच्या विषयीच्या आठवणी लक्ष्मीबाई टिळकांनी आपल्या 'स्मृतिचित्रें' ह्या आत्मचरित्रांत दिल्या आहेत. त्यांतूनच खालील आठवणी निवडल्या आहेत]

ठोंबरे घरांत अगदी घरच्यासारखा वागे. टिळकांपेक्षां तो माझ्याच मागें मागें असायचा. टिळकांच्या समोर आला म्हणजे मात्र मोठा गंभीरपणाचा आव आणण्याचा प्रयत्न करायचा.

कविता केली म्हणजे त्याची पहिली श्रोती मी. मी इकडे कोणाशी कांहीं बोलत असलें म्हणजे तिकडे त्याची कविता वाचून दाखवायची घाई व्हायची. आणि माझें दुर्लक्ष आहेसें दिसलें म्हणजे त्यानें ती कविता रागानें माझ्यापुढें टरकावून फाडून टाकायची. मग दत्तू बेबीनें त्याला चिडवायचें.

—"अरसिक किती हा मेला
हा कविता फाडुन बाहेर गेला"—

मग त्यानें हंसायचें व पुन्हा ती लिहून काढायची. ठोंबऱ्याला कविता फाडण्याचा बराच नाद असावा. कारण नगरला येण्यापूर्वीच्या त्याच्या कविता बहुतेक अशाच गेलेल्या आहेत. त्यांतील कांहीं त्याला पाठ होत्या, त्या तो म्हणून दाखवी. एक किनारीवाला म्हणून कविता होती. एकींत दगडावर चांदणें पडलें होतें ते इतकें पांढरें स्वच्छ होतें, कीं तें हरिणबालकें दूध म्हणून चाटीत आहेत अशी कल्पना होती.

ठोंबरे नगरास आल्यावर हायस्कूलमध्यें जाऊं लागला. तिसरींत किंवा चौथींत असेल तो. शाळेतून तो आला कीं लक्ष्मीबाई गोष्ट सांगा म्हणून माझ्या मागें लागायचा. मी त्याला गोष्टी सांगून दमून गेलें. त्याचा आपला रोजचा लकडा. लक्ष्मीबाई, गोष्ट सांगा. त्या वेळची ही गोष्ट.

एक दिवस हौशीची सासू आली होती. तिला पुष्कळ गोष्टी माहित होत्या. शिवाय एकदां तिची ती गोष्ट सुरू झाली म्हणजे चार चार तास ती सहज चाले.

त्या दिवशी टोंबरे शाळेतून आल्यावर म्हणाला,

"लक्ष्मीबाई, गोष्ट सांगानां."

"हे बघ, आज आली आहे माझी विहीण. तिला चांगल्या चांगल्या, मोठ्या मोठ्या, लांब लांब गोष्टी येतात. ती सांगणार आहे आज तुला गोष्ट!"

माझ्या ह्या बातमीनें टोंबऱ्याला खूप आनंद झाला.

जेवणी होऊन निजायला जाण्याच्या वेळेपर्यंत त्यानें बाहेरून आंत व आंतून बाहेर कितीतरी खेपा घातल्या.

नेहमीप्रमाणे आम्ही सारे एकत्र निजलों. मुलांना माझ्या विहिणीच्या गोष्टींचा चांगला परिचय असल्यानें तीं सारीं तोंडावर पांघरुण घेऊन टोंबऱ्याला हसत पडली होती. इकडे आज आपल्याला मोठी गोष्ट ऐकायला मिळणार म्हणून टोंबरे आनंदांत होता. त्यानें माझ्या विहिणीशेजारी जागा पटकावली, व कान टवकारून तो गोष्ट ऐकूं लागला. गोष्टीला सुरवात झाली ती अशी.

"हे बघा भाऊ! एक उज्जनीचा राजा होता. त्याच्या अस्तुरीला होती एक कार, एक पुत्र. ती त्याची पहिली अस्तुरी गमावली. त्यानें केली दुसरी अस्तुरी. त्या दुसऱ्या अस्तुरीला सवतीची पोरं नको होतीं. तिनं केलं ढोंग, की आपले डोळे लई बिघडले. ती म्हणाली, मला एका जोशानं सांगितले आहे, की दोन्ही मुलांनी मिळून वनांत जाऊन त्रासांचं काळीज आणावं व मला खायला द्यावं. मग माझे डोळे बरे होतील."

"त्रासाचं काळीज? त्रासाला कसं काळीज असणार?" टोंबरे म्हणाला.

"त्रासाचं नाही भाऊ तारसाचं. राजानं अस्तुरीचं ऐकून दोन्ही पोरं वनांत सोडलीं. ते निघाले. एक वन वलांडलं, दोन वन वलांडलीं, तीन वन वलांडलीं, चार वन वलांडलीं, पांच ——

"अहो बाई, त्यांनी हजार वन वलांडली पुढें काय झालं ते सांगा" डोंबरे म्हणाला.

विहीण उत्तरली,

"थांबा ना भाऊ, अशी घाई करूं नका. पांच वन ~~वलांडली~~ वलांडली, सहा वन वलांडली, सात वनं वलांडली. त्यांना भेटला एक राजहंस. त्याने त्यांच्यावर साया केली. त्यानं बसविलं त्यांना एका वृक्षाखाली. आणि त्यानं घर बांधण्याचा विचार केला. त्यानं एक समिंद्र वलांडला, दोन समिंद्र वलांडले, तीन समिंद्र वलांडले."

"बाई, त्यानी सात समिंद्र ओलांडले, कबूल! पण पुढं काय झालें त्या मुलाचे ते सांगा ना!"

"थांबा ना भाऊ, अशी घाई नका करूं. त्या पक्षिराजानें एक काडी आणली, त्यानं दोन काड्या आणल्या, तीन काड्या आणल्या, चार —

"बाई त्या पक्ष्यांनीं पर्वताएवढा काड्यांचा ढीग केला, पण पुढें काय झालें?

"थांबा ना भाऊ! असं काय करतां? मग तो पक्षिराज दगड गोळा करूं लागला. त्यानं एक दगड आणला, दोन दगड आणले, तीन दगड आणले —"

"त्यानें पर्वताएवढी दगडांची रास रचली कबूल आहे मला. पण त्या मुलांचे काय झालें ते सांगाना!"

विहीण म्हणाली, "हे काय बरं भाऊ असं करतां! मला सांगू या ना —"

डोंबरे कंटाळला. त्याला झोंप येऊं लागली पण माझ्या विहिणीला गोष्टीचें कारच स्फुरण चढलें. ती जी पडल्या पडल्या गोष्ट सांगत होती ती आता उठून बसली!

"भाऊ, उठाना! आता काय अगदी उलीशी राहिली. उठून बसा ना —"

आमच्या सर्वांच्या हसून हसून मुरकुंड्या वळल्या. शेवटी होंबळे म्हणाला "आई, मी तुमच्या पाया पडतो पण आता मला जाऊं द्या" पण तिने त्याला तीन वाजेपर्यंत झोप येऊं दिली नाही तो नियम, की ती त्याला हालवून उठवायची व अशा रीतीने तिने आपली गोष्ट पुरी केली. पहाटे आम्ही उठलो पण ही वेडी बराच वेळ निजून राहिली. मी स्वयंपाकघरांत होते. होंबळे उठल्या बरोबर तेथे आला व त्याने मला अगदी खरा खरा साष्टांग नमस्कार घातला

"तकुबाई, अगदी हात जोडून, साष्टांग नमस्कार करतो तुम्हाला, तुमच्या विहिणीला आणी त्या तिच्या गोष्टीला. ही तुमची विहीण मोठी कादंबरीकर्ती बनणार होती, पण काहं माशी शिंकली कोण जाणे."

आम्हांला मात्र त्या रात्रीचें हें बिन पैशाचें नाटक पुढें कित्येक महिने पुरलें.

Vocabulary and Notes

कवि Kəwi॥ (M) = Poet
वय wəy (N) = Age
कविता Kəwita (F) = Poem
आपघात apghat (M) = Accident
आत्मचरित्र atmačəritr^{ə} (N) = Autobiography
मागें mage = Behind
श्रोता šrota (M) = Listner
घाई ghai: (F) = Hurry
दुर्लक्ष durləkš^{ə} (N) = Unattentiveness
टरकाव_ ṭərkaw- (T) = To tear
फाड_ phad- (T) = To tear
अरसिक ərəsik (A) = Uncultured; uncultivated
नाद naḍ (M) = Hobby
पाठ आस_ path as- = To know by heart
किनरीवाळो Kinəri:wala = A musician
लकडा ləkda (M) = harrassment
सासू sasu: (F) = Mother-in-law
सहज səhaj (Adv) = easily
विहीण wihi:n (F) = Mother-in-law of one's son or daughter.
बातमी balmi: (F) = News
जेवण Jəwən (N) = Meal
खेपा घाल Khepa ghal- = To walk back & forth
एकत्र ekətr^{ə} (Adv) = Together
पांघरूण paŋghru:n (N) = Bed-cover; Blanket

परिचय	pəričəy	(M)	= Introduction; Acquaintence
पटकाव-	pəṭkaw-	(T)	= To acquire
टवकार	ṭəwkar-		= To stretch (one's ears)
अस्तुरी	əsturi:	(F)	= Queen-wife (dialectal word for राणी = queen or पत्नी = wife)
कार	kar	(F)	= Daughter (dialectal form of std. Marathi मुलगी = daughter)
सवत	səwət	(F)	= A rival wife of one's husband.
ढोंग	ḍhoŋ	(N)	= pretext
लई	ləi:	(A)	= Plenty, much (dialectal form fo std. M पुष्कळ = plenty)
जोशी	joši:	·	= Astronomer (Rarely used in this sense in std. Marathi)
वन	wən	(N)	= Forest
तरस	tərəs	(N)	= The striped hyena
काळीज	Kalij	(N)	= Heart
त्रास	tras	(M)	= trouble
वलांड (ओलांड)	wəland-(oland)	(T)	= To cross
हजार	həjar	(A)	= Thousand
राजहंस	rajhə̃w̃s	(M)	= Royal Swan
साया	saya	(F)	= Shade (Dilectal form of std. Marathi सावली sawli = Shade)
रिक्ष (std वृक्ष)	rikšə/wrikšə	(M)	= Tree

सामंद्र (std समुद्र) səmindrə/səmudrə (M) = Sea

पर्वतप्राय pərwətpray (A) = like a mountain

पक्षिराज pəkširaj (M) = King of the birds

कंटाळ Kəntal (I) = To be bored

स्फुरण sphurən (N) = Enthusiasm

उलीशी uliši: (A) = Just a little (Dialectal word for std Marathi (एवढीशी = just a little]

मुरकुंडी वळ murkundi: wel = To lie helpless (due to too much laughing)

हालव haləw - (T) = To move

कादंबरी Kadəmbəri: (F) = Novel

कर्ती Kərti: (A) = Creater

माशी शिंक maši: šiŋk = To postpone or cancel something on account of a small excuse.

बिनपैशाचे bin pəyšace = without paying; free

1) माझा लहान भाऊ नेहमी मोठेपणाचा आव आणतो.
My younger brother always pretends to be great.

2) तो रोज गोष्ट सांगण्याचा लकडा लावतो.
He constantly persuades me to tell a story

3) तो कान टवकारून गोष्ट ऐकूं लागला.
He started to listen to the story with intent ears.

4) ती बाई म्हणाली, "हे बघा भाऊ, माझ्या मुलाला बरं वाटत नाही.
That woman said, "listen brother, my son is not feeling well.

5) पुढें काय झालें?
What happened next?

6) सभेतल्या वक्त्याला भाषणाचें फारच स्फुरण चढलें.
The speaker in the meeting became very enthusiastic about lecturing.

7) आम्हाला बिनपैशाचें ते नाटक कित्येक दिवस पुरलें.
That free play was a topic of interest to us for many days.

Exercises

A) Answer the following questions in complete Marathi sentences.

1) Why was ठोंबरे called 'बालकवि'?
2) When and how did he die?
3) What did ठोंबरे use to try in front of टिळक?
4) What was the central theme of one of his poems?
5) What did ठोंबरे use to say to लक्ष्मीबाई after returning from school?
6) Who knew many stories?
7) What did ठोंबरे do until bed time?
8) What did the royal swan do?
9) What pretext did the second wife of the King give to send the children to the forest?
10) How and when was the story completed?
11) What did ठोंबरे do when he got up in the morning?
12) What was his comment about the story-teller!

B) Fill in the blanks with appropriate words?

1) 'स्मृतिचित्रे' हे लक्ष्मीबाई टिळकांचे - - - - आहे.
2) राम आमच्याकडे आला - - - त्याला जेवायची घाई - - -.
3) आमच्या मोठ्या मुलाला चित्रें काढण्याचा - - - आहे.
4) त्याच्या गोष्टी सुरू - - - म्हणजे त्या चार चार तास सहज - - -.
5) गोविंदाला आज नवे कपडे - - - म्हणून तो फार - - - होता.
6) आपल्याला काम - - - लागू नये - - - आमच्या नोकरानें - - - केले की त्याचे डोळे - - - बिघडले.
7) बाई, त्या पक्षांनी - - - काडयांचा ढीग केला. पण - - - काय - - -?

8) माझ्या भावाच्या मुलीनें त्याला एक वाजे --- होय येऊ --- नाहीं.

9) आमच्या मामांचा मुलगा मोठा लेखक --- होता, पण कोठे माशी ---. समजत नाहीं.

10) आमच्या घरातल्या मुलांना ह्या गोष्टींचा चांगला --- असल्यानें ती --- त्याला --- होती.

c) Give dialectal forms of the following words.

1) ओलांडणें
2) सांवली
3) एवढीशी
4) वृक्ष
5) राणी
6) मुलगी, राजकन्या
7) पुष्कळ
8) तरस
9) समुद्र

पावसाळा आला !

[चिं. वि. जोशी हे मराठीतले विनोदी लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. खालील लेख त्यांच्या 'वायफळाचा मळा' या पहिल्या विनोदी लेख संग्रहातून घेतलेला आहे. त्यांचा बराचसा विनोद नेहमीच्या जीवनक्रमांतील विसंगतीवर आधारलेला असतो. पुढील लेख हें त्यांचें चांगले उदाहरण आहे.]

पावसाळा आला की उन्हाळ्याची सुट्टी संपून बरेच दिवस फरारी झालेले प्रोफेसर, मास्तर, सुट्टीखाऊ अंमलदार वगैरे लोक परत घरीं येतात. उलट विद्यार्थी आपली घरें सोडून कॉलेजांत जातात, विद्यार्थिनीहि कॉलेजांत जातात.

पावसाळा म्हटला की, माझ्यासारख्या संसारी माणसाच्या मनांत रोमांचकारी कल्पना येण्याऐवजी कित्येक नवीन खर्चांची सदरें मात्र त्याला भेडावूं लागतात. वहाणा, छत्र्या आणि पावसाळी कोट हीं सदरें या दिवसांत खर्चाची बाजू फुगवूं लागतात.

वहाण या शब्दानें चपल, चेपल्या, पायताणें या सर्वांचा निर्देश करून या क्षणभंगुर, विश्वासघातकी आणि खर्चाळू पादत्राणाविषयी चार शब्द लिहितो. 'पायांतली वहाण पायांत असूं द्यावी' हीच म्हण प्रचारांत कां आली? 'पायांतला जोडा पायात असू द्यावी' अशी कां आली नाहीं? जोड्यानें रस्त्यांत कधींहि चालतांना दगा दिला आहे असें उदाहरण कधीं आढळलें नाहीं. वहाणांचे मात्र बंद किंवा अंगठे ऐन वेळीं तुटून फजिती होते आणि त्या उचलून घेतल्याशिवाय गत्यंतर रहात नाहीं.

छत्री हें एक पावसाळ्याबरोबर येणारें दुसरें संकट आहे. विसराळू लोकांनां नेहमी छत्री विकत घ्यावी लागते. बाहेर पाऊस पडत असला तरच त्यांना छत्रीची आठवण होते, नाहींतर स्नेह्यांच्या घरीं, हॉटेलांत, नाटकसिनेमागृहांत, टांग्यांत, आगगाडींत जेथें ते जातील तेथें छत्री विसरतात. असल्या विसराळूंचा स्नेह आपण जरूर करावा म्हणजे त्यांच्या विसरलेल्या छत्र्यांवर आपल्याला गुजराण करितां येईल.

छत्री वापरून खराब झाली व टाकून द्यावी लागली अशी गोष्ट स्वत: विकत घेतलेल्या छत्रीच्या बाबतीत कोणासहि प्रामाणिकपणें कबूल करतां येणार नाहीं.

पेन्सिल लिहून लिहून झिजली व संपली, स्वत: विकत आणलेलें पुस्तक वाचून वाचून फाटून गेलें, फौन्टनपेन लिहून लिहून खराब झालें, या गोष्टी जशा अशक्य तशी छत्री वापरून खराब होणें अशक्यच आहे. या जिनसा कोठेंतरी राहिल्यानें किंवा दुसऱ्यानें लांबविल्यानें किंवा दुसऱ्यास उसन्यास दिल्यानेंच आपल्याजवळून नाहीशा व्हावयाच्या असतात. आपल्याजवळ या येण्यालाहि हा मार्ग खुला असतो ही त्यांतल्या त्यांत समाधानाची बाब आहे.

आतां या नियमासहि अपवाद आहेत. माझी छत्री पाहिलीत का? ही, सात वर्षे झालीं, मजजवळ आहे. मजकडे येण्यापूर्वी ती जुन्या मालकाजवळ एखादें वर्ष तरी असेलच. माझ्या ताब्यांत आल्यानंतर एक वर्षानें मी तिची मूठ नवीन बसवून घेतली; दोन वर्षांनी कापड नवें बसवून घेतलें; चौथ्या वर्षी काड्या नवीन बसवल्या; पांचव्या वर्षी दांडी बदलून घेतली! मग एका वर्षानें असें झालें कीं, मी मोटारनें साताऱ्याला गेलों होतों, तेव्हां एका गृहस्थाची व माझी अशा दोन्ही छत्र्या टपावर ठेवल्या होत्या. उतरतांना अंधार झालेला होता, व गृहस्थाची दृष्टी फारशी तीक्ष्ण नव्हती. तेव्हां आमची अंतर्बाह्य सुधारणा केलेली छत्री त्याच्या हातात दिली आणि त्याची कोरी छत्री मी आपल्याबरोबर आणली. या अदलाबदलीला वर्ष होत आलें. सारांश, मी छत्री या विषयावर चार शब्द लिहित आहे, ते अधिकारयुक्त आहेत अशी वाचकांची खात्री बाळगावी.

आपण छत्री घेऊन पावसांत चालत असलों आणि आपला बिनछत्रीवाला मित्र आपल्या आश्रयाला आला तर आपण दोघेहि भिजून जातो. अशा वेळीं आणखी एखाद्या मनुष्यास दयाळूपणानें आपल्या दुसऱ्या बाजूनें चालण्यास बोलवावें, म्हणजे आपण कोरडे राहूं व दोन बाजूचे मित्र मात्र पागोळ्यांखाली भिजत राहतील. शिवाय दुसऱ्यांदा बोलावलेला आपला आभारी होईल तो वेगळेंच. ही युक्ती साफ व्यावहारिक असून सामान्येतर प्रसंगी वापरायची नाहीं हें सांगायला नकोच.

रेनकोट हा एक पावसाळ्याबरोबर येणारा निरुपयोगी पाहुणा आहे. त्यांचे वजन पक्का दहा रत्तल असतें, आणि तो घेतला की, खांद्यावर टाकून बिचारा रेनकोट्या दिवसभर यातनांपेक्षां अधिक हांवरेपणानें पावसाची वाट पहात सांजभर घिरट्या घालीत असतो; परंतु मेघराजाच्या कठोर अंत:करणाला पाझर फुटत नाही. शेवटी पाय दुखूं लागले म्हणजे रेनकोट्या आपल्या मित्राच्या घरी जरा टेकण्यास जातो. तो मित्राघरी जाऊन बसण्याचा अवकाश की, पाऊस सुरूं झालाच म्हणून समजावें. पाऊस पाहून रेनकोट्या अंगांत रेनकोट चढवून मित्राचा निरोप घेऊं लागतो.

मित्र — अरे, थांब रे जरा, पावसाची सर जाऊं दे.

रेनकोट्या — अरे, मला आला पावसाचा काय? हा बघ ना नवीन रेनकोट मुंबईहून आणला आहे.

मित्र — असेल रे, आईनी तुला चहा ठेवला आहे तेवढा तर घेऊन जाशील!

चहा तयार होऊन त्याचें प्राशन होते आणि रेनकोट्यास बाहेर जाण्याची संधि मिळण्याच्या आंत पाऊस बंद झालेला असतो. अशा तऱ्हेनें रेनकोटाचें ओझें वाहून थकून गेल्यावर रेनकोट्या आपला रेनकोट घरीच ठेवून फिरावयास गेला, की जोराचा पाऊ आलाच म्हणून समजावें!

पावसाळ्याच्या आरंभी बीबियाणेवाल्या व्यापाऱ्यांना आपली आठवण होते व आपल्याकडे अनेक सचित्र कॅटलाग येऊन पडतात. मोठाल्या कांपाऊंडाच्या बंगल्यापासून त्याखालील टांगलेल्या शिंक्यातल्या टीचभरा शिवाय मोकळी जागा नसणाऱ्या चाळीतल्या बिऱ्हाडापर्यंत सर्व घरांचे मालक यंदा कोणत्या प्रकारची पावसाळी लागवड करावी याच्या चिंतेत मग्न असतात.

पावसाळा संपतां संपतां सुरवंट, घुले ऊर्फ कसरुड या प्राण्यांचे पीक जिकडे तिकडे माजते. ही छोटी अस्वलें लोकांना 'त्राहि भगवान्' करून सोडतात. अंथरुणांत गाढ झोप घेत असलेले इसम एकाएकी जागा होऊन खाजव खाजव खाजवून हैराण होतो, आणि पाहावें तर अंथरुणात कसरुड चिरडलेला आहे आणि आश्विनाच्या महिन्यांत आपली कुसाळ कात टाकून हा प्राणी सपक्ष होऊन उड्डाण करूं लागतो. वाहवा! मी लिहित

आहे या कागदावरच नाचूं लागले की! आता हा लघुनिबंध अर्ध्यावर टाकून कौलें बीट करायला गेलें पाहिजे.

विसंगति	wisəŋgəti	(F)	=	Inconsistency
वायफळ	wayphəl	(A)	=	Barren, fruitless talk
मळा	məla	(M)	=	Orchard
आधार-	adhar-	(T)	=	To support
फरारी	phərari	(A)	=	Absconding
रोमांचकारी	romančəkari	(A)	=	Romantic, joyful, thrilling
सदर	sədər	(N)	=	Column of a newspaper
भेवडाव-	bhewdaw-	(T)	=	To scare
वहाण	wəhan	(F)	=	Sandal
छत्री	čhətri	(F)	=	Umbrella
फुगव-	phugew-	(T)	=	To blow
क्षणभंगुर	kšənəbhəngur	(A)	=	Momentary
पादत्राण	Padətran	(N)	=	Foot-wear
बंद	bəndə	(M)	=	strap
गत्यंतर	gətyəntər	(M)	=	Way of escape, Another remedy
संकट	səŋkeṭ	(N)	=	calamity
विसराळू	wisralu:	(A)	=	Forgetful
स्नेही	snehi	(M)	=	friend
स्नेह	snəho	(M)	=	friendship
तांगा/टांगा	taŋga/ṭaŋga	(M)	=	Horse carriage
आगगाडी	aggadi	(F)	=	Train
गुजराण कर-	gujran kər-		=	To maintain
खराब	khərab	(A)	=	Worn out, bad

झिज- ǰhij- (I) = To wear
जिन्नस ǰinnəs (M/F) = Thing, Commodity
लांबव- lambəw- (T) = To steal
उसने दे. usne de- = To give on credit
बाब bab (F) = Mother
समाधान səmadhan (N) = satisfaction
अपवाद əpwad/əpəwad(M)= Exception
मूठ mu:ṭh (F) = Handle
दांडी daṇḍi: (F) = Stick
टप ṭəp (M) = Top of the car, Bouncing of a ball.
तीक्ष्ण tikšṇə (A) = Sharp
अदलाबदल ədlabədəl (F) = Exchange
सारांश sarā̃w̃š (M) = Summary
खात्री बाळग- Khatri: baləg = To be sure of
आश्रय ašrəy (M) = shelter
भिज- bhij. (I) = To get wet
कोरडा Korḍ-a (A) = Dry
पागोळी pagoli: (F) = Evesdrop
सामान्योत्तर Samanyottər (A) = special, Above Ordinary
निरुपयोगी nirupəyogi (A) = Useless
पाहुणा / पाव्हणा pahuna/pawhna (M) = guest
रत्तल rəttəl (M) = Half a pound
चातक čatək (M) = A legendary bird which satisfy its thirst with

first drop of rain.

कठोर	kəthor (A)	= Harsh, stiff
अंत:करण	ənt-əh kərən (N)	= Heart
पाझर	pajhər (M)	= An oozing
निरोप घे_	nirop ghe_	= To bid farewell
सर	sər (F)	= Shower
प्राशन	prašən (N)	= Drinking
संधि	səndhi (F)	= opportunity
ओझे	ojhe (N)	= Weight, burden
बियाणे	biyane (N)	= Seed for sowing
टांग	taŋ- (T)	= To hang
शिंके	šiŋke (N)	= A hanging basket
बिऱ्हाड	birhad (N)	= Family, apartment a place of living
मालक	malək	= owner
लागवड	lagwəd (F)	= Harvesting
चिंता	činta (F)	= worry
मग्न अस_	məgnə as_	= To be engrossed in
सुरवंट घुला	surwəntə (M) ghula (M)	= Caterpillar
अस्वल	əswəl (N)	= Bear
खाजव	Khajew- (T)	= To scratch
चिरड्	čirəd- (T)	= To crush
केसाळ	Kesal (A)	= hairy
कात	Kat (F)	= catechu, change of skin

उड्डाण Uḍḍan (N) = Flying
लघुनिबंध ləghunibəndhə (M) = short essay
कौल Kəwl (N) = Tile

1) उन्हाळा म्हटलं की मला गेल्या उन्हाळ्यातल्या सहलीची आठवण होते.

At the mention of summer, I remember my trip of last summer.

2) आजचे वक्ते साहित्य या विषयावर चार शब्द बोलतील.

Today's speaker will say a few words on the subject of literature.

3) ऐन वेळी पाऊस पडल्यानं त्याला घराबाहेर जाता आलं नाही.

At the last minute he could not get out of the house because of the rain

4) त्याचे पुस्तक वाचून वाचून फाटलं.

His book was torn because of its extensive reading.

5) त्यांतल्या त्यांत हा एक मुलगा जरा हुशार आहे

At least for some comfort, this one boy is a little smart.

6) माझं हे मत अनुभवावर आधारलेलं आहे अशी वाचकांनी खात्री बाळगावी.

The readers be rest assured that my view (or opinion) is based on experience.

7) त्या खोडकर मुलानें शेजा-याना 'त्राहि भगवान' करून सोडलें

That naughty boy harrassed the neighbours very much.

8) दर पावसाळ्यांत मी घरावरचीं कौलें नीट करतो.

In every rainy season I arrange the tiles of house properly.

Excercises

A) Fill in the blanks with appropriate words.

1) उन्हाळ्याची ---- संपली कीं विद्यार्थी आपली घरें --- कॉलेजांत --- .
2) पावसाळ्यांत वहाणा --- चालतांना ऐन वेळीं वहाणांचे बंद --- फजिती ---
3) बाहेर --- पडत असला की मुलें --- वाचील ---
4) कांही लोक --- जातील --- छत्री ---
5) पुस्तक वाचून काढल्या --- दुसऱ्याला --- नाहीसें होतें.
6) आम्ही नवीन घर विकत --- त्याला एक वर्ष --- आलें.
7) आपण छत्री --- पावसाल --- असलों तर भिजून जातो.
8) रामाला जर घरांत बोलावलें नाहीं --- तो --- भिजत राहिल
9) रेनकोट घरीं --- आपण जर फिरायला --- तर पाऊस आलाच --- समजा।
10) शेजारची मुलें दिवसभर गडबड करून आम्हाला 'त्राहि ---' करून --- .

~~11)~~

B) ANSWER THE FOLLOWING QUESTIONS IN MARATHI.

1) Who is famous as a humourous writer in Marathi?
2) What is the basis of his humour?
3) What items increase the expense column during the rainy season?
4) Who has to buy an umbrella more often?
5) Where do some people forget their umbrellas?
6) What is the advice of the author?
7) What should we do if some one gets under our umbrella when it is raining?

8) What does the author think about raincoats?

9) What sort of businessmen remember us at the begining of the rainy season?

10) What sort of insects appear at the end of the rainy season?

11) What do these insects do?

12) Why does the author has to stop writing?

c) Translate the following sentences into Marathi.

1) The following passage has been taken from the first novel of a famous author in Marathi.

2) Many of my things disappeared because they were borrowed by my friends and were not returned.

3) It is almost a year since I exchanged my old cap for a new one while travelling in a train.

4) As soon as we go out without the Umbrella, it starts raining.

5) Many people forget their raincoats and umbrellas wherever they go.

6) At the begining of rainy season, I receive ma catalogues of seed.

7) I had to re-arrange the files because the water started dripping on my bed.

8) The readers can be sure that whatever I write on this topic is authoritative.

9) There are many exceptions to this first rule, but there is none to the second.

10) It was dark when I got off the train.

एका झाडाची कहाणी.

[शहरांत वावरत असतानां कधी कधी साध्यासुध्या गोष्टीतून सुध्दां निसर्गातील सौंदर्याची अनुभव आणि जाणीव कशी होते हें पाहण्यासारखे आहे. राम देशमुखांनाहि असाच अनुभव आला. कसा तो खालील कहाणीत वाचा].

शहरी गजबजाटांत झाडांची सळसळ सुध्दां ऐकूं येणें दुरावास्त होतें तरीसुध्दां कांही क्षण असे येतात की सृष्टीच्या भव्यतेची आणि सौंदर्याची तीव्रतेनें प्रचीति येते.

ही ज्या झाडाची गोष्ट आहे तें झाड मुंबई युनिव्हर्सिटीच्या बागेंत, लायब्ररीच्या मागच्या बाजुला होतें. खरं म्हणजे ते तिथें कित्येक वर्षे असलें पाहिजे आणि माझ्या मुंबईतल्या वीस पंचवीस वर्षांच्या वास्तव्यांत माझें लक्ष त्या झाडाकडे केव्हांच जायला हवें होतें. असें असतानां १९५६ सालच्या उन्हाळ्यापर्यंत या वृक्षाच्या अस्तित्वाची मला बिलकुल जाणीव नव्हती. त्या वर्षीच्या उन्हाळ्यांत मी रजा काढून उत्तर हिंदुस्थानांत जाणार होतो. एप्रिलच्या शेवटचा आठवडा होता. मी सकाळीं फिरायला म्हणून बाहेर पडलो आणि नेहमीच्या परिपाठाप्रमाणें ओव्हल मैदानाच्या कडेनें चालतो. होतो. युनिव्हर्सिटीच्या समोर आलो आणि मला एक अपरिचित विलक्षण दृश्य दिसलें. वाचनालयाच्या मागच्या झाडीत जिथे हिरवा रंग प्रामुख्यांने दिसावा तिथे पिवळ्या केशरी रंगाची पार्श्वभूमी तयार झाली होती. हा काय चमत्कार आहे म्हणून पाहण्यासाठी रस्ता ओलांडून मी युनिव्हर्सिटीच्या आवाराकडे वळलो. बागेपासून चांगला पांच-पचवीस हात दूर असतानांच वातावरण एका अपरिचित, कमालीच्या प्रसन्न सुगंधाने धुंद झालेलें जाणवलें. मी बागेंत शिरलों, आणि वाचनालयाच्या मागच्या बाजुला येऊन पोहोंचलो. समोर कमीत कमी पन्नास-साठ फूट उंचीचा, पिवळ्या जर्द फुलांनी ~~[illegible]~~. संपूर्ण बहरलेला वृक्ष होता. खाली हिरवळीवर केशरी फुलांचा सडा होता. सगळीकडे अत्यंत प्रसन्न, अंगावर सुखाचे रोमांच उभे करणारा वास पसरलो होता. आणि सर्वात विस्मयकारक गोष्ट म्हणजे त्या एकट्या वृक्षाभोवतीं लक्षावधी भुंग्रे, चतुर

आणि इतर नाना तऱ्हेचे रंगीबेरंगी प्राणी गुंजन करीत मध गोळा करीत हिंडत होते. एक मोहक, भव्य, सुगंधी आणि कर्णमधुर सौंदर्य समोर साकार झाल्यासारखें वाटत होतें. नाक, डोळे, कान या तिन्ही इंद्रियांचे एका क्षणी सार्थक झाल्यासारखे वाटलें. मुंबई युनिव्हर्सिटीतल्या दरवर्षीं जास्त संकुचित होत जाणाऱ्या उपवनाचा हा लहानसा कोपरा एका अमानवी सौंदर्याने बोलका झाला होता. आपण अभावितपणें कोणत्यातरी पवित्र भूमींत पाय टाकला, मानवी डोळ्यांनां सहसा दिसूं नये असे कांही आपण पाहिलें, असा ओझरता विचार मनाला स्पर्श करून गेला. परंतु झाडाकडे पाहिल्यावर झाड मंद स्मित करतें आहे, माझ्या तोंडावर ओसंडणाऱ्या गौरवाचा, आश्चर्याचा हसून स्वीकार करतें आहे असें वाटलें.

त्यानंतर अनेक वेळां तिकडे फेरफटका करूनहि तें अद्भुत सौंदर्य दिसलें नाहीं. पहिल्या भेटींत तें झाड असामान्य आहे असा जो कांही ग्रह झाला तो मात्र नंतरच्या अनुभवांनी दृढ झाला. खरें म्हणजे त्याच दिवशीं ~~दुपारीं मुंबई सोडून~~ जाऊन मुंबईतल्या माझ्या सर्व मित्रमंडळींन्यां मी त्याच दिवशी दुपारी मुंबई सोडून बाहेरगांवी गेलो. परत येईपर्यंत पाऊस सुरू झाला होता आणि झाडावर एकहि फूल राहिलें नव्हतें. या वेळीं प्रथम भेटीत लक्षांत न आलेली गोष्ट म्हणजे झाडाच्या नांवाची पाटी. कुठें तरी जमिनीपासून आठ दहा फूट उंच अशा ठिकाणीं ती पाटी होती. असून नसून सारखीच – अर्धी गंजून गेलेली, राहिलेल्या भागातील अक्षरें जवळ जवळ नाहींशी झालेली. त्यावरून त्या झाडाचें नांवगांव कांहीच समजणें शक्य नव्हतें.

बागेतल्यां माळ्यांकडे चौकशी केली तर झाड परदेशी आहे ह्याखेरीज माहिती मिळाली नाहीं. फुलें केव्हां येतात विचारलें तर 'केव्हांहि' असें उत्तर मिळालें. हें मात्र बरोबर होतें. पहिला पाऊस झाल्यावर त्या झाडावर मला तुरळक फुलें दिसली होतीं. आणि मित्रमंडळींनीहि ती पाहिलीं. मी केलेल्या वर्णनाच्या झाडाबद्दल कुतूहल वाटण्याइतका त्यांच्यावर परिणाम खास झाला आणि झाडाचें नांव शोधून काढण्याचाहि त्यांतील कांहीं जणांनी प्रयत्न केला

माझ्याकडून झाडाचें नांव कळेना तेव्हां बागेचे सुपरिंटेंडंट कोण ह्याची मी चौकशी केली. ते ज्या वेळीं बागेत येतात असें समजलें त्या वेळीं इतर कामें बाजूस सारून मी बागेत जाऊन बसलों. कधी ते आलेच नाहीत म्हणून, तर कधीं ते नुकतेच येऊन गेले होते म्हणून आमची दोघांची भेट होऊंच शकली नाही. माझे एक म्हणाले की युनिव्हर्सिटीच्या वाचनालयांत अमक्या अमक्या लेखिका नियमानें येतात. त्यांना फुलझाडांची फार आवड आहे. मी त्यांना जाऊन विचारीन. त्याप्रमाणे माझे मित्र मुद्दाम सदरहू लेखिकेला भेटून आले. दुसरें कांही बोलणें होण्याच्या आधींच बाई म्हणाल्या, "अहो, त्या पलीकडच्या कोपऱ्यांत एक मजेदार झाड आहे, त्याला बारीक पिवळी जर्द फुलं येतात. तुम्हाला त्याचं नावं माहित आहे कां?"

माझे थोरले बंधु वनस्पतिशास्त्रज्ञ आहेत. अमुक एक झाडाचें नांव माहित नाही. असें त्यांच्या बाबतीत क्वचितच घडतें. ते डिसेंबर महिन्यांत मुंबईला आले असतांना मी त्यांना झाडाबद्दल सांगितलें आणि त्यांना घेऊन त्या झाडाकडे गेलों. दुरूनच मला कांहीतरी चुकल्यासारखें वाटलें. थोडें जवळ गेल्यावर लक्षांत आलें की झाडावरची सगळीं पानें गळून गेली आहेत, आणि केवळ उघड्याबोडक्या फांद्या राहिल्या आहेत. अर्थात ना फूल ना पान अशा परिस्थितींत वनस्पतिशास्त्रज्ञ झाला तरी काय करणार? एकामागून एक आलेल्या ह्या अनुभवानंतर हळुहळू माझा असा ग्रह झाला कीं आपलें नांव कळावें अशी ह्या झाडाची इच्छा नाहीं. पुन्हा एकदा त्या झाडाला संपूर्ण बहरलेला बहर एप्रिल महिन्यांत आला होता, म्हणून पुढच्या उन्हाळ्याची मी उत्कंठेनें वाट पहात राहिलो. एप्रिल महिना आला आणि त्या झाडाला तुरळक फुलें आलीं. परंतु चार फुलें कोठें आणि साक्षात् वसंत ऋतु कोठें! पुन्हा तसा बहर त्या झाडाला कधीच आला नाहीं. निसर्गानें एकदा आपल्या अंगावरचा पडदा बाजूला करून आपलें सौंदर्य दाखवून माझ्यावर अनुग्रह केला होता. तो अनुभव पुन्हा पुन्हा यावा असा संकेत नव्हता. वरचेवर झाला तर तो साक्षात्कार कसला?

त्या उन्हाळ्यांत तें झाड मला आणखी एकदोनदा पाहायला

मिळालें. मे महिन्याच्या शेवटीं शेवटीं मी पुन्हा एकदा तिकडे चक्कर टाकली तर सर्व उलथापाथल झाली होती. ज्या कोपऱ्यांत झाड होते, त्या कोपऱ्यांत मोठेमोठे चार खणण्यात आले होते. राहिलेल्या हिरवळीवर दगडविटांच्या, मातीच्या राशी पडल्या होता. वाचनालयाच्या नवीन दालनाचें बांधकाम जोरात सुरूं होतें आणि मला वेड लावणारें आणि शेवटपर्यंत अनामिक राहिलेलें ते झाड नामशेष झालें होतें.

Vocabulary and Notes

वावर. wawər- (I) = To move about
सौंदर्य səwndəryə (N) = Beauty
जाणीव jani:w (F) = Realisation; Feeling
गजबजाट gejbəjat (M) = hustle and bustle
सळसळ səḷsəḷ (F) = Rustling
दुरापास्त durapastə (Adv) = Difficult
भव्यता bhəwyəta (F) = Grandeuer; Greatness
सृष्टी sriṣti: (F) = Nature
तीव्रता ti:wrəta (F) = Intensity
प्रचीति Prəci:ti (F) = Experience, realisation
वास्तव्य wastəwyə (N) = stay
अस्तित्व əstitwə (N) = Existence
रजा काढ rəja khaḍh- = To have a Vacation
परिपाठ pəripath (M) = Habit; Practice
अपरिचित əpəričit (A) = Strange; Unknown
विलक्षण wiləkšəɳ (A) = Unusual
दृश्य drisšyə (N) = Scene
आवार awar (N) = Compound
वातावरण watawarəɳ (N) = Atmosphere
प्रसन्न prəsennə (M) = Pleasant
सुगंध sugendhə (M) = Pleasant smell
धुंद dhundə (A) = intoxicated
जर्द ǰərdə (A) = Dark, This word used only with पिवळा Piwḷa (A) = Yellow to express deep shade
बहर bəhər (M) = Blossom
हिरवळ hirwəl (F) = Green lawn
विस्मयकारक wisməykarək (A) = Amazing

लक्षावधी ləkšawadhi: (A) = Millions and Millions

भुंगा bhuŋga (M) = Black bee

चतुर čətur (M) = A flying insect

रंगीबेरंगी rəŋgiberəŋgi: (A) = Colorful

गुंजन कर. gunjən kər- = To hum; to buzz

मध mədh (M) = Honey

मोहक mohək (A) = Enchanting, attractive

कर्णमधुर kərṇəmədhu:r (A) = Pleasant to the ear, melodious.

साकार sakar (Adv/A) = With shape or form

संकुचित हो- sənkučit ho- = To shrink

उपवन upəwən (N) = Orchard, A big garden

अभावितपणे abhawitpəṇe (A) = Unexpectedly

मानवी manəwi: (A) = Humane

ओझरता ojhərt-a (A) = brief, light, slight

स्मित smit/smitə (N) = Smile

गौरव gəwrəw (M) = Praise

ओसंड् osəṇḍ- (I) = To overflow, to spread

अद्भुत ədhbhu:t (A) = Unusual, amazing

ग्रह grəhə (M) = Opinion, view

दर्शन dəršən (N) = visit, sight; view

गंज् gənj- (I) = to Rust

gənj (M) = Rust

माळी maḷi: (M) = Gardner

परदेशी pərdeši: (A) = foreign

तुरळक turəḷək (A) = Scanty

सदरहू sədərəhu: (A) = that particular one mentioned earlier.

वनस्पतिशास्त्रज्ञ wənəspatišastrədnya (M) = Botanist

गळ. gəḷ- (I) = To drop, to fall

उघडा - बोडका ughḍ-a-boḍka (A) = Barren, empty, without anything on (the body)

फांदी phandi: (F) = Branch

परिस्थिती pəristhiti (F) = Circumstance

उत्कंठा Ulkəṇtha (F) = Anxiety, eagerness

साक्षात् sakšat (A) = In person

अनुग्रह ənugreha (M) = Favour

सॅंकेत səŋket (M) = Agreement

साक्षात्कार sakšatkar (M) = perception of God in a Vision.

चार cər (M) = pit

रास ras (F) = Heap

दालन dalən (N) = Section, Wing of a building,

बांधकाम bandhkam (N) = Construction work

अनामिक ənamik (A) = Unidentified, Nameless

नामशेष हो. namšes ho. = To disappear; To be destroyed.

1) हा सिनेमा पाहण्यासारखा आहे.
This film is worth seeing.

2) चोर घरात शिरल्याची मला बिलकुल जाणीव नव्हती.
I was not aware at all that the thief had entered the house.

3) हें झाड कमीत कमी ५० फूट उंच आहे.
This tree is at least fifty feet high.

4) मला परीक्षेत बक्षीस मिळाल्यानें मी केलेल्या अभ्यासाचें सार्थक झाल्यासारखें वाटलें
Since I got a prize in the examination, I felt that my studies proved fruitful.

5) माझें हें मत इतर अनुभवानीं दृढ झालें.
Other experiences confirmed this opinion of mine.

6) आमचा नोकर कांहीच काम करीत नसल्यानें तो असून नसून सारखाच.
Since our servant does not do much work, whether he is present or absent does not make any difference.

7) त्या अमक्या अमक्या लेखिका रोज फिरायला जातात.
That so and so authoress goes for a walk every day.

8) मी माझ्या मित्राच्या घरीं चक्कर टाकली.
I paid a visit to my friend.

9) आज आम्ही सामान हलवीत असल्यामुळें घरांत सगळीकडे उलथापालथ झाली आहे.
Everything is topsy-turvey in our home since we are moving our things today.

Exercises

A) Fill in the blanks with appropriate words:

1) यंदाच्या --- मी ह्या --- गांवाला जाणार आहे.
2) बागेपासून --- हाल --- असतानाच मला कुठली --- वृक्ष दिसल
3) त्या झाडा --- हजारो भुंगे गुंजन --- हिंडत होते.
4) त्या बागे --- तो कोपरा एका --- सौंदर्याने --- झाला होता
5) मी मुंबई --- बाहेरगांवी गेलों --- पाऊस --- झाला होता.
6) त्यानें --- वर्णनाचा त्याच्या मित्रा खास परिणाम झाला.
7) ते गृहस्थ --- वेळीं शाळेंत येतात --- वेळीं मी --- कोमें बाजुला --- शाळेंत जाऊन बसतों.
8) त्या पलीकडच्या --- एक --- झाड आहे त्याचें नांव तुम्हाला --- आहे का ?
9) त्या अनुभवानंतर माझा --- ग्रह --- कीं आपलें नांव --- अशी ह्या गृहस्थाची --- नाही.
10) शाळेच्या --- दालनाचें काम --- सुरू झालें आणि त्याकरितां त्या कोपऱ्यांत --- चर खणण्यांत --- .

B) Use the following words into sentences

1) तुरळक 2) अमके अमके 3) परदेशी 4) आणि 5) एकटा
6) कामशेष झालें 7) विलक्षण 8) कोठें 9) पुन्हा 10) प्रथम.

C) Translate the following sentences into Marathi.

1) Although I lived in the city of London for twenty years, I was not aware of the existence of that beautiful garden.
2) I got out of the house for a walk and as usual passed by the big statue at the corner of that building.
3) I left Poona on the same day and did not return until the rainy season began.

4) It is impossible to know the name of this statue because there is no name-plate near it.

5) I enquired with the gardner and he said that he did not know the name of that flower.

6) There are many flowers in India, which have a rich scent.

7) My description of that garden certainly made my friends curious about it.

8) One of the famous writers in Marathi comes to this library regularly because he is very fond of reading.

9) I got the impression that the stranger did not want to tell me his name.

10) When I visited that place the last time again, everything was topsy-turvey.

11) My father is a botanist and it rarely happens that he does not know the name of any tree shown to him.

(पु. ल. देशपाडे हे मराठीतील एक सुप्रसिद्ध विनोदी लेखक आणि नाटककार आहेत. 'खोगीरभरती' 'नसती उठाठेव' ही त्यांचे विनोदी लेखसंग्रह अतिशय गाजलेले आहेत. खालील उतारा त्यांच्या 'तुझे आहे तुजपाशी' ह्या नाटकातून घेतलेला आहे. हे नाटक मराठी रंगभूमीवर फारच लोकप्रिय झालेलं आहे)

आचार्य :- वाजले किती?

श्याम :- (खिशातून घड्याळ काढीत) सहा वाजायला दोन मिनिटं कमी आहेत —

आचार्य :- प्रार्थनेची तयारी झाली? - गीता कुठे आहे? गीता ऽऽ — (जिन्यावरून गीता एकएक पायरी उतरत येते. जॉर्जेटची सुंदर साडी नेसली आहे. कानांत कर्णभूषणें आहेत. केशभूषाही आकर्षक आहे. श्याम तिच्याकडे आश्चर्याने पाहातो. आचार्य त्याच्या चेहऱ्याकडे पाहून त्या दिशेनें पाहतात) कोण? गीता? — श्याम! काय समजूं मी या प्रकाराचा अर्थ?

श्याम :— मी काय सांगूं आचार्य? उषाताई कुठे गेली?

गीता :— बरं वाटत नाही म्हणून जरा पडल्या आहेत —

आचार्य :— काय झालं बरं न वाटायला? आत्ता तर गीतेच्या पुस्तकाचा पेढूं करून ठेवलत होती. अरे अरे, हें काय घर आहे की पागलखाना? गीता, अशी समोर ये —

श्याम :— आचार्य, तिचा कांही दोष नाही — माझाच अपराध आहे —

आचार्य :— वाटलंच मला!

गीता :— त्यांचा मुळीच कांही अपराध नाही —

श्याम :— अग, असं काय म्हणतेस? माझाच अपराध आहे. मी मोहाला प्रवृत्त कां झालों? मी 'हो' म्हटलं नसतं तर काय बिघडलं असतं? - आचार्य, दहा दिवस झाले - मी माझ्याकडून भरसकुस प्रयत्न करून राहिलोय - पण अजून मनोविजय नाही मिळत — तुमच्या सांगण्याप्रमाणे मिरची सोडली, एक वेळचं जेवण सोडलं - चहा सोडला, बूट सोडले, आणि असल्या दोन

अर्ध्या विभारी आयत्या आणत्या स्वादीच्या - सकाळ, दुपार, संध्याकाळ प्रार्थना चालू आहे — मनांत जरा वाईट विचार आले की गार पाण्यानं आंघोळ करतो — हा इथला पुतळा — उचलून फेकून दीला — पूर्वी त्याचं काही वाटत नसे, पण मनोविजय मिळवायला लागल्यापासून त्याचं भयंकर स्वरूप कळलं — गीतेशिवाय विचार नाही दुसरा —

आचार्य:- काय? — (नंतर त्यांच्या लक्षांत भगवद्गीता हे येते) हां - हां

श्याम: - पण --- आचार्य, सत्य सांगतो. गीता, तूं थोडीशी आंत जाशील कां? मला थोडंसं सत्य बोलायचं आहे —

आचार्य: - मग तिला कशाला आंत जायला सांगतोस?

श्याम: - पण तिच्यासमोर बोलण्यासारखं सत्य नाही ते आचार्य.

आचार्य: — ह्याच्यासमोर बोलण्यासारखं सत्य, त्याच्यासमोर बोलण्यासारखं सत्य, असे सत्याचे वेगवेगळे नमुने असतात म्हणून कुणी सांगितलं तुला?

श्याम: - असं आयतं माझं मलाच वाटलं — तुम्ही रागावणार नसाल तर सत्य सांगतो —

आचार्य: - सत्याच्या उपासकानं निर्भय असायला पाहिजे — मी रागावलो - नव्हे मी अगदी तुला जिवंत जाळून भस्म करीन असं वाटलं तरी सत्य सांगायला तूं भितां कामा नयेस —

श्याम: - बाकी तुम्ही रागावालच कसे म्हणा? —

आचार्य: - कां नाही रागावणार? राग येण्यासारखं असलं तर जरूर रागावेन —

श्याम: — पण क्रोधातून बुद्धिनाश नाही कां होत आचार्य? आणि बुद्धिनाशातून विनाश! म्हणजे खेळ खलास!

आचार्य: - (आतां तोंड जरासे गडबडले आहेत) ठीक आहे, ठीक आहे — तुला जें सत्य सांगायचं आहे ते सांग-

श्याम: — पुन्हा केव्हांतरी सांगेन — ही गीता समोर असतांना ते सत्य सांगायची माझी छाती होत नाही —

आचार्य: — (गीतेला) तूं कां इथे उभी? कुठे निघाली होतीस हा शृंगार करून तिथे जा —

श्याम: — तसं नाही आचार्य —

आचार्य: — मला रदबदली आवडत नाही — तू का बोलत नाहीस गीता?

(गीता गप्प आहे — आचार्य गप्प आहेत — श्यामला ती शांतता असह्य होते)

श्याम: — मला वाटतं प्रार्थनेला सुरवात करू या — अर्जुनानें केला — स्थितप्रज्ञस्य का भाषा — (त्याला कोणीच साथ देत नाही)... उत्साताई-आली नाही आजच्या दिवस तर चाललेलं नाही का आचार्य? (कुणीच बोलत नाही — उठून खिडकीजवळ जातो —) आचार्य, बाहेर ढग जमायला लागले आहेत — एखादवेळी पाऊस पडेल बरं का — (पुन्हा सर्व गप्प — तो एकदम आचार्यांच्या जवळ जातो) आचार्य! वाटलं तर सत्य सांगतो — पण तुम्ही गप्प बसूं नका — तुम्ही बोला कांही तरी बोला — मघाशी ही गीता सांगत होती कीं आश्रमांत दिव भंजी खाल्ली म्हणून तीन दिवस मौन धरलं होतं सर्वांनी — काय हाल झाले असतील तीचे! मला कल्पना आली. तुम्ही दोन मिनिटं गप्प झाल्याबरोबर आपण तर भैय्या हैराण झालों. आचार्य, कांही चुकलं असेल तर जोड्यांनी मारा — मला ठाऊक आहे, जोड्यांनी मारणं तुमच्या अहिंसेत बसणार नाही — चुकून सुचवला मी उपाय — पण गप्प बसूं नका आचार्य — मी पाय धरतो तुमचे —

आचार्य: ऊठ तुझ्या हातून घडलेल्या अपराधाबद्दल प्रश्चाताप वाटतोय ना तुला?

श्याम: — माझ्या हातून आजून अपराध घडला नांही आचार्य — एखादे वेळी घडला असता — पण --- नाही हो --- वाटतो प्रश्चाताप —

आचार्य: — तुझं काय म्हणणं आहे गीता? तुला वाटतो की नाही प्रश्चाताप?

गीता: — कशाबद्धल?

आचार्य: — म्हणजे? पश्चाताप वाटत नाही तुला?

गीता: — पश्चाताप वाटूनच घ्यायचं ठरवलं तर पुढच्या सगळ्या आयुष्यांत मला प्रश्चातापच करीत बसावं लागेल.

आचार्य: — काय अर्थ तुझ्या बोलण्याचा?

गीता: — तुम्हाला कळायचा नाही तो —

आचार्य: — गीता ! कसलं भूत शिरलंय तुझ्या अंगांत? राक्षसी यज्ञावर निघालेला तामसी पोषाख अंगावर चढवल्याबरोबर कसले तामसी विचार खेळायला लागले तुझ्या अंगात?

Vocabulary and Notes

विनोदी · winodi: (A) = Humorous
गाज gaj- (I) = To become famous
उतारा utara (M) = Paragraph; Portion
रंगभूमी rəŋgbhumi: (F) = Stage; theatrical world
प्रार्थना prartHəna (F) = Prayer
कर्णभूषणे Kərnəbhu:ṣəne (N.Pl.) = Earings
केशभूषा Keš bhu:ṣa (F) = Hairdo
पागलखाना pagalKhana (M) = Mad House, Mental Asylum
अपराध əpərədh/əpradh (M) = Fault, Crime, mistake
बिघड़ bighəḍ- (I) = To go wrong
मोह mohə (M) = Temptation
प्रवृत्त हो prəwrittə ho- = To be ready (To do) To be prepared (To act)
मनोविजय mənowijay (M) = Conquest of mind
मिरची mirči: (F) = Chilli
विजार wijar (F) = Trousers
खादी Khadi: (F) = handloom cloth
सत्य sətyə (N) = Truth
नमुना nəmuna (M) = Specimen; type
उपासक upasək (M) = Devotee, follower
निर्भय nirbhəy (A) = Brave; fearless
भस्म bəsmə (N) = Ashes
क्रोध Krodh (M) = Rage, Anger
खलास हो Khəlas ho = To end
छाती हो Čhati: ho = To dare
शृंगार Šriŋgar (M) = Dressing or decorating

रडबडली	rədbədli (F)	= Pleading (for some one)
गप्प हो	gəppə ho	= To be quiet
शांतता	šantəta (F)	= Calmness, Peace
असह्य	asəhya (A)	= Unbearable
स्थितप्रज्ञ	sthitprədnyə (A)	= One with a detached mind towards worldly life
आश्रम	ašrəm (M)	= Heritage
भजे	bhəje (N)	= An Indian dish made out of gram flour & onions.
मौन	məwn (N)	= Silence
हैराण हो	həyran ho	= To be annoyed, to be troubled, to be harrassed
जोडा	joda (M)	= Shoe
अहिंसा	əhĩsa (F)	= Non violence.
उपाय	upay (M)	= Remedy
पश्चात्ताप	pəščatap (M)	= Repentance
आयुष्य	ayušya (N)	= ~~Ghost~~ Life
भूत	bhut (N)	= Ghost
राक्षसी	rakšəsi (A)	= Devilish
तामसी	taməsi (A)	= irascible.

1) मी ह्या प्रकाराचा अर्थ काय समजू !
What is the meaning of all this? or How should I understand all this?

2) तिला बरं वाटत नाही म्हणून ती जरा पडली आहे.
She is not feeling well and so she is resting a little.

3) वाटलंच मला !
I thought so.!

4) त्यानें दोन आयत्या विजारी विकत घेतल्या.
He bought two readymade trousers.

5) असं आपलं माझं मलाच वाटलं
I just thought so of my own accord.

6) तुला रानांत वाघ दिसला तरी तू भितां कामा नये.
Even if you see a tiger in the forest, you should not be afraid.

7) मी आज संध्याकाळी जेवलो नाही तर चालेल कां?
Will it be O.k if I don't eat this evening.

8) तो घरात शिरल्याबरोबर सर्वांनी मौन धरलं।
As soon as he entered the house everybody maintained silence.

9) बैलगाडीतून प्रवास करतांना माझे फार हाल झाले.

While travelling in an ox-cart, I suffered many hardships.

10) अशा प्रकारचें वागणें त्याच्या विचारात बसत नाही.

This type of behavior does not fit in his philosophy.

Exercises

A) FILL IN THE BLANKS WITH APPROPRIATE WORDS.

1) माझें पहिलें नाटक रंगभूमीवर फारच ---
2) आईला आज जरा बरं --- नाही
3) तो नाटकाला --- नाही तरी काही ---- नाही
4) त्याने डॉक्टराच्या --- प्रमाणे चहा --- सोडलें.
5) तू --- उद्या जाणार असलास --- आज आपण नाटकाला जाऊया.
6) वडिलांच्या समोर सिगरेट ओढण्याची माझी --- होत ---
7) सत्याचे --- नमुने असतात --- कुणी --- तुला?
8) मास्तर वर्गात --- बरोबर सर्व मुलें --- बसली.
9) आपला हातून अपराध --- ह्या गुन्हेगाराने --- केलें.
10) राम --- पुढें जातो तोच त्याला --- मित्र ---
11) त्याच्या --- मला काहीच अर्थ --- नाही.

B) USE THE FOLLOWING WORDS INTO SENTENCES.

1) गप्प 2) दोष 3) अजून 4) तिथें 5) की
6) म्हणजे 7) जर-तर 8) लागेल 9) चहा 10) हैराण

C) TRANSLATE THE FOLLOWING INTO MARATHI.

1) It will rain today
2) When Ram (राम) wasn't feeling well, I suggested a re
3) The thief repented for having committed the crime
4) Even if you don't come with me, I shall go to the movie
5) When any boy makes a mistake, our teacher does not like an entreaty for him.
6) The speaker asked the people to be quiet for a short time.

7) Will it be alright if I do not attend the lecture today

8) Having heard a commotion, he looked in that direction

9) When we went to the shop, the shopkeeper showed us various types of earings.

[श्री. ना. पेंडसे हे मराठीतले एक सुप्रसिद्ध कादंबरी लेखक आहेत. विशेषत: प्रादेशिक जीवनावरच्या त्यांच्या कादंबऱ्या फारच गाजलेल्या आहेत. ते कोकणचे रहिवासी असल्यानें त्यांच्या कादंबऱ्यांची पार्श्वभूमी आणि, प्रादेशिक जीवन कोकणामधलेंच आहे. खालील भाग त्यांच्या 'हदपार' ह्या कादंबरीतून घेतलेला आहे. 'हदपार' ही एका प्राथमिक शिक्षकाच्या तेजस्वी जीवनाची कहाणी आहे.]

एका पाडव्याच्या मुहूर्तावर माझं शाळेचं शिक्षण सुरू झालं. तीच माझी आणि मास्तरांची पहिली भेट. नानांच्या पाठोपाठ मी मास्तरांच्या वर्गात शिरलो. नानांना पाहून सारा वर्ग एकदम उभा राहिला. मास्तर फळ्यावर कांही तरी लिहीत होते. त्यांनी पाठ वळवली. — अन् —

"ओ हो! या नाना —" हसत हसत मास्तर पुढं झाले. गळ्यांत अडकवलेली धोंगती, कानापर्यंत आलेली टोपी, कोटाच्या खिशांत दोन्ही हात अडकवलेले, अशा थाटांत मी उभा होतो. मास्तरांनी एकदा माझ्याकडे पाहिलं.

"ठरलं? करणार सुरवात?"

"होयं! म्हटलं, करावी सुरवात पाडव्याच्या मुहूर्तावर."

"केशवीलार झालीस वेळ हळूहळू दिगंबरा, काय तुझं नांव?"

कसलं नांव सांगतो बाळ! मी भीतीनं गारठून गेलो होतो.

"नांव सांग — वेंधळ्यासारखा उभा काय राहिलायस!" नाना ओरडले.

"असूं दे, असूं दे पहिलाच दिवस आहे — गोंधळणं ~~[illegible]~~ साहाजिकच आहे."

"अहो, कसला गोंधळतोय? माडावर चढायला नाही गोंधळत तो —"

"काही तरीच काय नाना!"

"आता काय सांगू? आमच्या द्रोणीपासचा माड आहेना?

"बंदर — मग?"

"अहो 'मग' काय — त्याच्या अर्ध्यावर ही वल्ली परवा चढून गेली"

"काय सांगता नाना तुम्ही?"

"सदूला विचारा, सारं सांगेल तो. म्हटलं, एकदा शाळेत अडकवून टाकावा. त्याच्यासारखं सुख नाही. आता तुमच्या

स्वाधीन करतो आहे. त्यांशाळा ही पीडा —"

"असं काय बोलतां हो? वात्य योग्यच पुढे हुषार बनतात".

"म्हणा तुम्ही कांही तरी."

"कांही तरी नाहीं. पंचवीस वर्षांच्या अनुभवानं बोलतो आहे. तो राहुया तुम्ही माझ्या हवाली केला आहे ना? आता स्वस्थ असा."

मी बिगरच्या वर्गात आलों, त्या वेळीं आमच्या वर्गात तीस मुलं होती.

मास्तर शाळेंत यायला निघाले म्हणजे त्यांचा मुक्काम आमच्या कवाडाशी व्हायचा.

"काय नाना? चिरंजीव गेले का?"

मास्तरांच्या चढ्या आवाजांतील हा प्रश्न माझ्या परिचयाचा होता. हाक आली रे आली की धोंगटी अडकवून मी बाहेर यायचा. माझा हात धरून मास्तर शाळेची वाट चालू लागायचे.

"दिगंबरा, चलायचं ना शाळेंत?"

ते गोड न हळू शब्द आजही मला आठवतात.

अन् नंतर मुलं गोळा करीत जाण्याचा आमचा क्रम असे. शाळेशी जाईतो आम्हा मुलांची एक लहानशी मिरवणूकच तयार होई. आम्हा बारातेरा मुलांची ही वरात तगड्या माणसालाहि रंजीस आणण्यास समर्थ होती. महाधा वशाला लोटी. बबल्या कुंपणातून बाहेर आलेली फुलं काढतानां धडपडे; फक्या हातात काठी घेऊन वाटेत लागणाऱ्या प्रत्येक झाडाला बैल मानून बडवून काढी. — एकूण काय, सीधा चाललेला मुलगा औषधालाहि सापडणं कठीण होतं. अशा या मिरवणुकी मास्तर अग्रभागी चाललेले असायचे. कित्येक वेळां ते आमचं कौतुक करीत — कधीं धोबाडीत खायची पण वेळ येई. पण धोबाडीत मिळाली तरी तेवढ्यांच ते चार कवाड्या ओलांडल्या कीं मास्तर मात्र वळून हसत.

"काय बबल्या, लाडू कसा होता?"

तेवढ्या त्या प्रश्नानं बबल्याला कवढा धीर यायचा. "मास्तर खरेखुरे नाहीं रागावले तर मग!" बबल्याची खात्री होई व दहा पावलं अगोदर खाल्लेली थप्पड तो विसरून जाई.

आमची ही मिरवणूक म्हणजे गांवचा एक विनोद होता. लोक म्हणत

" आली भैरोबाबाची पालखी !"

मास्तर म्हणत.

" खरंच आली पालखी ! पूजा आणा."

मास्तरांनी हयातभर या पालखीची पूजा बांधली — गांवकऱ्यांनी नुसती थट्टाच केली.

प्रत्येक कवाडीशी ते उभे रहायचे व आरोळी द्यायचे,

" काय रामभाऊ —"

या आरोळी सरशी बबल्या अक्कड बाहेर यायचा. आणि मग लंब्या जोशी ! आमच्यातला हा विदुषक होता. त्याची पंजाच्या रुंदीची शेंडी, किंचित काणा डोळा, किन्हेरी आवाजातले नाकातील बोलणं, व हाडकुळा देह ! गांवांत त्याच्याकडे 'विनोदाचा विषय' म्हणूनच पाहिलं जाई. लंब्या कवाडीशी 'भैरीबाबाची पालखी" ची वाट पाहात असायचा. आम्ही दिसलो म्हणजे आरोळी द्यायचा, "बबल्या, रांडेच्यांनो, किती सावकाश चाललांय —" व मास्तर दृष्टिस पडले म्हणजे जीभ चावायचा.

"लंब्या, किती वेळां सांगायचं तुला ? पुन्हा 'रांडेच्यांनो' म्हटलंस, तर थोबाडांत मिळेल."

" लक्षांतच नाही रहात, मास्तर"

" देऊं आपण त्याला औषध, म्हंजे राहिल लक्षांत"

तसल्याच किनरी आवाजात मास्तर बोलायचे व लंब्यासकट सगळे मोठ्यानं हसायचे.

बिचारा लंब्या ! एक मास्तर सोडले तर घरी, दारी त्याचं कुठेचं कौतुक झालं नाही. त्याचा देह, बोलणं, चालणं, वागणं, कशातच आकर्षकपणा नव्हता. त्याच्या वडिलांनी तर त्याला अर्धवटांतच जमा केलं होतं. " कसं होणार लंब्याच !" — त्यांना आयुष्यांत काळजी अशी हीच होती ! वर्गात नंबर कधीं फारसा वर नसायचा. अभ्यास त्याला आवडेल तोच करील;

मोठ्या उत्साहानं वडिलांनी अभ्यास घ्यायला बसावं — लंब्या असल्या कुतुहलावेगळ्या शंका विचारी की बापानं हारण आलंच पाहिजे. आणि वडील चिडकायचे, आम्ही सारे हसायचो, पण डोक्यांत काहि शिरलं की ते बाहेर पडेपर्यंत लंब्याला स्वस्थ बसणं ठाऊक नव्हतं.

त्या दिवशी असंच झालं. एक पपईच्या नळींत पाचपन्नास काजवे कोंबून लंब्या आपल्या गांवठी बॅटरीचं प्रदर्शन भेटेल त्याच्याजवळ करीत होता.

सगळीकडे हसू झालं. वडिलांनी तर चांगलाच तासडला. लंब्याच्या सारं सवयीतलं होतं. ती बॅटरी तो तरशी घेऊन आला शाळेत. मास्तरांनी त्याची गांवठी बॅटरी पाहिली. आठ वर्षांच्या लंब्याची ती कल्पकता पाहून मास्तर थक्क झाले. साऱ्या मास्तरांना त्यांनी ती दाखवली. सरतेशेवटी ते आमच्या वर्गात आले, न त्यांनी लंब्याला बोलावलं.

" लंब्या, तूंच केली ही बॅटरी, की कुणी तुला सांगितलं ?"

लंब्या घाबरला.

" आता नाही मी पुन्हा करणार —"

" अरे, असा घाबरतोस काय ? फार चांगली केली आहेस बॅटरी. म्हणून तर दाखवली आहे मी साऱ्यांना. छान, छान ! असाच पुढे चल. पण अभ्यास सुद्धा केला पाहिजे हं.

लंब्याच्या पाठीवर त्यांनी हात फिरवला न त्याला जागेवर आणून बसवलं.

ज्या लंब्याला काही वेळापूर्वी साऱ्यांनी बावळटांत जमा केलं होतं तो आता छाती काढून चालत होता.

आज मास्तरांचा विषय निघाला की लंबोदरचे डोळे पाणावतात " एकट्यां त्यांनींच ओळखला माझा बकुब." लंबोदरचे हे उद्गार अक्षरशः खरे आहेत.

Vocabulary and Notes:

प्रादेशिक Pradešik (A) = Regional
रहिवासी rəhiwasi (M) = Resident
पार्श्वभूमी parswəbhu:mi: (F) = Background
जीवन ji:wən (N) = Life
प्राथमिक prathəmik (A) = Primary
तेजस्वी tejəswi (A) = Bright; brilliant
कहाणी kəhaṇi: (F) = Story
पाडवा paḍwa (M) = New Year's day
मुहूर्त muhu:rt^{ə} (M) = Auspicious time
शालेय šaleya (A) = of school, pertaining to schoo
पाठोपाठ paṭhopaṭh (A) = Behind
फळा phəla (M) = Blackboard
अन्/न ən / nə = And
अडकव- əḍkəw- (C) = To attach, to hand, to put in (school)
गारठ- garəṭh (I) = To freeze
वेंधळा wendhəḷ-a (A) = Simpleton
गोंधळ gondhəl (I) = To be confused
माड maḍ (M) = Palm tree, Cocoanut tree
द्रोण droṇ (A) = A big tank made of stone
वल्ली wəlli (A) = Strange person
स्वाधीन कर. swadhinkər = To hand over
पीडा Pi:ḍa (F) = Nuisance
व्रात्य wraty^{ə} (A) = Naughty
बिगरच्या वर्ग bigerča wərg^{ə} = Infant class, before 1st grade

मुक्काम mukkam (M) = stop
कवाडी kəwadi: (F) = Gate
चिरंजीव čirənjiw (M) = Son
क्रम Krəm (M) = Practice
तगडा təgda (A) = strong
रंजीस् आणा rənjis an. = To tire (someone) by harrasing
लॉट lot. (T) = To push
कुंपण Kumpən (N) = Fence
बैल bəyl (M) = Ox
बडव badə̣w (T) = To beat
औषध् əwšədh (N) = Medicine
